

*Anand Charitable Sanstha, Ashti's*

# Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya,

## (Arts, Commerce and Science)

*Kada, Tal. Ashti. Dist. Beed 414 202 (Maharashtra)*

# Criteria VII

## 7.2.1 FINAL BEST PRACTICE-I

## (Developing eco-friendly Culture in Adopted Village)


**Phone**

+02441-2396210
+91 9421404246

**Contact**

admkada@gmail.com
www.admkada.com

**Address**

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya Kada, Taq-Ashti, District-Beed 414 202 (M.S.)


Made with PosterMyWall.com

सत्यमेव जयते

# ग्रामपंचायत कार्यालय, सराटेवडगाव / आनंदवाडी

## ता. आष्टी जि. बीड

सरपंच : प्रा. डॉ. राम बोडखे | ग्रामसेवक : सायंबर जी.डी | उपसरपंच : अयोध्या महादेव शिंदे
मो : ९४२३०३२२२२ | मो : ९८९०७५८००२ | मो ७५०७३९१९१९

अभिनंदन / आभार पत्र

दिनांक 15.8.19

ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगाव / आनंदवाडी ता. आष्टी, जि. बीड

प्रति,
मा. प्राचार्य साहेब,
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय.
कडा. ता. आष्टी जि. बीड.

महोदय,

उपरोक्त विषयी अभिनंदन पर पत्र लिहितो की, आपल्या महाविद्यालयाने आमचे गाव सराटेवडगाव / आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड हे गाव पाच (5) वर्षासाठी रा. से. योजनेने दत्तक घेतले आहे

पाणी फाउंडेशन स्पर्धा - 2018 मध्ये आनंदवाडी गावाने भाग घेतला आनंदवाडी हे गाव पाणी फाउंडेशन स्पर्धेत महाराष्ट्रात तृतीय क्रमांक मिळविला आहे. या स्पर्धेच्या काळात आपल्या महाविद्यालयाचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे म्हणून आपल्या योगदानाबद्दल अभिनंदन व आभार

सरपंच
ग्रा.पं. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

ग्रामसेवक
ग्रा.प. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

# BEST PRACTICE -I

DEVELOPING ECO-FRIENDLY CULTURE IN ADOPTED VILLAGE

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

## आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा
## ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

o/c

# विशेष शिबीर अहवाल

## २०१७-२०१८

*Anand Charitable Sanstha Ashti's*

# ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

**(Arts, Commerce & Science)**

**TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202**

☎ 02441- 239621

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



NAAC GRADE - **"A"** | ISO 9001:2008 Certification | **Principal Dr. H.G. Vidhate**

Date: 26/02/2018

Ref. No.ADMK / 2017-18/362

प्रति,
मा.कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

विषय :– **विशेष शिबीर सन २०१७–१८ चा अहवाल स्विकारणे बाबत.**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१७–१८ या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या विशेष शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे.साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारुन सहकार्य करावे. ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सोबत :–

१. अहवाल
२. फोटो
३. वर्तमानपत्र बातम्याचे झेरॉक्स
४. स्वंयसेवक उपस्थिती पत्रक.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना
आवक क्र.
दि.
औरंगाबाद

5/3/18

दिनांक :- 13/01/2018.

प्रमाणित करण्यात येते की, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि. बीड यांचे राष्ट्रीय सेवा-योजना विभाग विशेष शिबीर मौजे सराटेवडगाव ता. आष्टी जि. बीड येथे दिनांक 06 जानेवारी 2018 ते 12 जानेवारी 2018 या कालावधीत संपन्न झाले. शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा-योजनेतील स्वयंसेवकांनी ग्रामदैवत महेश मंदिर परिसरातील साफसफाई, गावालगत रस्त्यावर असलेल्या वेड्या बाभळी व गाजरगवत निर्मूलन टाकळी - सराटेवडगाव रस्ता दुरुस्ती जि.प. शाळा परिसरातील स्वच्छता, वृक्षांना आळे, रंग-रंगोटी करणे ग्रामस्वच्छता इत्यादी कामे केली. त्याचबरोबर बौध्दीक कार्यक्रमामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छतेचे महत्व, बेटीबचाव, बेटीपढाव, आरोग्य, व्यसनमुक्ती, जलसंवर्धन, ग्रामिण नवचेतना, कुपोषित बालकांचा सर्वे करून एकही बालक कुपोषित आढळले नाही. आधारकार्ड संपूर्ण ग्रामस्थांचे आहेत. याबाबत मार्गदर्शन, जनजागृती व प्रबोधन करून एकंदरीत शिबीर गावाच्या विकासासाठी व अभिनेता पाणी फाऊंडेशन तर्फे होणाऱ्या सत्यमेव जयते वाटर कप स्पर्धेसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन ठरले.

करिता प्रमाणपत्र देण्यात येते.

ग्रामसेवक
ग्रा.पं. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

सरपंच
ग्रा.पं. सराटे वडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी, जि. बीड

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबजी महाविद्यालय, कडा.

## ता. आष्टी जि. बीड

### राष्ट्रीय सेवा योजना.

### विशेष शिबीर अहवाल २०१७–१८

दिनांक : ०६ जानेवारी २०१८ ते १२ जानेवारी २०१८

**स्थळ – मौजे सराटेवडगाव ता. आष्टी जि. बीड.**

---

दर वर्षीप्रमाणे आमच्या महाविद्यालयाचे विशेष शिबीर मौजे सराटेवडगाव ता. आष्टी जि. बीड. येथे संपन्न झाले! ''जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतेसाठी युवा'' ही या शिबीरामागची मूळ संकल्पना होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. औरंगाबाद व आपले महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीर घेण्यात आले. शिबीराच्या पुर्वतयारीसाठी कार्यक्रमधिकारी व प्राचार्यांनी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, प्रतिष्ठीत नागरिक, तरूणमित्र, व जि.प.प्रा.शाळा. मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी व यांच्या भेटी घेवुन समन्वय व नियोजन करण्यात आले. सरपंच व ग्रामस्थांशी चर्चा करतांना असे ठरवण्यात आले की, गावाचे ग्रामदैवत महेश मंदिर परिसरातील स्वच्छता, जि.प.प्रा.शाळा परिसरातील झाडांना आळे, रंग, रंगोटी, साफ सफाई करणे त्याच बरोबर सराटेवडगाव फाटयावरून गावाकडे येणारा रस्ता दूरूस्त करणे, रस्त्याच्या कडेला वाढलेल्या वेडया बाभळी व इतर कोटेरी झुडपे तोडून रस्ता मोकळा करणे. ग्रामपंचायत परिसरातील स्वच्छता, पाणी बचतीचे महत्व सांगुन पाण्याचा काटकसरीने वापर करणे, वनराई बंधारे बांधणे इ. कामे ठरवून जलसवर्धन व ग्रामस्वच्छतेसाठी युवा 'ही मुख्यसंकल्पना शिबीरासाठी वापराली.

## शनिवार दि. ०६/०१/२०१८

दि. ०६/०१/२०१८ रोजी ठिक ११:०० वा. मौजे सराटेवडगाव ता. आष्टी जि. बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपीठ, औरगाबाद व आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय. कडा. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर २०१७–१८ उद्‌घाटन व दर्पण दिन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते हे होते तर कार्यक्रमाचे उद्‌घाटक जेष्ठ पत्रकार मा. प्रा. अनंत हंबर्डे होते. या वेळी व्यासपिठावर पो.नि. सय्यद शौकत अली. स.पो.नि. यशवंत बारवकर, माजी शिक्षण अधिकारी विक्रम पोकळेसाहेब आष्टी पत्रकार संघाचे अध्यक्ष मा. भिमराव गुरव, सचिव पत्रकार दादासाहेब बन, पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुदे पत्रकार रघुनाथ कर्डिले, सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच सौ. अयोध्या शिंदे, ग्रमपंचायत सदस्य आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. प्रारंभी स्वच्छतेचे महामेरू संतगाडगेबाबा व पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घटक तथा जेष्ठ पत्रकार प्रा. अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्व कळते. शिबीरामध्ये माणसाचे मन व शरीर बदलले पाहिजे प्रत्येकाने पावसाच्या पाण्याच्या थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत परिसर चांगला होईल व शासनाकडे काही मागण्याची गरज पडणार नाही, सामाजिक बांधिलकी स्विकारणारा जिवनात यशस्वी होतो. यावेळी पो. नि. सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पोलीस आपले मित्र आहेत. समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज आहे. प्रत्येकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावा, अध्यक्ष पदावरून बोलतांना प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी म्हटले की, आमच्या महाविद्यालयाने आजपर्यंत ज्या गावात श्रमदान केले आहे, त्या कामाबदल नक्कीच हेवा वाटेल असे काम राष्ट्रीय सेवा योजनेतून

झाले आहे. त्यामूळे गावकाऱ्यांना व विद्यार्थ्यांना समाधान लाभले. सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की शिबाराच्या माध्यमातून पानी फाऊंडेशन वॉटर कप मध्ये गावाने सहभाग घेतला आहे. सर्वांनी गावाच्या विकासाठी सहकार्य करावे. कार्यक्रम प्रसंगी पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्दे मा. बलभीम सुंबरे, पत्रकार उत्तमराव बोडखे. पत्रकार डॉ. विनोद ढोबळे पत्रकार दादा बन यांची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे सुत्र संचलन कार्यक्रमधीकारी डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक डॉ. जी. एस. जगताप यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी. एन. औटे यांनी मानले. यावेळी मोठया प्रमाणावर सराटेवडगाव येथील ग्रामस्थ, एन.एस.एस. स्वयंसेवक, महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापक व इतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर शिबीरार्थी स्वयंसेवकाना भोजन देण्यात आले. भोजनानंतर विश्रांती घेतली व दुपारी ठिक ४.०० वा. निवासाच्या ठिकाणी परिसर स्वच्छता करण्यात आली. व सायंकाळी ठिक ५.०० वा. ग्रुप करून गटचर्चा पाणी व्यवस्थ्यापन, स्त्रीभ्रुण हत्या, हुंडा बळी, स्त्री—पुरूष समानता इ. विषयावर करण्यात आली सायंकाळी ६:३० ते ७:३० यावेळेत भोजन करण्यात आले. तृतीय सत्रामध्ये बौध्दिक व प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. गावातील हनुमान मंदिराच्या प्रांगणामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गावातील प्रतिष्ठीत नागरिक पठाण शरीफ खान. हे होते. या प्रबोधनपर कार्यक्रमामध्ये प्रमुख व्याख्याते डॉ. सज्जन गायकवाड यांनी ''संत गाडगेबाबा यांचे विचार'' या विषयावर ग्रम— स्वच्छतेबाबत सखोल मार्गदर्शन केले. मा. संभाजी ओव्हाळ. डॉ. दत्तात्रय जिरेकर व प्रा. भिमराव गावडेयांनी अंधश्रध्दा निर्माण निर्मूलनवर प्रयोग सादर करून ग्रामीण महिला व पुरूषांमध्ये अंधश्रध्देचे भूत कमी करण्याचा प्रयत्न केला. आजही काही अशी ग्रामीण भागामध्ये अंधश्रध्देचा पगडा समाजामनावर असलेला दिसून येतो. त्यावर *विज्ञानाचा आधार घेऊन* प्रयोगाच्या माध्यमातून दाखवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबीरार्थी स्वयंसेवक अविनाश बोडखे यांनी केले वर आभार दीपक कापरे यांनी मानले.

# रविवार दि. ०७/०१/२०१८

**रविवार दि. ०७/०१/२०१८** रोजी पहाटे ५:०० वा उठुन सर्व स्वयंसेवकानी ५:३० वाजे. पर्यंत स्वयंस्वच्छता केली ५:३० ते ७:३० या कालावधीत व्यायाम, योगासने, प्रार्थना, करण्यात आली. त्यानंतर ७:३० ते ८:३० या वेळात अल्पोपहार करून श्रमदानास सुरूवात करण्यात आली. सराटेवडगावचे ग्रामदैवत महेश मंदिर परिसर, हनुमान मंदिर, परिसरातील स्वच्छता, ग्रामसफाई करण्यात आली. यासाठी एकूण १५ ग्रुप तयार करण्यात आले. १२:३० ते १:३० या कालावधीत भोजन झाल्यानंतर ४:०० वाजेपर्यंत विश्रांती घेण्यात आली. त्यानंतर ४:०० ते ६:०० वाजेपर्यंत गटचर्चा व परिसर स्वच्छता करण्यात आली. ६.३० ते ७:३० या वेळेत भोजन करण्यात आले. ठिक ७:३० वा. ''दोन हात दुष्काळ मुक्तीसाठी'' या विषयावर पाणी फाऊंडेशन, आष्टी तालुकाच्या वतीने श्री. प्रदिप काथवटे श्री. कैलास पन्हाळकर, श्री. संभाजी इंगळे यांनी स्लाईड शो. च्या माध्यमातून पाणी, बचत, दुष्काळाशी दोन हात, पडलेल्या पावसाच्या पाण्याच्या थेंबाचा वापर कसा योग्य प्रकारे करता येईल यावर सविस्तर मार्गदर्शन केले. गावच्या एकीमधुन गावचा विकास कसा करता येईल या बाबत गावकऱ्यांना योग्य असे मार्गदर्शन करून येणाऱ्या पाणी फाऊंडेशन वॉटर कप मध्ये गावाने सहभागी होऊन प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावावे असे अवाहन केले. त्यामूळे गावाचा कल या स्पर्धेत सहभागी होण्याकडे झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य श्री. अंकुश गुंड हे होते. तर कार्यक्रमास उपसरपंच सौ. अयोध्या शिंदे. श्री. महादेव शिंदे, डॉ. पटेल एम. आर. डॉ. विधाते आर.जी. डॉ.जी.पी. बोडखे व मोठया संखेने ग्रामस्थ व शिबीरातील स्वयंसेवक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. एस.एस. स्वयंसेवक निलेश खोटे यांनी केले तर आभार स्वयंसेवक निलेश जिवे यांनी मानले.

## सोमवार दि. ०८/०१/२०१८

**सोमवार दि. ०८/०१/२०१८** दिनचर्येप्रमाणे पहाटे उठुन स्वयंसेवकांनी गावातील रामधूम फेरी पूर्ण करून स्वयंस्वच्छता योगासने प्रार्थना झाल्यानंतर सर्वांनी नाष्टा करून अगोदर ठरल्याप्रमाणे ग्रुप करून टाकळी अमिया ते सराटेवडगाव या रस्त्याच्या कामाची दूरूस्ती रासेयोचे.स्वयंसेवक व ग्रावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य टाकळी गावचे उपसरपंच, व ग्रामस्थांच्या मदतीने त्या रस्त्यावर १२ खेपा मुरूमाच्या टाकुन, पाणी टाकुन दूरूस्ती केली. या कामाबद्‌दल सराटेवडगावकरांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थीचे अभिनंदन केले. दुपारचे भोजन करून विश्रांती घेतल्यानंतर गटचर्चा करण्यात आली. गटचर्चेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. महादेव शिंदे हे होते. सायंकाळच्या भोजनानंतर ७:३० ते ९:३० चा वेळेत अहमदनगर येथील आर्ट ऑफ लिव्हींग चे प्रशिक्षक मा. श्री नरेंद्र बोठे व मा. घन:शाम दळवी यांनी ग्रार्मीण नवचेतना शिबीराच्या माध्यमातून हसन खेळत आनंदी जिवन जगण्याचा मूलमंत्र  ग्रामस्थ व रासेयोतील शिबीरार्थी स्वयंसेवकांना दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गोरख गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो. स्वयंसेवक बोडखे अविनाश याने केले तर आभार कापरे रोहित याने मानले कार्यक्रमास मोठया प्रमाणात महिला पुरूष ग्रामस्थ व रासेयोतीलस्वंय सेवक उपस्थित होते.

## मंगळवार दि: ०९/०१/२०१८

**मंगळवार दि: ०९/०१/२०१८** चौथा दिवसी पहाटे ५:०० वा. सर्व स्वयंसेवकांनी उठुन आपली स्वयंस्वच्छता झाल्यानंतर गावामध्ये रघुपती राघवर राजाराम पतीत पावन सीताराम'' प्रार्थना, योगासने, सूर्य नमस्कार करण्यात आले. नियमीतपणे अल्पोपहारानंतर श्रमदानासाठी सर्व स्वयंसेवक सिध्द झाले. पहिल्या दिवसी जे ग्रुप केलेले होते. ते ग्रुप कायम ठेवून गावातील हनुमान मंदिरा जवळील साफ सफाई, स्वच्छता करण्यात झाली. गाव कोसाला असणाऱ्या रोडवरील वेडया बाभळी

पूर्ण पणे नष्ट करून रस्त्यावर पडलेले दगड इतर घाण कचरा दूर करून रस्ता साफ केला त्यानंतर दुपारचे जेवण करून स्वयंसेवकांनी २:३० ते ५:३० या वेळात विविध विषयावर नाटयछटा सादर केल्या त्यामध्ये **'हुंडाबंदी'** **''व्यसनमुक्ती''** **'लेक वाचवा'** या ज्वलंत विषयावर स्वयंसेवकांनी नाटयछटा सादर करून ग्रामंस्थांची मने जिंकली त्यानंतर दैनंदिन नियमानुसार रात्रीचे भोजनानंतर ७:३० ते ९:३० या वेळेत आर्ट ऑफ लिव्हींग, अहमदनगर येथील प्रशिक्षक मा. श्री नरेंद्र बोठे व घन:शाम दळवी यांचे ग्रामीण **'नवचेतना शिबीर'** हा कार्यक्रम पार पडला ग्रामीण भागातील मोठया प्रमाणात महिला व पुरूष या शिबीरामध्ये सहभागी झाल्या होत्या. या शिबाराचा मूळ उद्देश दिवसभरातील कामाचा ताण दूर करून नवीन चेतना अंगी बाणवून आनंदी जिवनाचा मूल मंत्र या शिबीराच्या माध्यमातून ग्रामस्थांना व रासेयोतील स्वयंसेवकांना मिळाला. एकमेकांशी संवाद कसे करावयाचे त्यांच्याशी जवळीक व आपुलकीची भावना कशी निर्माण करावयाची या बाबत शिबीरातून शिकावयास मिळाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शेख नबीब ग्रामपंचायत सदस्य सराटेवडगाव हे होते. महिला व पुरूष रासेयोतील स्वयंसेवक मोठयाप्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयोस्वयंसेवक पंकज अंबिलवादे याने केले तर आभार रासेयो स्वयंसेवक सुखदेव लोखंडे याने मानले.

## बुधवार १०/०१/२०१८

**बुधवार १०/०१/२०१८** नियमितप्रमाणे पहाटे उठुन स्वयंसेवकांनी आपली स्वयंस्वच्छता व व्यायाम योगासने उरकल्यानंतर नाष्टा करून गावातील स्वच्छता करण्याच्या कामाचे नियोजन करण्यात आले. ठरल्याप्रमाणे ग्रुप करून गावातील सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यामध्ये मळगंगामाता मंदिर परिसर, महादेव मंदिर परिसर, जि.प.प्रा.शाळा परिसर, व समाजमंदिर बांधण्यासाठीच्या जागेवरील पडलेले दगड, लाकडे उचलून ट्रॅक्टर मध्ये भरून देऊन जागा साफ केली. दुपारच्या जेवनानंतर विश्रांती घेऊन गटचर्चा करण्यात आली. सायंकाळच्या भोजनानंतर निर्धारित वेळे प्रमाणे ७:३० ते ९:३० या

वेळेत तालुका कृषी अधिकारी मा. प्रमोद शिंदे यांचे हवामान बदल व शेती व्यवसाय या विषयावर व्याख्यान दिले. त्या बरोबर अहमदनगर येथील आर्ट ऑफ लिव्हींग चे प्रशिक्षक मा. श्री. नरेंद्र बोठे व घन:शाम दळवी यांनी तीन दिवसीय शिबीराचा हसत खेळत समारोप केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य श्री. अकुश गुंड हे होते. तर तालुका गटसमन्वयक प्रा. एस. आर. करडुळे, प्रा. अविनाश भवर, डॉ. एस.आर. पटेल. डॉ. आर. जी. विधाते. डॉ. जी.पी. बोडखे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयोस्वयंसेवक अमोल धपाटे याने केले व आभार रासेयोस्वयंसेवक अक्षय खोटे याने केले.

## गुरूवार दि. ११/०१/२०१८

**गुरूवार दि. ११/०१/२०१८** नियमित वेळेप्रमाणे पहाटे स्वयंसेवकांनी आपली स्वयंस्वच्छता उरकल्यानंतर व्यायम योगासने व नाष्टा करून पहिल्या दिवशी केलेले ग्रुप कायम ठेवुन ठरल्याप्रमाणे कामाला सुरूवार केली. गावातील महादेव मंदिर, जि.प.प्रा.शाळा, ग्रामपंचायत परिसरातील पडलेले दगड, माती, उचलून एका बाजूला टाकुण, ग्रामस्थांनी सहभागातून आणलेली खडीची कच परिसरामध्ये व्यवस्थीत टाकण्याचे काम पाच ग्रुपला विभागुन दिले. मुलींच्या ग्रुपला साफ सफाई तर राहिलेल्या ग्रुपने झाडांना चुना व काऊ लावण्याचे व रंग रंगोटी करण्याचे काम दिले. सर्वांनी आपली कामे नियोजित वेळेत पूर्ण करून दूपारचे जेवन केले आणि विश्रांती घेतल्यानंतर श ुक्रवारच्या समारोप कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

दैनंदिन वेळेप्रमाणे सायंकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत विशेष कार्यक्रमाचे आकर्षण म्हणजे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडया निमित्त आयोजित केलेला कवी कट्टा कवि समंलन पार पडले. या कवि संमेलनामध्ये महाराष्ट्र भर ज्यांची ख्याती आहे, असे कवी नागेश शेलार, कवी हरिष हातवटे कवी युवराज वायभासे, कवी इंद्रकुमार झांजे, कवी अशोक उडाणे यांनी आपल्या बहारदार कवितेतून

प्रक्षकांची मने जिंकली. जात्यावरच्या ओवी पासून ते आधुनिक प्रेम कवितेची झालर कविसंमेलनातून सादर करण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंचपती श्री. महादेव शिंदे हे तर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एम. वाघुले. डॉ. बी. एस. खैरे डॉ. दत्ता नरसाळे प्रा. बाबु रणदिवे. सरपंच प्रा. राम बोडखे. श्री. घन:शाम शिंदे, शिवाजी मिसाळ महेश तरटे, कृष्णा बोडखे, नदीम शेख, रामकृष्ण आकोलकर, अंबादास शिर्के पोस्टमन सौ. रूपाली मिसाळ, उपसरपंच सौ. अयोध्या शिंदे. इ. महिला व मोठया संख्येने ग्रामस्थ व रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. शेख याकुब याने केले तर आभार निलेश खोटे याने मानले.

## शुक्रवार दि. १२/०१/२०१८

**शुक्रवार दि. १२/०१/२०१८** दिनचर्येप्रमाणे पहाटे उठुन स्वयंसेवकांनी आपले स्वच्छता, व्यायाम योगासेन उरकुन नाष्टा करण्यात आला. आज शिबीराचा समारोपाचा कार्यक्रम असल्यामुळे समारोप कार्यक्रमाच्या तयारीसाठी सर्वजणांना विभागुन काम देण्यात आले. समारोप कार्यक्रम ठिक ११:०० वाजता सुरू झाला. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आमदार तथा आनंद चॅरिटेबल संस्येचे अक्ष्यक्ष मा. भीमरावजी धोंडे साहेब हे होते व प्रमुख पाहुणे माजी आमदार साहेबरावजी दरेकर होते. आष्टी पंचायत समिती उपसभापती आदिनाथ सानप, टाकळी गावचे सरपंच मा. सावता ससाणे, पंचायत समिती सदस्य मा. दादासाहेब झांजे, सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच सौ. अयोध्य शिंदे मा. बलभीम तात्या सुंबरे, पत्रकार उत्तमराव बोडखे, ग्रामविकास अधिकारी परकाळे साहेब महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते. उपप्राचार्य डॉ. बी.एम. वाघुले आदी मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला व एन.एस.एस. गीता नंतर कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी. एम चव्हाण यांनी विशेष शिबीरात केलेल्या कामाबाबत व ग्रामस्थांच्या सहकार्य बद्दल

प्रास्ताविक केले. यानंतर शिबीरार्थी स्वयंसेवक पंकज अंबिलवादे, कृष्णा आंधळे सुखदेव लोखंडे, शेख याकुब, कु. सायली थोरवे, कु. कोमल नन्नवरे कु स्वप्नाली धोंडे यांनी आपले शिबीरातील अनुभव सांगितले. पत्रकार उत्तमराव बोडखे व सरपंच प्रा. राम बोडखे यांनी युवकांना दिशा देण्याचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. हे विचारातुन पटवून दिले. तर प्रमुख पाहुणे माजी आमदार मा. साहेबरावजी दरेकर यांनी अंधश्रध्देवर व स्वच्छतेबाबत संत गाडगेबाबांचे विचार मांडले. याप्रसंगी उत्कृष्ट शिबीरार्थी पंकज अंबिलवादे, कु. स्वप्नाली धोंडे या स्वयंसेवकांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्ष आमदार भीमरावजी धोंडेसाहेब यांनी शिबीर कालावधीत स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. व ग्रामंस्थांनी सराटेवडगाव आदर्श गाव करावे आदर्श गाव करणाऱ्या गावासाठी आमदार निधीतुन प्रथम गावास १० लाख रू. द्वितीय क्रमांकासाठी ५ लाख व तिसऱ्या क्रमांकासाठी २ लाख रू देण्याचे जाहिर केले.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन स्वयंसेवक पंकज अंबिलवादे याने केले तर आभार कार्यक्रमाधिकारी श्रीमती डॉ. जी. एस. जगताप यांनी मानले. सराटेवडगाव गावातील ग्रामपंचायत सदस्य. ग्रामस्थ, सर्व स्वयंसेवक महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थीनी प्राध्यापक सहकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

28-2-2018
PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

## • समारोप समारंभ •

शुक्रवार दि.१२/०१/२०१८ रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

**• अध्यक्ष •**

**मा. भीमरावजी धोंडे साहेब**

(आमदार, आष्टी-पाटोदा-शिरूर)

**• प्रमुख उपस्थिती •**

मा. उत्तमराव बोडखे (पत्रकार, झुंजारनेता)

मा. राजाराम नन्नवरे (चेअरमन, से.स.सो., सराटेवडगांव)

मा. बलभीम तात्या सुंबरे

मा. कोंडीभाऊ झांबरे

मा.परकाळे साहेब (ग्रामविकासअधिकारी,सराटेवडगांव)

मा. शिध्देश्वर शेंडगे (मुख्याध्यापक, जि.प.शा.,सराटेवडगांव)

**• आपले विनित •**

डॉ. एच.जी.विधाते
प्राचार्य

प्रा. राम बोडखे
सरपंच, सराटेवडगांव

सौ. अयोध्या महादेव शिंदे
उपसरपंच, सराटेवडगांव

प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण
कार्यक्रमाधिकारी

प्रा. डॉ. श्रीमती जी. एस.जगताप
कार्यक्रमाधिकारी

प्रा. डॉ. पी.एन. औटे
कार्यक्रमाधिकारी

ग्रा. पं. सदस्य- श्री. बाळकृष्ण तरटे, नबीबशेख, सौ. छाया गजघाट, सौ. कमलाबाई गुंड, सौ. रुपाली मिसाळ, श्री. विजय बोडखे श्री. कृष्णा बोडखे, सौ. संगिता बोडखे सर्व आजी माजी सरपंच, उपसरपंच, चेअरमन ग्रामपंचायत सदस्य सर्व तरूण मंडळ व ग्रामस्थ मौजे सराटेवडगांव ता. आष्टी, जि. बीड

सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, व प्राध्यापकेत्तर कर्मचारी वृंद.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि

## आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड ४१४२०२

यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# राष्ट्रीय सेवा योजना

“ जल संवर्धन व ग्रामस्वच्छतेसाठी युवा ”

## विशेष शिबीर २०१७-१८

दि. ६ जाने. २०१८ ते १२ जाने. २०१८

**NOT ME -BUT YOU**

• स्थळ •

मौजे सराटेवडगांव ता. आष्टी, जि. बीड

प्रति,
श्रीमान ______________________
______________________
______________________

• प्रेषक •

**प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते**

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,
कडा ता.आष्टी, जि. बीड

झुंजार नेता
शुक्रवार दि.५ जानेवारी २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L- Beed/20/2015-17

## सराटेवडगांव येथे धों[illegible] महाविद्यालयाचे रा.से.यो. शिबीर

कडा, दि.४ ( वार्ताहर ):- डॉ आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ६ जानेवारीपासून आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगांव येथे होणार आहे अशी माहिती प्राचार्य विधाते यांनी दिली. शनिवारी शिबिराचे उद्घाटन तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते होणार आहे, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ टी आर पाटील ,गटविकास अधिकारी आप्पासाहेब सरगर, झुंजार नेता चे निवासी संपादक श्रीपती माने, जेष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे , प्रफुल्ल सहस्रबुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे ,याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ विधाते हे राहणार आहेत. शिबिर कालावधीत प्रा संभाजी ओव्हाळ प्रा सज्जन गायकवाड, दत्तात्रय जिरेकर, प्रा भीमराज गावडे, तहसिलदार प्रदीप पांडुळे प्रदीप काथवटे, कैलास पन्हाळकर, संभाजी इंगळे , नरेंद्र बोठे,घनशाम दळवी, तालुका कृषी अधिकारी प्रमोद शिंदे ,कृष्णाजी मालकर, प्रा करडुळे ,तसेच दिनांक रोजी मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त हरिष हातवटे ,अभय शिंदे ,नागेश शेलार, इंद्रकुमार झांजे, युवराज वायभासे यांचे ११ कविसंमेलन होणार आहे, शिबिराचा समारोप शुक्रवार दिनांक १२ जानेवारी रोजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी राजाराम ननावरे , बलभीम सुंबरे, कोंडीबा झांबरे, उत्तम बोडखे, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचा ग्रामस्थांनी लाभ घेण्याचे आवाहन सरपंच राम बोडखे, उपसरपंच अयोध्या शिंदे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ भास्कर चव्हाण, प्रा डॉ पंडित आवटे, प्रा डॉ जगताप यांनी केले आहे.

बीड संकेत

संपादक-नरेन्द्र कांकरिया

e-mail- bhrbsanket@gmail.com

पो.र.नं. एल/बीड/०३/२०१५-१७

R.N.I. No.70487/94

बीड फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११०

# रा.से.यो. शिबीर म्हणजे माणुस घडवण्याची कार्यशाळा-प्रा.हंबर्डे

## आनंदराव धोंडे महाविद्यालयात पत्रकार दिनी रा.से.यो. शिबीराचे उद्घाटन



कडा दि.६ (बातमीदार): श्रम व सेवा एकत्रित आल्यावर माणुस तयार होतो, राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर म्हणजे माणुस घडविण्याची कार्यशाळा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रा.अनंत हंबर्डे यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन व पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थांनी प्राचार्य डॉ.हरीदास विधाते होते.

डॉ.आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठीयुवा शिबिर व दर्पण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे केले होते.

यावेळी व्यासपिठावर पो.नि. सय्यद शौकतअली, स.पो.नि. यशवंत बारवकर, विक्रम पोकळे, पो.कॉ. पठाण, गडकर, आजुमुद्दीन शेख, उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, प्रा.राम बोडखे, उपसरपंच युवराज देवकर, अयोध्या शिंदे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, भानुदास बोडखे, राजाराम नन्नवरे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, प्रफुल सहस्रबुद्धे, उत्तम बोडखे, भीमराव गुरव, बबन पगारे, दिगंबर बोडखे, रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, शरद रेडेकर, सचिन रानडे, प्रा.डॉ. विनोद ढोबळे, कासम शेख, अविनाश कदम, मुजाहीद सय्यद, गोपाळ वर्मा व इतरांची उपस्थिती होती.प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेची पूजा करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा.अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व कळते, शिबीरामध्ये माणसाचे मन व शरीर बदलले पाहिजे. प्रत्येकाने पावसाच्या पाण्याचा थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत, परिसर चांगला होईल व शासनाकडे काही मागण्याची गरज पडणार नाही. सामाजिक बांधिलकी स्विकारणारा जिवनात यशस्वी होतो.यावेळी पो.नि. सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पोलीस आपले मित्र आहेत, समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज आहे, प्रत्यकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावा असे सांगितले. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ.हरीदास विधाते यांनी सांगितले की, केरुळ येथे महाविद्यालयाचे पहिले शिबिर घेतले होते. त्यानंतर झालेल्या वेगवेगळ्या गावातील शिबीरामध्ये रस्ते, जलसंधारणाची कामे केली आहेत. दर्पण दिनाच्या निमित्ताने एक दिवस सर्व पत्रकार येथे श्रमदान करणार आहेत. सरपंच प्रा.राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगाव व आनंदवाडी हे दोन्ही गांवांनी वॉटर कप स्पर्धेत सहभाग घेतला आहे, शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करु, राजकारण सोडुन गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ३७७०७/१९८२ । वर्ष : ३६ अंक : ३५६

www.facebook.c

लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४+४ = २०, किंमत : ₹ ५.००

औरंगाबाद, रविवार, दि. ७ जानेवारी २०१८

# सराटेवडगाव येथे विशेष हिवाळी शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**आष्टी :** आपण केलेल्या दहा दिवसाच्या श्रमदानातून गाव बदलू शकत नाहीत; परंतु श्रमदान हे मनातून केले तर [illegible] कामाची सक्षम होऊन राष्ट्रांचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन माजी प्रचार्य अनंत हंबर्डे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्‌घाटन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त प्रा.हंबर्डे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास विधाते होते. व्यासपीठावर आष्टीचे पो.नि.सय्यद शौकत अली, स.पो.नि. यशवंत बारवकर, प्रफुल्ल सहस्रबुद्धे, सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच अयोध्या शिंदे, सिताराम पोकळे, उत्तम बोडखे, भीमराव गुरव, बबन पगारे आदी उपस्थित होते.

यावेळी पो.नि. सय्यद शौकत अली यांनी, पोलीस आपले मित्र आहेत, समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज असून, प्रत्यकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विक्रम पोकळे, सीताराम पोकळे, बलभीम सुंबरे, रघुनाथ कर्डिले, प्रा.डॉ.विनोद ढोबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, दादासाहेब बन यांनी केले, प्रा. डॉ. पंडीत औटे आभार मानले.

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

L/Beed/52/2015-17 RNI

...ांक ७ जानेवारी २०१८ रविवार ई-पेपर : www.parshvbhumi.com


# सेवा आणि श्रममुल्य यांच्या समन्वयातुन माणुस घडतो–प्रा.अनंत हंबर्डे



आष्टी (प्रतिनिधी):–मानवी जीवनात श्रमाच्या प्रतिष्ठेला आणि सेवाभावाला अत्यंत महत्व असून या दोहोंचा चांगला समन्वय घडून आल्यास माणूस घडतो.त्यामुळे युवा पिढीने राष्ट्र घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून प्रत्यक्ष श्रमदान करून सेवाभावी वृत्तीचे प्रदर्शन करावे.त्यातून चांगला माणूस पान ६ वर

## सेवा आणि श्रममुल्य यांच्या

घडविण्याचे काम या क्षेत्रातून होणार आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी केले. आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतासाठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंतीच्या कार्यक्रमानिमित्तजेष्ठ पत्रकार प्रा.हंबर्डे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास विधाते होते. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे आष्टीचे पो.नि.सय्यद शौकतअली, स.पो.नि.यशवंत बारवकर,प्रफुल्ल सहस्रबुद्धे,सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच अयोध्या शिंदे,सिताराम पोकळे,उत्तम बोडखे,भीमराव गुरव,बबन पगारे आदि मान्यवर व्यासपीठाव उपस्थित होते. यावेळी आष्टीचे पोलिस निरीक्षक सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त के.बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली.पोलीस आपले मित्र आहेत,समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज असून, प्रत्यकाने समाज उन्नती साठी प्रयत्न करावा..यावेळी आमच्या महाविद्यालयाने आज पर्यंत ज्या गावात श्रमदान केले आहेत.त्या गावात नकीच हेवा वाटेल असे काम राष्ट्रीय सेवा योजनेतून झाले आहे.त्यांमुळे गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना समाधान लाभले असल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.हरिदास विधाते यांनी सांगितले. सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगाव व आनंदवाडी हे दोन्ही गांवांनी वॉटर कप स्पर्धेत सहभाग घेतला आहे,शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करू,राजकारण सोडुन गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचेही आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी बबन पगारे , विक्रम पोकळे, सिताराम पोकळे,उत्तम बोडखे ,प्रफुल्ल सहस्रबुद्धे , बलभीम संबरे,रघुनाथ कर्डीले, प्रा.डॉ.विनोद ढोबळे,आष्टीचे पो.नि.शौकतआली सय्यद ,प्रा.राम बोडखे यांचे भाषणे झाली. या कार्यक्रमास भीमराव गुरव,गणेशदळवी , संतोष सानप,दादा बन ,शरद तळेकर ,दिगांबर बोडखे ,सचिन रानडे ,शरद रेडेकर , अविनाश कदम , मुजाहीद्दीन सय्यद ,शेख कासम,गोपाळ वर्मा,भानुदास बोडखे , राजाराम नन्नवरे ,रंगनाथ बोडखे , भगवान तरटे ,रामभाऊ नन्नवरे ,प्रा.डा .जी.पी.बोडखे , उपप्राचार्य डा.भगवान वाघुले ,कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.भास्कर चव्हाण,दादासाहेब बन यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पंडीत औटे यांनी मानले.

पुण्य नगरी
smart Beed

# सेवा, श्रममूल्य यांच्या समन्वयातून माणूस घडतो : प्रा.अनंत हंबर्डे



कडा (प्रतिनिधी) मानवी जीवनात श्रमाच्या प्रतिष्ठेला आणि सेवाभावाला अत्यंत महत्व असून या दोहोंचा चांगला समन्वय घडून आल्यास माणूस घडतो. त्यामुळे युवा पिढीने राष्ट्र घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून प्रत्यक्ष श्रमदान करुन सेवाभावी वृत्तीचे प्रदर्शन करावे.त्यातून चांगला माणूस घडविण्याचे काम या क्षेत्रातून होणार आहे.असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त प्रा.हंबर्डे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास विघाते होते. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे आष्टीचे पो.नि.सय्यद शौकतअली, स.पो.नि.यशवंत बारवकर,प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,प्रा.राम बोडखे, उपसरपंच अयोध्या शिंदे, सितारामं पोकळे, उत्तम बोडखे,भिमराव गुरव, बबन पगारे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी आमच्या महाविद्यालयाने आज पर्यंत ज्या गावात श्रमदान केले आहेत.त्या गावात नक्कीच हेवा वाटेल असे काम राष्ट्रीय सेवा योजनेतून झाले आहे.त्यामुळे गावक-यांना व विद्यार्थ्यांना समाधान लाभले असल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.हरिदास विघाते यांनी सांगितले. सरपंच प्रा राम बोडखे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विक्रम पोकळे, सिताराम पोकळे,बलभीम सुंबरे,रघुनाथ कडीर्ले, प्रा.डॉ.विनोद ढोबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. भास्कर चव्हाण,दादासाहेब बन यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पंडीत औटे मानले.

# आई-वडिलांना काम सांगता असाल तर तो शिक्षणाचा पराभव-प्रा.हंबर्डे

शेख कासम। कडा

दि.६ आई-वडिलांना काम सांगत असाल तर तो शिक्षणाचा पराभव आहे. यासाठी श्रम व सेवा एकत्रित आल्यावर माणुस तयार होतो, राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर म्हणजे माणुस घडविण्याची कार्यशाळा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रा. अनंत हंबर्डे यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन व पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ हरीदास विधाते होते.

डॉ आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठी युवा शिबिर व दर्पण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे केले होते. यावेळी व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून, पो. नि. सय्यद शौकतअली , स. पो. निरीक्षक यशवंत बारवकर, पो कॉ पठाण, गडकर, प्रफुल्ल सहस्रबुद्धे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आजुमुद्दीन शेख, सय्यद रहीमान उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच युवराज देवकर, अयोध्या शिंदे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, भानुदास बोडखे, चेअरमन राजाराम नन्नवरे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, भीमराव गुरव, बबन पगारे, दिगंबर बोडखे, रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, शरद रेडेकर, सचिन रानडे, प्रा. डॉ. विनोद ढोबळे, कासम शेख, अविनाश कदम, मुजाहीद सय्यंद, गोपाळ वर्मा व इतरांची उपस्थिती होती.

प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेची पूजा करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व कळते, शिबीरामध्ये माणसाचे मन व शरीर बदलेले पाहिजे. प्रत्येकाने पावसाच्या पाण्याचा थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत, परिसर चांगला होईल व शासनाकडे काही मागण्याची गरज पडणार नाही. सामाजिक बांधिलकी स्विकारणारा जिवनात यशस्वी होतो.

यावेळी पो. नि. सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पोलीस देखील समाज घडविण्याचे कार्य करतो पोलीस आपले मित्र आहेत, समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज आहे, प्रत्यकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावा असे सांगितले.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी सांगितले की, केरुळ येथे महाविद्यालयाचे पहिले शिबिर घेतले होते. त्यानंतर झालेल्या वेगवेगळ्या गावातील शिबीरामध्ये रस्ते, जलसंधारणाची कामे केली आहेत. दर्पण दिनाच्या निमित्ताने एक दिवस सर्व पत्रकार येथे श्रमदान करणार आहेत. सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगाव व आनंदवाडी हे दोन्ही गांवांनी वॉटर कप स्पर्धेत सहभाग घेतला आहे, शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करू, राजकारण सोडुन गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे.आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे वतीने दर्पण दिनाच्या निमित्ताने सर्व पत्रकारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पत्रकार उत्तमराव बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी मतभेद विसरून एकत्र यावे. यावेळी प्रा डॉ बापु खैरे, प्रा डॉ भाऊसाहेब काळे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे, फिरोज शेख यांच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिबीरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी विक्रम पोकळे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, बबन पगारे, रघुनाथ कर्डीले, प्रा. डॉ. विनोद ढोबळे, यांची भाषणे झाली. सुत्रसंचलन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण व पत्रकार दादासाहेब बन यांनी केले, उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पंडीत औटे यांनी केले.

शेतकऱ्यांचे

# वादळ

स्थापना वर्ष १९९४

ादक:-शेखर कुमार E-mail:- 1) shet.wadal@gmail.com 2) editorshekhar.beed@gmail.com
मो.क्र.9822535796
POST REGD NO.L-/09/Beed/2015-17
पाने-४
किंमत १ रूपये

। सोमवार दि.८ जानेवारी २०१८ । वर्ष १० वे । अंक १८ वा RNI No.MAH/MAR. 2008/28394. पान-१


# जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे आयोजन-प्रा.विधाते

*कडा (प्रतिनिधी):- डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतासाठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबीर ६ जानेवारीपासून आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे होणार आहे अशी माहिती प्राचार्य विधाते यांनी दिली.*



शिबीराचे उद्घाटन तहसिलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते.होणार आहे. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा.डॉ.टी.आर.पाटील गटविकास अधिकारी अप्पासाहेब सरगर, झुंजारनेताचे निवासी संपादक श्रीपती माने, ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विधाते हे राहणार आहेत. शिबिर कालावधीत प्रा.संभाजी ओव्हाळ, प्रा.सज्जन गायकवाड, दत्तात्रय जिरेकर, प्रा.भीमराज गावडे, तहसिलदार प्रदीप पांडुळे, प्रदीप काथवटे, कैलास पन्हाळकर, संभाजी इंगळे, नरेंद्र बोठे, घनशाम दळवी, तालुका कृषी अधिकारी प्रमोद शिंदे, कृष्णाजी मालकर, प्रा.करडुळे, तसेच मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त हरिष हातवटे, अभय शिंदे, नागेश शेलार, इंद्रकुमार झांजे, युवराज वायभसे यांचे ११ कवि संमेलन होणार आहे. शिबीराचा समारोप शुक्रवार दि.१२ जानेवारी रोजी आ.भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी राजाराम ननावरे, बलभीम सुंबरे, कोंडीबा झांबे, उत्तम बोडखे, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचा ग्रामस्थांनी लाभ घेण्याचे आवाहन सरपंच राम बोडखे, उपसरपंच आयोध्या शिंदे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.डॉ.पंडित आवटे, प्रा.डॉ.जगताप यांनी केले आहे.

झुंजार नेता

सोमवार, दि. ८ जानेवारी २०१८

पान ३

# सराटेवडगांव येथे दर्पण दिन साजरा, श्रम व सेवा एकत्रित आल्यावर माणुस तयार होतो – अनंत हंबर्डे

कडा ,दि.०७ (प्रतिनिधी):- श्रम व सेवा एकत्रित आल्यावर माणुस तयार होतो, राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर म्हणजे माणुस घडविण्याची कार्यशाळा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रा. अनंत हंबर्डे यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन व पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ हरीदास विधाते.होते.

डॉ आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठीयुवा शिबिर व दर्पण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगांव येथे केले होते.

यावेळी व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून, पो. नि. सय्यद शौकतअली , स. पो. निरीक्षक यशवंत बारवकर, विक्रम पोकळे, पो कॉ पठाण, गडकर, प्रफुल्ल सहस्रबुद्धे, उत्तमराव बोडखे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आजुमुद्दीन शेख, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्रा. राम बोडखे, उपसरपंच युवराज देवकर, अयोध्या शिंदे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, भानुदास बोडखे, चेअरमन राजाराम नन्नवरे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर.शेंडगे, भीमराव गुरव,दादा बन, बबन पगारे, दिगंबर बोडखे, रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, शरद रेडेकर, सचिन रानडे, प्रा. डॉ. विनोद ढोबळे, कासम शेख, अविनाश कदम, मुजाहीद सय्यद, गोपाळ वर्मा व इतरांची उपस्थिती होती.

प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जाभेकर व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेची पूजा करुन अभिवादन करण्यात आले. पुढे बोलतांना प्रा. अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्त्व कळते, शिबीरामध्ये माणसाचे



मन व शरीर बदलेले पाहिजे. प्रत्येकाने पावसाच्या पाण्याचा थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत, परिसर चांगला होईल व शासनाकडे काही मागण्यांची गरज पडणार नाही. सामाजिक बांधिलकी स्विकारणारा जिवनात यशस्वी होतो.

यावेळी पो. नि. सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जाभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पोलीस आपले मित्र आहेत, समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज आहे, प्रत्यकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावा असे सांगितले. अध्यक्षपदावरुन बोलतांना प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी सांगितले की, केरुळ येथे महाविद्यालयांचे पहिले शिबिर घेतले होते. त्यानंतर झालेल्या वेगवेगळ्या गावातील शिबीरामध्ये रस्ते, जलसंधारणाची कामे केली आहेत. दर्पण दिनाच्या निमित्ताने एक दिवस सर्व पत्रकार येथे श्रमदान करणार आहेत. सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगांव व आनंदवाडी हे दोन्ही गावांनी वॉटर कँप स्पर्धेत सहभाग घेतला आहे, शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करु, राजकारण सोडुन गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे.आनंदराव धोंडे महाविद्यालयांचे वतीने दर्पण दिनाच्या निमित्ताने सर्व पत्रकारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पत्रकार उत्तमराव बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी मतभेद विसरुन एकत्र यावे. यावेळी प्रा डॉ बापु खैरे, प्रा डॉ भाऊसाहेब काळे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे, फिरोज शेख यांच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिबीरारर्थि व ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी विक्रम पोकळे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, बबन पगारे, रघुनाथ कर्डीले, प्रा. डॉ. विनोद ढोबळे, याची भाषणे झाली. सुत्रसंचलन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण व पत्रकार दादासाहेब बन यांनी केले, उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पंडीत औटे यांनी केले.

# लोकाशा

संपादक - विजयराज बंब No-L/18/RNP/06/Beed/2013-15

र, दि. ८ जानेवारी २०१८ ● Email-majhalokasha@gmail.com ● बीड, औरंगाबाद-जालना, लातूर-उस्मानाबाद, नांदेड-परभणी-हिंगोली येथून एकाच


## सेवा आणि श्रममुल्य यांच्या समन्वयातून माणूस घडतो -प्रा.हंबर्डे

आष्टी, दि.७ (प्रतिनिधी):- मानवी जीवनात श्रमाच्या प्रतिष्ठेला आणि सेवाभावाला अत्यंत महत्व असून या दोहोंचा चांगला समन्वय घडून आल्यास माणूस घडतो.त्यामुळे युवा पिढीने राष्ट्र घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून प्रत्यक्ष श्रमदान करुन सेवाभावी वृत्तीचे प्रदर्शन करावे.त्यातून चांगला माणूस घडविण्याचे काम या क्षेत्रातून होणार आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतासाठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंतीच्या कार्यक्रमानिमित्तजेष्ठ पत्रकार प्रा.हंबर्डे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास विधाते होते. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे आष्टीचे पो.नि.सय्यद शौकतअली, स.पो.नि. यशवंत बारवकर,प्रफुल्ल सहस्रबुद्धे, सरपंच प्रा. राम बोडखे, उपसरपंच अयोध्या शिंदे, सिताराम पोकळे,उत्तम बोडखे,भीमराव गुरव, बबन पगारे आदि मान्यवर व्यासपीठाव उपस्थित होते.

यावेळी बबन पगारे, विक्रम पोकळे, सिताराम पोकळे,उत्तम बोडखे ,प्रफुल्ल सहस्रबुद्धे , बलभीम सुंबरे,रघुनाथ कर्डीले, प्रा.डॉ.विनोद ढोबळे, आष्टीचे पो.नि. शौकतआली सय्यद, प्रा.राम बोडखे यांचे भाषणे झाली. या कार्यक्रमास भीमराव गुरव, गणेशदळवी, संतोष सानप, दादा बन, शरद तळेकर, दिगांबर बोडखे,



सचिन रानडे , शरद रेडेकर, अविनाश कदम, मुजाहीद्दीन सय्यद , शेख कासम,गोपाळ वर्मा, भानुदास बोडखे, राजाराम नन्नवरे, रंगनाथ बोडखे, भगवान तरटे, रामभाऊ नन्नवरे , प्रा.डॉ.जी.पी. बोडखे, उपप्राचार्य डा.भगवान वाघुले , कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. भास्कर चव्हाण, दादासाहेब बन यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ.पंडीत औटे यांनी मानले.

झुंजार नेता
सोमवार दि. ८ जानेवारी २०१८ R N I NO.16856 /68, Postal No - L- Bee

# सेवा आणि श्रममुल्य यांच्या समन्वयातून माणूस घडतो - प्रा. अनंत हंबर्डे

आष्टी ,दि.०७ (प्रतिनिधी):- मानवी जीवनात श्रमाच्या प्रतिष्ठेला आणि सेवाभावाला अत्यंत महत्व असून या दोहोंचा चांगला समन्वय घडून आल्यास माणूस घडतो.त्यामुळे युवा पिढीने राष्ट्र घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून प्रत्यक्ष श्रमदान करुन सेवाभावी वृत्तीचे प्रदर्शन करावे.त्यातून चांगला माणूस घडविण्याचे काम या क्षेत्रातून होणार आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व ग्रामस्वच्छतासाठी युवा विशेष हिवाळी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन व आचार्य बाळशास्त्री जाभेकर याची जयंतीच्या कार्यक्रमानिमित्तजेष्ठ पत्रकार प्रा.हंबर्डे बोलत होते.कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी प्राचार्य हरिदास विधाते होते. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे आष्टीचे पो.नि.सय्यद शौकतअली,स.पो.नि.यशवंत बारवकर,प्रफुल्ल सहस्रबुद्धे,

सरपंच प्रा. राम बोडखे,उपसरपंच अयोध्या शिंदे,सिताराम पोकळे,उत्तम बोडखे,भीमराव गुरव,बबन पगारे आदि मान्यवर व्यासपीठाव उपस्थित होते.

यावेळी आष्टीचे पोलिस निरीक्षक सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिनानिमित्त कै. बाळशास्त्री जाभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली.पोलीस आपले मित्र आहेत,समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज असून, प्रत्यकाने समाज उन्नती साठी प्रयत्न करावा.यावेळी आमच्या महाविद्यालयाने आज पर्यंत ज्या गावात श्रमदान केले आहेत.त्या गावात नक्कीच हेवा वाटेल असे काम राष्ट्रीय सेवा योजनेतून झाले आहे.त्यामुळे गावक-यानां व विद्यार्थ्यांना समाधान लाभले असल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.हरिदास विधाते यांनी सांगितले.

सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगांव व आनंदवाडी हे दोन्ही गावांनी वॉटर कँप स्पर्धेत सहभाग घेतला आहे,शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करु,राजकारण सोडुन गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचेही आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी बबन पगारे , विक्रम पोकळे, सिताराम पोकळे,उत्तम बोडखे ,प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे ,बलभीम सुंबरे, रघुनाथ कर्डीले, प्रा.डॉ.विनोद ढोबळे,आष्टीचे पो.नि.शौकतआली सय्यद ,प्रा.राम बोडखे यांचे भाषणे झाली. या कार्यक्रमास भीमराव गुरव,गणेशदळवी , संतोष सानप,दादा बन ,शरद तळेकर ,दिगांबर बोडखे ,सचिन रानडे ,शरद रेडेकर , अविनाश कदम , मुजाहीद्दीन सय्यद ,शेख कासम,गोपाळ वर्मा,भानुदास बोडखे , राजाराम नन्नवरे ,रंगनाथ बोडखे , भगवान तरटे ,रामभाऊ नन्नवरे ,प्रा.डा .जी.पी.बोडखे , उपप्राचार्य डा.भगवान वाघुले ,कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, दादासाहेब बन यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पंडीत औटे यांनी मानले.

# रा.से.यो. शिबीर म्हणजे माणुस घडण्याची कार्यशाळा-प्रा.हंबर्डे

## आनंदराव धोंडे महाविद्यालयात पत्रकार दिनी रा.से.यो. शिबीराचे उद्घाटन

कडा (बातमीदार):- श्रम व सेवा एकत्रित आल्यावर माणूस तयार होतो, राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर म्हणजे माणूस घडविण्याची कार्यशाळा आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रा. अनंत हंबर्डे यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगाँव येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन व पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ .हरिदास विधाते होते.

डॉ.आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना जलसंवर्धन व ग्रामस्वच्छता साठीयुवा शिबिर व दर्पण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे केले होते.

यावेळी व्यासपिठावर पो.नि सय्यद शौकतअली, स.पो.नि यशवंत बारवकर, विक्रम पोकळे, पो.कॉ.पठाण, गडकर, आजुमुद्दीन शेख, उपप्रायार्य डॉ. भगवान वाघुले, प्रा. राम बोडखे, उपसरपंच युवराज देवकर, आयोध्या शिंदे, सिताराम पोकळे, बलभीम सुंबरे, भानुदास बोडखे, राजाराम नन्नवरे, मुख्याध्यापक सिध्देश्वर शेंडगे, प्रफुल्ल सहस्त्रबुध्दे, उत्तम बोडखे, भीमराव गुरव, बबन पगारे, दिगंबर बोडखे, रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, शरद रेडेकर, सचिन रानडे, प्रा.डॉ.विनोद ढोबळे, कासम शेख, अविनाथ कदम, मुजाहीद सय्यद, गोपाळ वर्मा व इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेची पूजा करुन अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. अनंत हंबर्डे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रमदानाचे महत्व कळते, शिबीरामध्ये माणसाचे मन व शरीर बदलेले पाहिजे. प्रत्येकाने पावसाच्या पाण्याचा थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत, परिसर चांगला होईल व शासनाकडे काही मागण्याची गरज पडणार नाही. सामाजिक बांधिलकी स्विकारणारा जीवनात यशस्वी होतो. यावेळी. पो.नि सय्यद शौकत अली यांनी आपल्या भाषणात दर्पण दिननिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पोलीस आपले मित्र आहेत, समाजाला व्यवस्थित ठेवण्यासाठी पोलिसांची गरज आहे, प्रत्यकाने समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावा असे सांगितले. अध्यक्षपदावरुन बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, केरुळ येथे महाविद्यालयाचे पहिले शिबिर घेतले होते. त्यानंतर झालेल्या वेगवेगळ्या गावातील शिबीरामध्ये रस्ते, जलसंधारणाची कामे केली आहेत. दर्पण दिनाच्या निमित्ताने एक दिवस सर्व पत्रकार येथे श्रमदान करणार आहेत. सरपंच प्रा. राम बोडखे यांनी सांगितले की, सराटेवडगाव व आनंदवाडी हे दोन्ही गावांनी वॉटर कम स्पर्धेत सहभाग घेतला आहे, शिबीराचे माध्यमातून गावाचा विकास करु, राजकारण सोडून गावच्या विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

झुंजार नेता

मंगळवार दि. ९ जानेवारी २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L- Beed/20/2

# सराटेवडगांव रस्ता दुरुस्तीचे काम विद्यार्थी, ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच यांच्या श्रमदानातुन पुर्ण

आष्टी (प्रतिनिधी )आष्टी तालुक्यातील टाकळी अमियाफाटा - सराटेवडगांव या रस्त्याची दुरुस्ती काम आनंदराव धोंडे महाविद्यालयांचे एनएसएसचे विद्यार्थी ग्रा.पं.सरपंच प्रा.राम बोडखे ,उपसरपंच महादेव शिंदे , ग्रा.पं.सदस्य विजय बोडखे , कृष्णा बोडखे ,गौतम बोडखे , शिवाजी मिसाळ , टाकळीचे उपसरपंच रामदास चौधरी ,विष्णु ससाणे ,फिरोज पटेल, भगवान तरटे आदि



ग्रामस्थांनी काम केले.यावेळी जि.प.चे माजी सदस्य देवीदास धस यांनी डिजेल खर्चाने रोलर दिला. ट्रक्टरने १२ मुरुमाच्या खेपा या रस्त्यावर टाकण्यात आल्या.विशेष म्हणजे शासनाच्या ठेकेदारी पध्दतीने केल्या जाणाऱ्या कामापेक्षा चांगल्या प्रकारे हे काम सरपंच प्रा.राम बोडखे यांनी करुन घेतले आहे.या कामाबद्दल सराटेवडगांवकरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

रेंच्या
जिल्हयात
सप्ताह

प्रमुख स्व बाळासाहेब
ार्याचा भगवा सप्ताह
ाभरातील शिवसेना
ांडे व सचिन मुळूक
ाळासाहेब ठाकरेंच्या
या धोरणावर शिवसेना
▶▶पान २ वर

# झुंजार नेता

बीड , महाराष्ट्र ■ रविवार दि. १४ जानेवारी २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 20




आष्टी : आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे सराटे वडगाव येथे स. र्स. योजने अंतर्गत शिबीराच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, उपसभापती आजिनाथ सानप, प्रा. दादासाहेब झांजे, प्राचार्य हरिदास विधाते व आदी समोर उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थ दिसत आहेत. (छाया : शरद गर्जे.)

# झुंजार नेता

महाराष्ट्र ■ सोमवार दि. १५ जानेवारी २०१८ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ B


## युवकांनी श्रमदानाला महत्त्व देऊन श्रमाचे मुल्य जोपासावे :- आ भीमराव धोंडे

, दि.१४ ( वार्ताहर ):- श्रमाला मोठे मुल्य आहे, कांनी एकत्रित येऊन आपल्या मातीत श्रमदान करून जोपासण्याचे काम करावे, एकीने श्रमदान केल्यास नाचा खरा आनंद मिळतो असे प्रतिपादन आ. भीमराव यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कडा ल आनंदराव धोंडे महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण ाष्ट्रमुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित य सेवा योजना शिबीराचे समारोपप्रसंगी कार्यक्रमाचे क्षस्थपदावरून आ. भीमराव धोंडे बोलत होते. यावेळी पिठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार साहेबराव , उपसभापती आदिनाथ सानप, पं स सदस्य प्रा. ाहेब झांजे, पांडुरंग गावडे, सरपंच व उद्योगक सावता , सत्यवान ढोबळे, माजी प. स. सदस्य भानुदास , चेअरमन दादासाहेब हजारे, बबन सुंबरे, राजाराम नन्नवरे, पोलीस उपनिरीक्षक शेख, माजी सरपंच झुंबर चव्हाण, सामाजिककार्यकर्ते बाळासाहेब भुकन, माजी सरपंच बबनराव औटे, उत्तमराव बोडखे, प्राचार्य डॉ हरीदास विधाते, उपसरपंच अयोध्या शिंदे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, शिवाजी चौधरी, शिवाजी नन्नवरे, सरपंच प्रा. राम बोडखे याची उपस्थिती होती.



पुढे बोलतांना आ भीमराव धोंडे यांनी सांगितले की, कुकडीचे पाणी सीना धरणातुन आष्टी तालुक्यातील मेहेकरीत आल्याने या भागाच्या विकासासाठी चालना मिळाली आहे, येत्या दोन वर्षात उजनीचे पाणी आष्टी तालुक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, ग्रामस्थांनी सराटेवडगांव आदर्श करावे, वॉटर कँप स्पर्धेत तालुक्यातुन पहिले आदर्श गाव करणाऱ्या गावांसाठी आमदार निधीतून १० लाख, व्दितीय क्रमांकासाठी ५ व तिसऱ्या नंबरसाठी २ लाख रुपये देण्यात येतील. सराटे वडगावाने मला खुप सहकार्य केले आहे, गावातील माझे मित्र स्व. निजाम पटेल यांचे नाव मेहेकरी शाळेला दिले आहे. शिक्षणाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, सराटेवडगावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, यप्रसंगी माजी आ. साहेबराव दरेकर यांनी सांगितले, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे सर्वत्र स्वच्छता होते, गाव स्वच्छ नाही तर, प्रत्येकाची मने स्वच्छ पाहीजेत. प्रत्येकाने आई-वडीलांची सेवा करावी, त्यांना चांगले सांभाळावे महाराजांनी फक्त समाजप्रबोधन न करता आपल्या बोलण्याची अंमलबजावणी करावी. याप्रसंगी प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी सांगितले की, शिबिरातुन ग्रामस्थांवर श्रमाचे संस्कार होतात व स्वच्छतेला चालना मिळेते. यावेळी सरपंच प्रा. राम बोडखे, पत्रकार उत्तम बोडखे, शिवदास नन्नवरे, शिबिरार्थी सायली थोरवे, कृष्णा आंधळे, कोमल नन्नवरे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ भास्कर चव्हाण यांनी सांगितले की, ग्रामस्थांनी श्रमदानासाठी मोलाचे सहकार्य केले, रस्ता दुरुस्ती व गावांची स्वच्छता केली. यावेळी उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले, इंजि. पांडुरंग बोडखे, उपअभियंता तांदळे, माऊली बोडखे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे, प्रा. डॉ. पंडीत औटे, फिरोज शेख, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, प्रा. दत्तात्रय नरसाळे, पोकळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिबीरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. डॉ गोपीनाथ बोडखे व पंकज आंबीलवादे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. जी एस जगताप यांनी मानले.

बीड संकेत

e-mail- bhrbsanket@gmail.com संपादक-नरेन्द्र कांकरिया

फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११० R.N.I. No.70487/94 पो.र.नं. एल/१३/एसटीएस/बीड २०१

# युवकांनी श्रमदानाला महत्त्व देऊन श्रमाचे मुल्य जोपासावे-आ.भीमराव धोंडे

कडा दि.१४ (बातमीदार): श्रमाला मोठे मुल्य आहे, युवकांनी एकत्रित येऊन आपल्या मातीत श्रमदान करून मुल्य जोपासण्याचे काम करावे, एकीने श्रमदान केल्यास जिवनाचा खरा आनंद मिळतो असे प्रतिपादन आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे समारोपप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थपदावरून आ.भीमराव धोंडे बोलत होते.



यावेळी व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.साहेबराव दरेकर, उपसभापती आदिनाथ सानप, प्रा.दादासाहेब झांजे, पांडुरंग गावडे, सरपंच सावता ससाणे, सत्यवान ढोबळे, भानुदास बोडखे, दादासाहेब हजारे, बबन सुंबरे, राजाराम नन्नवरे, पोलीस उपनिरीक्षक शेख, प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, अयोध्या शिंदे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, शिवाजी चौधरी, शिवाजी नन्नवरे, सरपंच प्रा.राम बोडखे, झुंबर चव्हाण, बाळासाहेब भुकन, बबनराव औटे, उत्तम बोडखे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.भीमराव धोंडे यांनी सांगितले की, कुकडीचे पाणी सीना धरणातुन आष्टी तालुक्यातील मेहेकरीत आल्याने या भागाच्या विकासासाठी चालना मिळाली आहे, येत्या दोन वर्षात उजनीचे पाणी आष्टी तालुक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, ग्रामस्थांनी सराटे वडगाव आदर्श करावे, वॉटर कप स्पर्धेत तालुक्यातुन पहिले आदर्श गांव करणाऱ्या गावांसाठी आमदार निधीतून १० लाख, व्दितीय क्रमांकासाठी ५ व तिसऱ्या नंबरसाठी २ लाख रुपये देण्यात येतील. सराटे वडगावाने मला खुप सहकार्य केले आहे, गावातील माझे मित्र स्व.निजाम पटेल यांचे नाव मेहेकरी शाळेला दिले आहे. शिक्षणाचा (पान दोन वर)

## युवकांनी श्रमाला महत्व...

उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, सराटेवडगावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, याप्रसंगी माजी आ.साहेबराव दरेकर यांनी सांगितले, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे सर्वत्र स्वच्छता होते, गाव स्वच्छ नाही तर, प्रत्येकांची मने स्वच्छ पाहीजेत. प्रत्येकाने आई-वडीलांची सेवा करावी, त्यांना चांगले सांभाळावे महाराजांनी फक्त समाजप्रबोधन न करता आपल्या बोलण्याची अमंलबजावणी करावी.

याप्रसंगी प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी सांगितले की, शिबिरातुन ग्रामस्थांवर श्रमाचे संस्कार होतात व स्वच्छतेला चालना मिळेते. यावेळी सरपंच प्रा.राम बोडखे, उत्तम बोडखे, शिवदास नन्नवरे, शिबिरार्थी सायली थोरवे, कृष्णा आंधळे, कोमल नन्नवरे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ भास्कर चव्हाण यांनी सांगितले की, ग्रामस्थांनी श्रमदानासाठी मोलाचे सहकार्य केले, रस्ता दुरुस्ती व गावाची स्वच्छता केली. यावेळी उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, इंजि.पांडुरंग बोडखे, उपअभियंता तांदळे, माऊली बोडखे, प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे, प्रा.डॉ.पंडीत औटे, फिरोज शेख, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, प्रा.दत्तात्रय नरसाळे, पोकळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिबीरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा.डॉ गोपीनाथ बोडखे व पंकज आंबीलवादे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.जी.एस. जगताप यांनी मानले.

Opening ceremoney of special camp and celebration of Journalist day






Villagers & NSS volunteers busy in Yoga Experiment





NSS Volunteers busy in cleanliness drive





Volunteers and villagers jointly cleaning school campus of adopted village Anandwadi Saratewadgaon








Volunteers cleaning adopted village



आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबीर अहवाल

# २०१८-२०१९

o/c o/c

Anand Charitable Sanstha Ashti's

# ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

(Arts, Commerce & Science)

TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202

☎ 02441- 239621

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com

NAAC GRADE - "A" ISO 9001:2008 Certification Principal Dr. H.G. Vidhate

Ref. No.ADMK / 2018-2019/348 Date: / /201

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय :— "विशेष शिबीर" सन २०१८—१९ चा अहवाल स्विकारणे बाबत.....

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१८—१९ या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या विशेष शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सोबत :—
१. **"विशेष शिबीर"** अहवाल
२. फोटो
३. पेपर कात्रण
४. स्वयंसेवक उपस्थिती पत्रक

दि - 09.01.2019

ग्रामपंचायत सराटेवडगांव आनंदवाडी

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, 'आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविदयालय' कडा, ता. आष्टी, जि. बीड यांचे 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग विशेष शिबीर मौजे सराटेवडगाव (आनंदवाडी) ता. आष्टी. जि. बीड येथे दिनांक 03.01.2019 ते 09.01.2019 या कालावधीत संपन्न झाले. शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकानी पाणी फाऊंडेशनच्या प्रशिक्षण केंद्राच्या जागेची साफसफाई करण्यात आली. त्याचबरोबर गावातील सांडपाण्याची गटारे, रस्ते व सार्वजनिक परिसराची साफसफाई केली. तसेच माथावरती सी. सी. टी., गॅबीयन बंधारे, मातीनाला इत्यादींची कामे करण्यात आली.

त्याचबरोबर बौध्दीक कार्यक्रमामध्ये 'अंधश्रध्दा निर्मुलन', 'जलसंवर्धन व जलव्यवस्थापन', 'ग्राम नवचेतना', 'व्यक्तिमत्व विकास', 'मराठी भाषा संवर्धन व साक्षरतेचे महत्व' इत्यादी बाबत मार्गदर्शन, जनजागृती, व प्रबोधन करुन एकंदरीत 'राष्ट्रीय सेवा योजना' शिबीर गावाच्या विकासासाठी व भविष्यात पाणी फाऊंडेशन तर्फे होणाऱ्या "सत्यमेव जयते" वाटर कप स्पर्धेसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन ठरले.

करिता प्रमाणपत्र देण्यात येते.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव
आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव
आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

ता. आष्टी जि.बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

## अहवाल

### राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१८–१९

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा जि.बीड व रासेयो विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो विशेष शिबीर २०१८–१९ चे आयोजन दिनांक ०३.०१.२०१९ ते ९.१.२०१९ दरम्यान मौजे सराटेवडगांव ता.आष्टी जि.बीड येथे करण्यात आले होते.

सदर शिबीराचे उदघाटन गुरुवार दिनांक ३.१.२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते यांचे अध्यक्षतेखाली व सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री राजाराम नन्नवरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सराटेवडगावचे सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे उपसरपंच पती महादेव शिंदे, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे, ग्रा. पं. सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक, सेवा सोसायटीचे चेअरमन, तरुणमित्र व जि. प. प्रा. शा. मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी यांच्या भेटी घेवून समन्वय व नियोजन करण्यात आले. सरपंच व ग्रामस्थांशी चर्चा करताना असे ठरवण्यात आले की, गावातील हनुमान मंदिर, महेश मंदिर, मस्जिद, मळगंगा मंदिर, ग्रा.पं. कार्यालय परिसर स्वच्छता, जि. प. शाळेतील डिडवणी कटींग व जुन्या शाळा खोल्यांची साफ सफाई तसेच पाणी फाउंडेशनचा प्रशिक्षण केंद्राचा परिसर (५ एकर) सफाई व झाडे कटींग करुन आळे करणे, पाणी बचतीचे महत्व सांगून पाण्याचा काटकसरीने वापर करणे, वनराई बंधारे, कंटुर बंधारे, समपातळी चर, साखळी बंधारे बांधणे इ. कामे ठरवून जलसंवर्धन व जलव्यवस्थापन ही मुख्य संकल्पना वापरली.

❖ गुरुवार दि. ०३/०१/२०१९

दि.०३/०१/२०१९ रोजी ठिक ११.०० वा. मौजे सराटेवडगाव ता. आष्टी जि. बीड डॉ. बा. अं. मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर २०१८–१९ उदघाटन व सावित्रीबाई फुले जयंती समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते हे होते तर कार्यक्रमाचे उदघाटक जेष्ठ नागरिक व से. स. सोसायटीचे चेअरमन श्री. राजाराम नन्नवरे होते. या वेळी व्यासपीठावर सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, उपसरपंच सौ. आयोध्या शिंदे, श्री. बबन पाटील सुंबरे (तंटामुक्ती अध्यक्ष), ग्रा. पं. सदस्य आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी स्व्च्छतेचे दूत महामेरु संत गाडगेबाबा व स्त्री शिक्षणाच्या आराध्य दैवत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करुन कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटक तथा से. स. सोसायटीचे चेअरमन मा. राजाराम नन्नवरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी व विद्यार्थीनींना ग्रामीण जीवनाची ओळख होते व श्रमदानाचे महत्व कळते. शिबीरामुळे माणसाचे मन व शरीर बदलले पाहिजे. प्रत्येकाने पावसाच्या पाण्याचे थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत जेणेकरुन परिसर पाणीदार होईल व शासनाकडे काही मागण्याची गरज पडणार नाही. सरपंच प्रा. राम बोडखे बोलताना म्हणाले की, सामाजिक बांधिलकी स्वीकारणारा जीवनात यशस्वी होतो.शिवाय त्यांनी पाणी बचत व व्यवस्थापन या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले व पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेसाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष पदावरुन बोलताना प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीयांसाठीचे योगदान या विषयी मार्गदर्शन केले. त्याच बरोबर राष्ट्रीय सेवा

योजनेच्या दिलेल्या संकल्पनेनूसार काम करुन गावक—यांचे व स्वयेंसवकाचे मनोबल वाढवण्याचे काम यातून व्हावे असेही सांगितले. कार्यक्रम प्रसंगी उपसरपंच पती महादेव शिंदे, पत्रकार उत्तमराव बोडखे यांचीही समयोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर यांनी मानले. यावेळी मोठया प्रमाणावर सराटेवडगाव येथील ग्रामस्थ, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयाचे विद्यार्थी—विद्यार्थीनी व प्राध्यापक व इतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. उदघाटन कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर शिबीरार्थी स्वयंसेवकांना भोजन देण्यात आले. भोजनानंतर दुपारी एक तास विश्रांती घेतली व दुपारी ठिक ३.०० वा जि. प.शाळेत व्ही. व्ही. पॅट मशिनचे कार्य या विषयी प्रात्यक्षिकासह मा. माने जी.एस.मास्टर ट्रेनर यांचेकडून गावक—यांना माहिति देण्यात आली. या प्रसंगी तहसिल कार्यालय आष्टी येथील निवडणुक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यानंतर ४.३० वात्र निवासाच्या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली व ठिक ५.०० वा. ग्रुप करुन गटचर्चा, पाणी व्यवस्थापन, बेटी बचाव, स्त्रीभ्रुण हत्या, हुंडा बळी, स्त्री— पुरुष समानता, दुस—या दिवशीच्या श्रमदानाचे नियोजन या विषयी चर्चा करण्यात आली. सायंकाळी ६.३० ते ७.३० वा. या वेळेत सायंकाळचे भोजन करण्यात आले.

त्यानंतर द्वितीय सत्रामध्ये बौध्दिक व प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. गावातील हनुमान मंदिराच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे उपसरपंच पती श्री. महादेव शिंदे हे होते. या प्रबोधन कार्यक्रमामध्ये प्रमुख व्याखाते प्रा. डॉ. सज्जन गायकवाड यांनी ''संत गाडगेबाबा यांचे विचार'' या विषयावर ग्रामस्वच्छतेबाबत सखोल असे मार्गदर्शन केले.त्यामुळे ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व किती महान आहे याचे ज्ञान मिळण्यास मदत झाली. प्रा. संभाजी ओव्हाळ, प्रा. डॉ. दत्तात्रय जिरेकर व प्रा. भिमराज गावडे यांनी अंधश्रध्दा निर्मुलन या विषयी मार्गदर्शन व वेगवेगळे विज्ञानावर आधारीत प्रयोग सादर करुन ग्रामीण महिला व पुरुषांमध्ये अंधश्रध्देबाबतचे गैरसमज दूर करण्यास मदत केली. समाजात आजही काही

प्रमाणात ग्रामीण भागामध्ये अंधश्रध्देचा पगडा समाज मनावर असलेला दिसून येतो. यासाठी विज्ञानाचे प्रयोग याकामी महत्वाची भूमिका बजावू शकतात असे यावरुन दाखवून दिलें. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन NSS चे स्वयंसेवक अक्षय खोटे यांनी तर आभार दत्ता कापरे यांनी मानले. याप्रसंगी ग्रमस्थ, स्वयंसेवक तसेच डॉ. भगत डॉ. आव्हाड हे उपस्थित होते.

## ❖ शुक्रवार दि. ०४/०१/२०१९

शुक्रवार दि. ०४/०१/२०१९ रोजी पहाटे ५.०० वा. उठून सर्व स्वयंसेवकांनी ५.३० वा. ते ६.०० वा पर्यंत रामधुन प्रभातफेरी गावामध्ये दररोज होत असे. त्यानंतर ६.०० ते ७.३० वा. या कालावधीत प्रार्थना व्यायाम, प्राणायाम व योगासने करण्यात आली.अशाप्रकारे दि. ०४/०१/२०१९ ते ०९/११/२०१९ या शिबीर कासळात ५.०० ते ७.३० वा. दिनचर्या पार पाडण्यात आली. त्यानंतर ७.३० ते ८.३० वा. कालावधीमध्ये स्वयंसेवकांना अल्पोपहार होत असे. अल्पोपहार करुन श्रमदानासाठी स्वयंसेवक पाणी फाउंडेशन प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी पोहचले. त्या ठिकाणी असलेले फार्म हाऊस व परिसर याची सफाई करण्यात आली. यासाठी १३ ग्रुप तयार करण्यात आले होते. श्रमदानानंतर बरोबर १२.३० वा. काम थांबवले. या ठिकाणी ०४/०१/२०१९ चे श्रमदान खुप आनंदात पार पडले. त्यानंतर १.०० वा. भोजन करण्यासाठी पोहचलो. १.०० ते २.०० या वेळेत भोजन व त्यानंतर ४.०० वा विश्रांती झाल्यांनतर ४.०० ते ६.०० वा. पर्यंत गटचर्चा व परिसर स्वच्छता करण्यात आली. सायंकाळी ६.३० ते ७.३० वा या वेळेत भोजन करण्यात आले. ठिक ८.०० वा ''दोन हात दुष्काळ मुक्तीसाठी'' आणि ''जलसंवर्धन व जलव्यवस्थापन'' या विषयावर पाणी फाउंडेशन आष्टी तालुक्याच्या वतीने मा. देविदास पवार, कैलास पन्हाळकर, प्रदीप काथवटे, संभाजी इंगळे, श्री. आजबे यांनी स्लाईड शो च्या माध्यमातून पाणी बचत, पाणी व्यवस्थापन, दुष्काळाशी दोन हात, पडणा–या पावसाचा प्रत्येक थेंब किती महत्वाचा आहे. त्याचे संवर्धन हेच जिवन आहे. हे ग्रमस्थ व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. गावाच्या एकजुटीतून गावाचा विकास कसा करता येईल याबाबत

गावक--यांना योग्य मार्गदर्शन करुन येणा—या पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत गावाने सहभागी होवून प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे जेष्ठ नागरिक श्री. भगवान तरटे हे होते. तर कार्यक्रमास सौ. आयोध्या शिंदे, श्री महादेव शिंदे, डॉ. राम बोडखे, श्री. बबन सुंबरे, श्री. तान्हाजी सुंबरे, श्री आश्रुबा घोडके, श्री. ननवरे, प्रा. पटेल, मंडलिक, ग्रामस्थ, शिबीरातील स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एन.एस.एस. चे स्वयंसेवक आटोळे प्रवीण यांने तर आभार निलेश खोटे याने मानले.

## ❖ शनिवार दि. ०५/०१/२०१९

शनिवार दि.०५/०१/२०१९दिनचर्येप्रमाणे पहाटे उठून स्वयंसेवकांनी स्वयं स्वच्छता करुन रामधुन फेरी पूर्ण केली. त्यानंतर प्रार्थना, योगा प्राणायाम झाल्यानंतर सर्वांना नाष्टा करुन ठरल्याप्रमाणे श्रमदानासाठी ८.४५ वा प्रशिक्षण केंद्र पाणी फाउंडेशन येथे पोहचले व १२.३० वा पर्यंत झाडानां आळे,कटींग, व इतर सफाई करुन परीसर स्वच्छ केला. त्या ठिकाणचे व्यासपीठाचे अपुर्ण काम पूर्ण करण्यात आले. या प्रसंगी सरपंच श्री. राम बोडखे,उपसरपंचपती श्री. महादेव शिंदे, श्री.मोहन कापरे,ऋषीकेश कापरे,व भाऊ बोडखे हे उपस्थित होते. या प्रसंगी ग्रामस्थांनी स्वयंसेवाकांचे अभिनंद केले. दुपारचे जेवण व विश्रांती झाल्यानंतर गटचर्चा करण्यासाठी सर्व स्वयंसेवक एकत्र आले. गट चर्चेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मोहन कापरे हे उपस्थित होते. सायंकाळच्या सत्राात भोजन व ८.००ते १०.००वा या वेळेत श्री. नरेंद्र बोठे यांचे ग्राम नवचेतना शिबीर या विषयी मार्गदर्शन केले. ग्रामस्थांना या शिबीराचा विशेष लाभ झाला. जीवन आनंदी जगण्याचा मार्ग किती सोपा आहे हे विदयार्थी व ग्रामस्थांना सहज पटवून दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन श्री.बाळासाहेब तरटे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक अविनाश बोडखे याने केले तर आभार आकाश बोडखे याने मानले.या कार्यक्रमास ग्रामस्त व स्वयंसेवक, प्रा.कटके, ओव्हाळ, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## ❖ रविवार दि. ०६/०१/२०१९

रविवार दि.०६/०१/२०१९ रोजी दैनंदीनी वरील प्रमाणे करुन व नाष्टा उरकुन नाले सफाई, रस्ते सफाई प्राथमिक शाळा परिसर,ग्रा.पं.कार्यालय परिसर,हनुमान मंदिर,मज्जिद, मळगंगा मंदिर, गावाचा प्रथम दर्शनी रस्ता या परिसराची स्वच्छता करण्यात आली. दुपारी १२.३० जेवण करुन ३.३० वा पर्यंत विश्रांती देण्यात आली. त्या नंतर ३.३० ते ६.००वा पर्यंत वेगवेगळया विषयावर नाटय छटा सादरीकरण झाले. या मध्ये व्यसनमुक्ती, हुंडाबंदी लेक वाचवा, लेक शिकवा या विषयावर सादरीकरण झाले. सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत जेवण झाले. बरोबर ठिक ८.०० ते १०.०० या वेळेत श्री. नरेंद्र बोठे व श्री. घनशाम दळवी (आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रशिक्षक) यांचे ग्राम नव चेतना व योगा आणि प्राणायामाचे जीवनातील महत्व या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. ईश्वर नन्नवरे हे होते. या प्रसंगी गावातील नागरिक, स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तळेकर प्रदीप याने तर आभार कु. कोमल नन्नवरे हिने मानले.

## ❖ सोमवार दि. ०७/०१/२०१९

रविवार दि. ०७/०१/२०१९ सकाळच्या नाष्टयानंतर श्री. राजेंद्र सुपेकर (तालुका कृषी अधिकारी) यांचे हवामान बदल व शेती व्यवसाय याविषयी स. ८.३० ते ९.३० वा पर्यंत शेतक—यांसाठी शासकीय योजना याविषयी मार्गदर्शन झाले. श्रमदानासाठी माळावरती कंटूर बंधारा निर्मिती करुन समपातळी चर खोदण्याचे काम स्वयंसेवकांनी श्रमदानाने पुर्ण केले. १.०० ते २.०० दुपारच्या जेवणासाठी सुटटी करुन जेवण करण्यासाठी वेळ देण्यात आला. त्यानंतर विश्रांती करुन बरोबर ४. ०० ते ६.०० या वेळेत काव्यवाचन घेण्यात आले. त्यामध्ये स्वयंसेवकांनी हिररीने सहभाग नोंदवला. यावेळी अध्यक्ष म्हणून गावचे नागरिक शेख आसिफ हे उपस्थित होते. त्यानंतर संध्याकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत जेवण करुन व्याख्यानाची तयार करण्यात आली. रात्री ८.०० ते ९.३० या वेळेत मा. प्रा. भा. दे. जगताप यांचे ''व्यक्तिमत्व विकास'' या विषयावर व्याख्यान पार पडले. व्याख्यानासाठी

लहान मुले, ग्रामस्थ व स्वयंसेवक प्रा. बोराडे दिलीप व प्रा. डॉ. औटे पी. एन. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कांचन नन्नवरे हिने तर आभार कु. राजश्री तरटे हीने मानले.

## ❖ मंगळवार दि. ०८/०१/२०१९

दि. ०८/०१/२०१९ रोजी सकाळी ५.०० ते ५.३० स्वयंस्वच्छता करुन गावातून रघुपती राघव राजाराम पतित पावन सिताराम ही रामधुन च्या माध्यमाने ६.०० वा प्रभात फेरी पूर्ण करुन नियमितपणे प्रार्थना, योगासने, प्राणायाम पार पडले. त्यांनतर स्वयंसेवक नाष्टा करुन ८.३० वा. श्रमदानासाठी माळरानावर पोहचले. विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. त्यामुळे ग्रुप तयार करुन स्पर्धात्मक LBS व CCT चे काम करण्यात आले. हे काम स्वयंसेवकांनी अतिशय आनंदाने करुन दुपारी १२.३० वा. जेवणासाठी सुटटी केली. जेवण दुपारी १२.३० ते १.३० वा. या वेळेत घेउन विश्रांती घेतली. विश्रांतीनंतर ठिक ४.०० ते ६.०० या वेळेत गावात प्रत्यक्ष घरी जाऊन ग्रामस्थ व माता भगिनी यांच्याशी संवाद साधुन अंधश्रध्दा, पाणी बचत, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता, आरोग्य या विषयी माहिती देउन जनजागृती केली. सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत जेवण करुन ठिक ८.०० ते १०.३० वा. पर्यंत मा. कवी श्री. नागेश शेलार, श्री. इंद्रकुमार झांजे, श्री. संदिप पाचरणे व सौ. संगिता होळकर यांच्या कवितांचा बहारदार कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचा ग्रामस्थ, महिला व NSS चे स्वयंसेवक यांनी मनमूराद आनंद लुटला. कवितांच्या माध्यमातून जलव्यवस्थापन व बेटी बचाव चा संदेश ग्रामस्थांना दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय खोटे याने तर आभार अमोल धापटे यांने मानले.

## ❖ बुधवार दि. ०९/०१/२०१९

दि.०९/०१/२०१९ रोजी सकाळची नियमित दिनचर्या पूर्ण करुन नाष्टा करण्यासाठी ७.३० ते ८.३० वेळ देण्यात आली. नाष्टा केल्यानंतर जुनी जि. प. शाळेच्या खोल्यातील टाकावू सामान बाहेर काढून खोल्या स्वच्छ

करुन निरोप समारंभाची तयारी करण्यात आली. ठिक ११.०० वा निरोप समारंभास सुरुवात झाली. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष माननिय आमदार भीमराव धोंडे (आष्टी—पाटोदा — शिरुर) हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिकचे एन. एस. एस. चे संचालक डॉ. प्रकाश देशमुख हे उपस्थित होते. तसेच प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते, बाबुशेठ भंडारी, मा. पं. स. भानुदास बोडखे, उपसरपंच पती श्री. महादेव शिंदे, बबन सुंबरे, से. स. सो. चेअरमन राजाराम नन्नवरे, पाणी फौडेशन जिल्हा समन्वयक श्री. भोईटे बिभिषण, ग्रामविकास अधिकारी बलभीम परकाळे, मु. अ. सिध्देश्वर शेंडगे इ. ग्रामस्थ, विद्यार्थी, प्राध्यापक मोठया संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते, अहवाल वाचन प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विघाते यांनी व आभार प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर यांनी मानले.

- कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. आ. भिमराव धोंडे म्हणाले — राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य कौतुकास्पद आहे तसेच सर्व युवकांचा सामाजिक कार्यात सहभाग असला की ते काम उत्कृष्ट होते. सराटेवडगावमध्ये स्वच्छता, जलव्यवस्थापन व संवर्धनाचे झालेले काम कौतुकास्पद आहे.
- मुक्त विद्यापीठाचे डॉ. प्रकाश देशमुख असे म्हणाले की आनंदवाडी येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे NSS च्या युवकांचे सलग तीन वर्षे शिबीर झाले. त्यामुळे आनंदवाडीने राज्यात तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. आता सराटेवडगाव येथे शिबीर आहे. त्यामुळे सराटेवडगावने बक्षिस पटकावण्याचे आवाहन केले.

- प्राचार्यांनी प्रास्ताविक करताना विद्यार्थी हा देशाचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांचे श्रमदान देशासाठी किती महान आहे हे सांगितले.
- मा. सरपंच प्रा.डॉ. राम बोडखे यांनी एन.एस.एस. स्वयंसेवकांनी केलेल्या कामाबददल समाधान व्यक्त केले. तसेच गाव दत्तक घेतल्याबददल महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठाचे आभार मानले.

Programme Officer
एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

PRINCIPAL
प्राचार्य
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

## • समारोप समारंभ •

शुक्रवार दि.९/०१/२०१९ रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता
खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

• अध्यक्ष •

**मा. भीमरावजी धोंडे साहेब**

(आमदार,आष्टी-पाटोदा-शिरूर)

• प्रमुख उपस्थिती •

मा. प्रा. डॉ. टी.आर पाटील
(संचालक, रासेयो डॉ. बा.आ.म.वि.औ.बाद)

मा. प्रा. अनंत हंबर्डे
(संपादक, तथा जेष्ठ पत्रकार)

मा. उत्तमराव बोडखे
(सहाय्यक, संपादक दै. झुंजारनेता)

मा. श्रीपती माने
(निवासी संपादक, दै. झुंजारनेता)

मा. प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे (पत्रकार)

• आपले विनित •

डॉ. एच.जी.विधाते
प्राचार्य

प्रा. राम बोडखे
सरपंच, सराटेवडगांव

सौ. अयोध्या महादेव शिंदे
उपसरपंच, सराटेवडगांव

प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण
कार्यक्रमाधिकारी

प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर
कार्यक्रमाधिकारी

प्रा. डॉ. आर. जी विधाते
कार्यक्रमाधिकारी

ग्रा. पं. सदस्य- श्री. बाळकृष्ण तरटे, नबीबशेख, सौ. छाया गजघाट, सौ. कमलाबाई गुंड, सौ. रूपाली मिसाळ, श्री. विजय बोडखे, श्री. कृष्णा बोडखे, सौ. संगिता बोडखे. सर्व आजी माजी सरपंच, उपसरपंच, चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, सर्व तरूण मंडळ व ग्रामस्थ मौजे सराटेवडगांव ता. आष्टी, जि. बीड

सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, व प्राध्यापकेत्तर कर्मचारी वृंद
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा जि. बीड.

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड ४१४२०२

नॅक मुल्यांकन 'अ' दर्जा

यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# राष्ट्रीय सेवा योजना

" जल संवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा "

## विशेष शिबीर २०१८-१९

***NOT ME -BUT YOU***

दि. ३ जानेवारी २०१९ ते ९ जाने २०१९

• स्थळ •

मौजे सराटेवडगांव ता. आष्टी, जि. बीड

प्रति,
श्रीमान ____________________
____________________
____________________

• प्रेषक •

**प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते**

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा ता.आष्टी, जि. बीड




दि. 3।1।2019 रोजी विशेष शिबीराचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य मा. डॉ. एच्.जी. विधाते.




विशेष शिबीर उद्घाटन प्रसंगी सुत्रसंचालन करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर.जी. विधाते व व्यासपीठावर मान्यवर.



ग्रामस्थानां व्ही·व्ही·पॅट माशिनचे महत्व ग्रामस्थांना सांगताना तहसिल कर्मचारी व N.S.S चे स्वयंसेवक




ग्रामस्थ व स्वयंसेवक यांना संत गाडगेबाबा यांचे स्वच्छते विषयी मार्गदर्श

[illegible]



दि. 4/1/2019 ते. 9/1/2019 या काळात दररोज सकाळी रामधुन फेरी आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी स्वयंसेवक.



विशेष शिबीरामध्ये स्वयंसेवक विद्यार्थी योगा करताना



दि. 4/1/2019 रोजी रात्री 8.00 वा. जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाच्या अनुषंगाने पाणी फाऊंडेशन टीम व्हिडीओ क्लीप च्या माध्यमाने मार्गदर्शन करताना मा. देवीदास पवार




दि. 5/1/2019 रोजी ग्राम नवचेतना शिबीर प्रसंगी मा. नरेंद्र बोठे यांचे स्वागत करताना एन.एस.एस.चे स्वयंसेवक.

मौजे सरटेवडगांव / आनंदवाडी येथील पाणी फाऊंडेशन प्रशिक्षण केंद्र (5)



पानी फाऊंडेशन प्रशिक्षण केंद्रामध्ये सफाई आगोदर चा परीसर



पाणी फाऊंडेशन प्रशिक्षण केंद्र सफाई पूर्ण होत असताना- ---



मौजे सरटेवडगांव येथे विशेष शिबीरामध्ये स्वयंसेवक विद्यार्थी समपातळी चर निर्मिती करताना मार्गदर्शन करत आहेत सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे.



समपातळी चर पूर्ण झाल्यानंतर स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी समवेत कार्यक्रमाधिकारी श्रीमती शैलजा कुचेकर



कुंडूर बंधारा निर्मिती आगोदर-चा परीसर



कुंडूर बंधारा पूर्ण झाल्यानंतर-चा परिसर व काम पूर्ण झाल्यानंतर आनंदी स्वयंसेवक.




मौजे आनंदवाडी / सराटेवडगांव येथे जल व्यवस्थापन या विषयी ग्राफिक्स च्या माध्यमाने महत्व पटवून दिले. मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते ग्राम विकास अधिकारी बोडखे साहेब.




मौजे सराटेवडगांव / आनंदवाडी येथील नाल्या सफाई करताना NSS चे स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. जी. विघ्नाते.




दि. 9/1/2019 रोजी विशेष शिबीर समारोप प्रसंगी मा. डॉ. प्रकाश देशमुख यांचे स्वागत करताना मा. आमदार भीमराव धोंडे साहेब समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते






समारोप प्रसंगी मा. आ. भिमराव धोंडे स्वयंसेवक व ग्रामस्थाना मार्गदर्शन करताना...

झुंजार नेता

राष्ट्र ■ रविवार दि.६ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून विकास कामे करण्याची संधी - प्राचार्य डॉ.विधाते

I ,दि.५ (प्रतिनिधी):- राष्टीय योजना शिबिराच्या माध्यमातून ारार्थी व ग्रामस्थांना मोठी विकास करण्याची मोठी संधी आहे, म असा युवक निर्माण करण्याचे राष्टीय सेवा योजना शिबिराच्या यमातून केले जाते. गाडगेबाबा व द्य शिक्षिका सावित्रीबाई पुले यांचे ार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत प्रतिपादन डॉ. बाबासाहेब बेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वस्थापण परिषदेचे सदस्य प्रांचार्य हरीदास विधाते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब बेडकर मराठवाडा विद्यापीठ, वंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त ग्रापीठ, अभ्यास केंद्र व आनंदराव डे महाविद्यालय यांच्या संयुक्त ग्रमाने आष्टी तालुक्यातील आदर्श सराटेवडगाव येथे ३ जानेवारी ते जानेवारी या कालावधीत जलसंवर्धन जलव्यवस्थापनासाठी युवा यासाठी राष्टीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य हरीदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन राजाराम ननावरे, आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, बबन सुंबरे, शेख बाबा, नबी शेख, शिवाजी शिंदे, बाळासाहेब तरटे, आण्णा मिसाळ व इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रसंत गाडगेबाबा, आद्य शिक्षिका सावित्रीबाई पुले यांच्या प्रतिमांची पुजा करुन अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले, गतवर्षी आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचा पुरस्कार मिळाला यावेळी सराटेवडगावला बक्षीस कसे मिळेल यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत. जलसंवर्धन व जलव्यवस्थापन प्रत्येक व्यक्तीसाठी व देशासाठी मूलभूत गरज बनत चालली आहे. प्रत्येक व्यक्तीला



जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापन याविषयीचेज्ञान असणे आवश्यक आहे.

कार्यक्रमांचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी राष्टीय सेवा योजनेचा इतिहास सांगुन, संत गाडगेबाबा यांच्या ग्रामस्वच्छतेचा वारसा आपण चालवु. शिबिर कालावधीत संत गाडगेबाबा यांचे विचार, अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग, दोन हात दुष्काळमुक्तीसाठी जलसंवर्धन व जलव्यवस्थापन, ग्राम नवचेतना शिबिर, योगा व प्राणायाम याचे महत्त्व, हवामान बदल व शेती व्यवसाय, व्यक्तिमत्व विकास, वृक्षसंवर्धन व कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे याचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा. मुख्याध्यापक शिक्षक सिद्धेश्वर शेंडगे यांनी सांगितले की, गतवर्षी देखील शिबीरार्थिनी चांगले काम केले, संत गाडगेबाबा यांचे समाज कार्य, अशा विविध कार्यक्रमांचे माध्यमातून पुढे चालु ठेवावे. आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जिवनावरील कविता त्यांनी सादर केली. आदर्श सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी सांगितले की, शिबीराचे माध्यमातून गावाच्या विकासासाठी चालना मिळेल यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे. सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यानेच आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचे बक्षीस मिळाले आहे. दुष्काळ ही एक सुवर्णसंधी आहे असे समजून सराटेवडगाव येथील युवक व ग्रामस्थांनी विकासासाठी सहकार्य करावे. प्रा. डॉ. सज्जन गायकवाड यांनी सांगितले की, राष्टीय सेवा योजनेतुन बरेच काही शिकण्यासारखे आहे याचा शिबीरार्थी व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा. याप्रसंगी कु. राजश्री तरटे, कु. ननवरे व इतरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्ता नरसाळे यांनी मानले.

सकाळ | बीड

औरंगाबाद, रविवार, ६ जानेवारी २०१९

TODAY

f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com

Call Center : 9225800800




सराटेवडगाव (ता. आष्टी) : राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते.

# सराटेवाडीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

**कडा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अभ्यास केंद्र व आनंदराव धोंडे महाविद्यालयातर्फे आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव येथे तीन ते नऊ जानेवारी या कालावधीत 'जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा' यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले. शनिवारी (ता. पाच) शिबिराचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष राजाराम ननावरे, सरपंच राम बोडखे, आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, बबन सुंबरे, शेख बाबा, नबी शेख, शिवाजी शिंदे, बाळासाहेब तरटे, अण्णा मिसाळ यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्र संत गाडगेबाबा, आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

पुण्य नगरी
smart Beed

# शिबिराच्या माध्यमातून विकासाची संधी :डॉ. विधाते

कडा / प्रतिनिधी : सक्षम असा युवक निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे शिबिराच्या माध्यमातून विकास करण्याची संधी निर्माण होत असल्याचे प्रतिपादन डॉ. हरीदास विधाते यांनी केले.

आनंदराव धोंडे महाविद्यालयचे सराटेवडगाव येथे ३ जानेवारी ते ९ जानेवारी या कालावधीत जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य हरीदास विधाते तर प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन राजाराम ननावरे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर शेंडगे, बबन सुंबरे, शेख बाबा, नबी शेख, शिवाजी शिंदे, बाळासाहेब तरटे, आण्णा मिसाळ सह आदी उपस्थित होते. संत गाडगेबाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना डॉ. हरीदास विधाते यांनी सांगितले, गतवर्षी आनंदवाडीला पाणी फाऊंडेशनचा पुरस्कार मिळाला यावेळी सराटेवडगावला बक्षीस कसे मिळेल यासाठी ग्रामस्थांनी प्रयत्न करावेत. जलसंवर्धन व जलव्यवस्थापन प्रत्येक व्यक्तीसाठी व देशासाठी मूलभूत गरज बनत चालली आहे. प्रत्येक व्यक्तीला जलसंवर्धन आणि जलव्यवस्थापन याविषयीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कार्यक्रमाला डॉ. भास्कर चव्हाण, सरपंच राम बोडखे, डॉ. सज्जन गायकवाड, राजश्री तरटे, सह आदींची भाषणे झाली.

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक ११ जानेवारी २०१९ शुक्रवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd.


## राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे कार्य कौतुकास्पद-आ.भीमराव धोंडे





कडा (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय व ग्रामपंचायत सराटेवडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर दि.३ जाने.ते ९ जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा या विशेष शिबीराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे संचालक डा.प्रकाश देशमुख, प्राचार्य डा.हरिदास विधाते, बाबुशेठ भंडारी, पंचायत समिती सदस्य भानुदास बोडखे, सरपंच प्रा.डा.राम बोडखे, उपसरपंच महादेव शिंदे, बबन सुबरे, राजाराम नन्नवरे, , पानी फौऊंडेशनचे जिल्हा समन्वय देविदास पवार, कैलास पन्हाळकर, पान ६ वर...

### राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे

दादा बोडखे, रामदास तरटे, शरिफखान पठाण, बबन सुबरे. एस.के.बोडखे, प्रा.डॉ.जी.पी.बोडखे, ग्रामसेवक बलभीम परकाळे, प्राचार्य सुरेश बोडखे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, अदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरात ग्रामस्वच्छता, हागणदारीमुक्त गाव, जलसाक्षरता, पर्यावरण संरक्षण, एडस जनजागृती, व्यसनमुक्ती, वृक्षारोपन, अंधश्रध्दा निर्मुलन व सक्षम युवक हे विविध उपक्रम राबविण्यात आले.यावेळी रा.से.यो.शिबीराचे अहवाल वाचन प्रा.डा.भास्कर चव्हाण यांनी केले. सात दिवासीय शिबीरात दररोज रात्री ८ ते १० यावेळात नामांकीत व्याख्यात्यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. आ.धोंडे पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की, युवकांचा सामाजिक कार्यात सहभाग असला की ते काम उत्कृष्ट होत आसते. सराटेवडगाव मध्ये स्वच्छतेचे व जलसंवर्धन व जलव्यवस्थापनाचे झालेले काम कौतुकास्पद आहे. आनंदवाडी येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे रासेयो च्या युवकांचे सलग तीन वर्षे शिबीर झाले. पानी फाऊंडेशनचे काळात चांगला सहभाग होता. आनंदवाडीने बक्षिस पटकाविले आहे. आता सराटेवडगांव येथे शिबीर आहे याही गावास पानी फाऊंडेशनचे कामात मदत करावी असे आवाहन केले .सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे यांनी सराटेवडगांव ग्रामस्थांना आगामी पानी फाऊंडेशनचे वाटरकप स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले. मेहकरीनदी स्वच्छ व वेडीबाभळमुक्त केल्याचे सांगीतले. बहारदार संचलन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर जी. विधाते यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. शैलजा कुचेकर यांनी मानले.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ गुरुवार दि.१० जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2


आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक व कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्दमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे दि.३ ते ९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवा या विशेष शिबीराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रीय सेवा योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाचे संचालक डा.प्रकाश देशमुख , पत्रकार उत्तम बोडखे , प्राचार्य डा.हरिदास विधाते , बाबुशेठ भंडारी , माजी पंचायत समिती सदस्य भानुदास बोडखे , सरपंच प्रा.डा.राम बोडखे , उपसरपंच महादेव शिंदे , बबन पाटील सुबरे , राजाराम नन्नवरे , जि.प.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक तथा शिक्षक नेते सिध्देश्वर शेंडगे , पानी फौऊंडेशनचे जिल्हा समन्वय देविदास पवार , कैलास पन्हाळकर , ग्रा.पं.सदस्य दादा बोडखे , रामदास तरटे ,शरिफखान पठाण ,एस.के.बोडखे, प्रा.डा.जी.पी.बोडखे , ग्रामसेवक बलभीम परकाळे , प्राचार्य सुरेश बोडखे , प्रा.डा.भास्कर चव्हाण , प्रा.एस.एन.वाघुले , कार्यक्रमाधिकारी डी.व्हि.नरसाळे, प्रा.बी.ए.रणदिवे आदि मान्यवर उपस्थित होते.

या शिबीरात ग्रामस्वच्छता , हागणदारीमुक्त गाव , जलसाक्षरता , पर्यावरण संरक्षण , एडस् जनजागृती ,व्यसनमुक्ती , वृक्षारोपन , अंधश्रध्दा निर्मुलन व सक्षम युवक हे विविध उपक्रम राबविण्यात आले.यावेळी रा.से.यो.शिबीराचे अहवालवाचन प्रा.डा.भास्कर चव्हाण यांनी केले. यावेळी सरपंच प्रा.डा.राम बोडखे ,पत्रकार उत्तम बोडखे , देविदास पवार , प्राचार्य डा.हरिदास विधाते व डा.प्रकाश देशमुख यांची भाषणे झाली.या सात दिवासीय शिबीरात दररोज रात्री ८ ते १० यावेळात नामांकीत व्याख्यात्यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. आ.धोंडे पुढे मार्गदर्शन करताना म्हणाले की , युवकांचा सामाजिक कार्यात सहभाग असला की ते

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित शिबीर अहवाल

# २०१८-२०१९

O/C

Anand Charitable Sanstha Ashti's
**ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA**
(Arts, Commerce & Science)
TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202
☎ 02441- 239621
E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com
NAAC GRADE - "A" | ISO 9001:2008 Certification | Principal Dr. H.G. Vidhate

Ref. No.ADMK / 2018-2019/347 Date: 18/ 3 /2019

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :— नियमित शिबीर सन २०१८—१९ चा अहवाल स्विकारणे बाबत.....**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१८—१९ या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या नियमित शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

**PRINCIPAL**
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सोबत :—
१. अहवाल
२. फोटो
३. पेपर कात्रण
४. स्वयंसेवक उपस्थिती पत्रक

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वृक्षारोपन अहवाल

वृक्षारोपन व वनमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धनाचे महत्व सांगताना असे म्हटले की, आज दुष्काळ व अवर्षणग्रस्त स्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड होय. त्यामुळे झाडांची संख्या कमी होऊन निसर्गाचा असमतोल निर्माण झाला. त्यामुळे काही ठिकाणी प्रचंड पाऊस तर काही ठिकाणी आजिबात पाऊस नाही. पावसाची अनियमितता त्यामुळे माणसाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यावर एकच उपाय म्हणून वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन काळाची गरज बनली आहे.

शासनाच्या २.५० कोटी वृक्ष लागवडीचे उदि‌दिष्ट साध्य करण्यासाठी वृक्ष लागवड पंधरवडा दि. ०१ जूलै ते १५ जूलैची रूपरेषा ठरविण्यात आली. त्यानुसार महाविद्यालयीन प्रांगणात ठिकठिकाणी ८० वृक्षांची लागवड करून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना देण्यात आली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तक गांव सराटेवडगांव (आनंदवाडी)येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवशीय वृक्षारोपन शिबीराचे आयोजन दि. ११.०७.२०१८ रोजी करण्यात आले. या एक दिवशीय शिबीरामध्ये निंब, पिंपळ, करंजी इत्यादी जवळपास ३०० वृक्षांची गावालगत असलेल्या पश्चिमेला मेहकरी कॅनल व सराटेवडगांव (आनंदवाडी) रोड लगत लागवड करण्यात आली. वृक्षारोपन पंधरवडयात एकूण ३८० वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. एम. चव्हाण यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. श्रीमती. जी.एस. जगताप यांनी मानले. याप्रसंगी सराटेवडगांव (आनंदवाडी) गावचे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, ग्रामविकास अधिकारी बलभिम परकाळे साहेब, गावातील तरूण मंडळ, ग्रामस्थ, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. एन. औटे, डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. बी. एस. खैरे, प्रा. ईश्वर नन्नवरे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व एन.एस.एस. स्वयंसेवक मोठया प्रमाणात सहभागी होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा ता. आष्टी जि.बीड

## वॉटर कप स्पर्धा २०१९

## पाणी फाऊंडेशन कार्यशाळा दि. १७/०१/२०१९

### अहवाल

दि. १७/०१/२०१९ रोजी आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय कडा तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच पाणी फौंडेशन आष्टी तालुका '' पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धा'' अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळेचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन सकाळी ठिक ९.३० वा संपन्न झाले. त्यानंतर या कार्यशाळेत व्याख्यान व प्रात्यक्षिक असे दोन भागामध्ये कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून महाविलयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एम. वाघुले हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धेचे जिल्हा समन्वयक मा. बिभिषण भोईटे, मा. कैलास पन्हाळकर (आष्टी तालुका समन्वयक पाणी फाऊंडेशन ) कु.अपेक्षा सुपेकर (तांत्रिक प्रशिक्षक), मा. प्रशांत माने (ट्रेनर) मा. ईश्वर नलावडे, कु. उज्वला गावडे, कु. प्राची भूतकर, कु. स्नेहा अतुगडे, कु. पूजा जगताप, मा. अशोक इंगोले, मा. ह्षीकेश तांबीले, मा. रविंद्र पोमणे, मा. शहाजी शिंदे, मा, अनिकेत खेडकर सर्व पाणी फाऊंडेशनची टीम यांनी कार्यशाळा यशस्वीतेसाठी मोठी मेहनत घेतली. या प्रसंगी शिरापूरचे उपसरपंच मा. यवुराज देवकर, सराटेवडगावचे सरपंच्र मा. प्रा. डॉ. राम बोडखे व इतर गावचे नागरिक उपस्थित होते.

या कार्यशाळेत प्रथम मा. बिभिषण भोईटे बीड जिल्हा समन्वयक पाणी फाऊंडेशन यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बोलताना सांगितले की आपण शासनाकडे बघत बसलो तर

आपल्या गावाचा विकास करणे खूप अवघड आहे. परंतु युवकांनी गावाचा प्रश्न हातामध्ये घेतल्यास काही दिवसात कायमचा प्रश्न सुटू शकतो हे मी खात्रीपूर्वक आपणास सांगतो. अध्यक्ष पदावरुन बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणाले की, युवाशक्ती एकवटली तर पाणी प्रश्न सुटू शकतो. म्हणून प्रत्येक गावात श्रमदानातून मोठे काम उभे राहणे हे किती गरजेचे आहे हे पाणी फाऊंडेशनच्या प्रात्यक्षिकातून आपल्या लक्षात येईल फक्त याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण पुढे यावे.

यानंतर पाणी फाऊंडेशनच्या ट्रेनरने काही व्हिडोओ क्लिपच्या माध्यमातून विद्यार्थी — विद्यार्थीनी यांना विचार करण्यास भाग पाडून मंत्रमुग्ध केले. सर्व व्याख्याने झाली. त्यानंतर प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. पावसाचे पाणी डोंगर माथा ते पायथा कशा पध्दतीने पाणी जिरवण्याचे वैज्ञानिक तंत्र समजावून प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांना पटवून दिले शिवाय माती नाला समपातळीचर, कंटूर बडींग, याचे महत्वं विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच सेंद्रीय खताचे महत्व, रासायनिक खतामुळे जमीन कशी नापिक होत आहे. याचे प्रात्यक्षिक तसेच मातीमध्ये पाणी जिरवण्यासाठी माती कशी असावी याचे सुंदर उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. त्या बरोबर झााडाचे महत्व एका गाण्याच्या माध्यमातून व खेळाच्या माध्यमातून सर्वांना हसत खेळत पटवून दिले. शेवटी आजोबाचा काळ, वडीलांच्या काळात व आता मुलाच्या काळात पाण्यासाठी कशी स्पर्धा सुरू आहे याचे सुंदर प्रयोग सादरीकरणातून पाण्याचे महत्व सर्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सर्व कार्यक्रम ठिक ४.३० वा संपला तेव्हा विद्यार्थी आनंदी दिसत होते. खरे ज्ञान मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेह—यावर दिसून आला. शेवटी विद्यार्थी प्रतिक्रिया घेण्यात आल्या त्यावरुन हे स्पष्ट दिसत होते. कार्यक्रमात विद्यार्थी — विद्यार्थीनी महाविद्यालयातील प्राध्यापक सर्व शिक्षकेत्तर कर्मचरी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले शेवटी आभार प्रा. शैलजा कुचेकर यांनी मानले.

Programme Officer
N S S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

राष्ट्रीय सेवा योजना विभाग शिबीर 2018-19




(वनमहोत्सव सप्ताह निमित्त दत्तक गाव सराटे वडगाव येथे वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक व कर्मचारी)



(वनमहोत्सवानिमित्त वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक)

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता-आष्टी
राष्ट्रीय सेवा योजना 2018-19



वॉटर कप स्पर्धा, पाणी फाउंडेशन कार्यशाळेत NSS स्वयंसेवकांना "पाणी अडवा पाणी जिरवा" या बाबत मार्गदर्शन करतांना. मा. प्रशांत माळे.



पाणी फाउंडेशन कार्यशाळेत सहभागी स्वयंसेवक.

बीड संकेत

e-mail- bhrbsanket@gmail.com संपादक-नरेन्द्र कांकरिया

सोमवार दि.१६ जुलै २०१८ बीड फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११० R.N.I. No.70487/94 पो.र.नं. एल/१३/एसटीएस/बीड २०

# आनंदवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण



कडा दि.१५ (बातमीदार): आष्टी तालुक्यातील आनंदवाडी (सराटेवडगांव) येथे कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. सत्यमेव जयतेच्या वॉटरकप स्पर्धेत महाराष्ट्रातील पंधरा गावाची निवड झाली यामध्ये आनंदवाडीचा समावेश आहे. याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडीचें उद्दीष्ट समोर ठेवून आनंदवाडी येथे मेहेकरी कॅनालच्या कडेला वड, पिंपळ, करंजी, चिंच, निंब अशा वेगवेगळ्या ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आनंदवाडी हे गांव दत्तक घेण्यात आले आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ.हरीदास विधाते, सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पंडीत औटे, प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.गायत्री जगताप, प्रा.डॉ.बापु खैरे, प्रा.डॉ.जी.पी. बोडखे, प्रा.डॉ.एम.आर. पटेल, प्रा.डॉ.सज्जन गायकवाड, प्रा.डॉ.जी.एम. पठारे, प्रा.डॉ.मंगल टेकाडे, प्रा.डॉ.एस.ए. खेडकर यांच्यासह ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. ...

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

पाणी फौंडेशन कार्यशाळा 17/01/2019


# झुंजार नेता

राष्ट्र ■ शुक्रवार दि.१८ जानेवारी २०१९ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 201


## पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून युवकांनी विकास साधावा - भोईटे



कडा, दि.१७ (प्रतिनिधी):- युवकांनी ग्रामीण भागातील पाणी समस्यांवर कायमची मात करण्यासाठी पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून श्रमदानातून गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन सत्यमेव जयते पाणी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक बिभीषण भोईटे यांनी केले. याबाबत अधिक माहिती अशी की, सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन आयोजित युवा शक्तीचे युद्ध दुष्काळ विरुद्ध या बाबत कार्यशाळा कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले होते. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक बीभिषण भोईटे, अॅड. रविंद्र पोमने, शहाजी शिंदे, तालुका समन्वयक कैलास पन्हाळकर, अनिकेत खेडकर, उपसरपंच देवकर, समाधान येलपल्ले यांची उपस्थिती होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुजा करून अभिवादन करण्यात

आले. पुढे बोलताना भोईटे यांनी सांगितले
दिवसेंदिवस पाणी समस्या बिकट होत चालली अ
पाणी समस्या कायमची सोडविण्यासाठी गावागा
पाणी बचतीबाबत जनजागृती झाली पाहि
गावपातळीवर युवकांनी श्रमदानातून पावसाचे पड
पाणी जिरविण्यासाठी प्रयत्न करावेत. या
उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले व इतरांची भाषणे झा
कार्यशाळेचे निमित्ताने पाणी फाऊंडेशनच्याव
विद्यार्थ्यांना पाणी अडवा पाणी जिरवा यावर आध
वेगवेगळे प्रयोग दाखविण्यात आले. यावेळी प
फाऊंडेशनचे तांत्रिक प्रशिक्षक अपेक्षा सुपेकर, प्र
माने, ईश्वर नलावडे, नाथसाहेब सरक, उज्ज
गावडे, प्राची भुतकर, स्नेहा अतुगडे,, पुजा जग
अशोक इगोले, ऋषीकेश तांबिले यांनी प्रात्यक्षिका
मार्गदर्शन केले व विशेष परिश्रम घेतले. कार्यक्र
प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधि
प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन
डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आ
प्रा. डा. शाम सागळे यांनी मानले.

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबीर अहवाल

# २०१९-२०२०

0/c

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com



नॅक "A" दर्जा प्राप्त ISO 9001:2008 Certification प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते

जा.क्र. : आधोंमक / 2019-2020/1335 दि. 14/3/२०२०

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :— विशेष शिबीर सन २०१९—२० चा अहवाल स्विकारणे बाबत.....**

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सन २०१९—२० या शैक्षणिक वर्षामध्ये आयोजित केलेल्या **विशेष** शिबीराचा अहवाल आपणास सादर करीत आहोत.

तरी मे. साहेबांनी विशेष शिबीराचा अहवाल स्विकारून सहकार्य करावे.

हि नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

**सोबत :—**

१. अहवाल
२. फोटो
३. वर्तमानपत्र बातम्याचे झेरॉक्स
४. स्वयंसेवक उपस्थितीपत्र

सत्यमेव जयते

# ग्रामपंचायत कार्यालय, सराटेवडगाव / आनंदवाडी

ता. आष्टी जि. बीड

सरपंच : प्रा. डॉ. राम बोडखे (मो नं: ९४२३०३२२२२) ग्रामसेवक : सायंबर. जे. डी (मो नं ९८९० [illegible])

## - प्रमाणपत्र -

दिनांक : 7/09/2020

प्रमाणीत करण्यात येते की, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड यांचे 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग विशेष हिवाळी शिबीर मौजे सराटेवडगाव/आनंदवाडी ता. आष्टी जि. बीड येथे दि. 31-12-2019 ते 6-1-2020 या कालावधीत संपन्न झाले. शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकांनी सराटेवडगाव/आनंदवाडी गावात वृक्षारोपण, वृक्षांना आळी 3000 झाडांना करण्यात आली. कब्रस्तान स्वच्छता, ग्राम स्वच्छता, पाणी अडवा, पाणी जिरवा, गावातील सांडपाणी व्यवस्था, सी. सी. टी. गॅबीयन बंधारे, माती नाला इत्यादींची दुरुस्ती व कामे केली.

त्याचबरोबर बौद्धिक कार्यक्रमामध्ये 'समृद्ध ग्राम' या विषयावर अनेक मान्यवरांची व्याख्यान घेतली. उदा. सेंद्रीय शेती, ठिबक, तुषार सिंचनाचे महत्व, वृक्षारोपणाचे महत्व इत्यादी स्वरूपाचे विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामुळे सराटेवडगाव/आनंदवाडी गावाला सत्यमेव जयते समृद्ध ग्राम 2020-21 स्पर्धेसाठी खूप मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. त्यामुळे आम्ही ग्रामस्थ आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे आभारी आहोत. तसेच त्यांच्या या कार्यक्रमामुळे प्रमाणपत्र देण्यात येते.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय सराटेवडगांव
आनंदवाडी ता.आष्टी जि.बीड

सरपंच
ग्रामपंचायत [illegible] सराटेवडगांव

प्रति,

मा. प्राचार्य साहेब,
आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी
महाविद्यालय कडा.

विषय :- मौजे आनंदवाडी ता. आष्टी येथे सन 2017-18 चा कॅम्प आयोजित करणे बाबत.

महोदय, उपरोक्त विषयी विनंती की, आपल्या महाविद्यालयातर्फे एनएसएस चे शिबीर ग्रामिण भागात आयोजित करण्यात येते व त्यामधुन ग्रामसुधारणा, ग्रामस्वच्छता, जलसंधारण, व्यसनमुक्ती, वृक्षारोपन अशा अनेक गोष्टींबाबत जागृती होते.

आपणास विनंती की, अशा प्रकारचा कॅम्प आमच्या गावामध्ये आयोजित करावा. आम्ही सर्व गावकरी सहभाग घेऊन कॅम्प यशस्वी करु तसेच पाच वर्षासाठी आमचे गाव दत्तक घेण्यात यावे ही विनंती या पत्राने करित आहोत.

ग्रामसेवक
ग्रा.प. जरातेवडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी जि.

सरपंच
ग्रा.प. सरातेवडगाव/आनंदवाडी
ता. आष्टी जि. बीड

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada Tal. Ashti Dist. Beed

Anand Charitable Sanstha Ashti's

# ANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

TAL. ASHTI, DIST. BEED (MS) - 414 202

Phone - 02441-239621, 239921 Fax No. 02441-239621

Email. : admkada@gmail.com Website : www.admkada.com Principal Dr. H.G. Vidhate

Ref. No. ADMK/ 2017-18/277

Date : 19 /12 /2017

प्रति,
मा. कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

विषय :– सन २०१७–२०१८ या वर्षिचे विशेष शिबीर आयोजन करणे बाबत...

महोदय,

वरील विषयी विनंती की, सन २०१६–१७ मध्ये आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौजे पारोडी ता. आष्टी जि. बीड येथे दि. ०६ जानेवारी २०१७ ते दि. १२ जानेवारी २०१७ या कालावधिमध्ये संपन्न झाले होते. या शैक्षणिक कालावधिमध्ये शिबीर घेण्याच्या निमित्ताने मौजे पारोडी गावास भेट दिली असता तेथील स्थानिक व राजकीय परिस्थितीमुळे सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी विशेष शिबीर घेण्याकरिता असमर्थता व्यक्त केली. सदर गाव दत्तक गाव म्हणून आम्ही निवडलेले होते. परंतु असमर्थता व्यक्त केल्यामुळे येथे विशेष शिबीर चालू वर्षी आयोजित करणे शक्य नाही.

आम्ही सन २०१७–१८ च्या विशेष शिबीरासाठी मौजे सराटेवडगांव ता. आष्टी जि. बीड या गावची निवड केली आहे. तेथील सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी शिबीरास सहकार्य करण्याची तयारी पत्राद्वारे दर्शविलेली आहे. सोबत त्या पत्राची सत्यप्रत देत आहोत. चालू वर्षी मौजे सराटेवडगांव येथे शिबीर घेण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. तसेच चालू वर्षी पासून हेच गाव पाच वर्षासाठी दत्तक घेण्याचा आमचा मानस आहे.

तरी मे. साहेबांनी मौजे सराटेवडगांव ता. आष्टी जि. बीड येथे विशेष शिबीर घेण्यास परवानगी देऊन सहकार्य करावे.

ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

Principal
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सोबत :–

१. ग्रामपंचायत मौजे सराटेवडगांव संमतीपत्र
२. ग्रामपंचायत मौजे पारोडी असमर्थता पत्र

20/12/2017

**Programme Officer**
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

अभिप्राय

दि. 04-01-2020

आज दिनांक 04 जानेवारी 2020 रोजी आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा - ता. आष्टी जि. बीड यांच्या वतीने आयोजित रासेयो विशेष शिबीराला भेट दिली.

या सातदिवसीय शिबीरामध्ये रासेयो स्वंयसेवक यांची उपस्थिती लक्षणीय होती. "समृद्ध ग्रामासाठी युवा" या विषयावरील विशेष शिबीरात ग्रामस्वच्छता झाडांना पाणी देण्यासाठी आळे तयार करणे, बौद्धीक सत्र सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने समृद्ध गावासाठी हा विभाग सतत कार्यरत आहे.

'पाणी' फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धनाची काम केले असून गाव पाणीदार झाले आहे.

महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमाबद्दल सर्वांचे कौतुक आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा. पुन्हा एकदा सर्वांचे अभिनंदन.

(सही)
प्रा. डॉ. सोपान सुरवसे
जिल्हा समन्वयक रासेयो

अध्यक्ष :→ डॉ. [illegible] (सही)

प्रमुख पाहुणे :→ 1) डॉ. राजाराम सोनटक्के (सही)
2) डॉ. रमेश शिरूढकर (सही)
3) डॉ. आर. जी. [illegible] (सही)
4) डॉ. [illegible] डि. [illegible] (सही)

6/1/2020.

निवासी शिबिर २०१९-२० हे सातारे बडगाव या ठिकाणी व्यवस्थित नियोजन करून केलेले आहे. वृक्षारोपण 3000 हजार झाडे लावून त्यांचे संगोपना करण्याचे ठरले आहे. ग्रामीण स्वच्छता करण्याचे आणि एकंदरीत सर्व कामांचे आयोजन व नियोजन करण्यासाठी प्रशासन पुरस्कृत व गावकरी यांचे, सहकार्य मिळून आले।

पुढील कार्यासाठी शुभेच्छा।

Kpatil

6/1/2020

Dr. T. R. Patil

MSJ Director.

Dr. BAMU

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

# ता. आष्टी जि. बीड

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर २०१९-२०२० अहवाल

महाविद्यालयाचे विशेष शिबीर दि. ३१/१२/२०१९ ते ०६/०१/२०२० या कालावधीमध्ये संपन्न झाले असून मंगळवार दि. ३१/१२/२०१९ रोजी शिबीराचे उद्‌घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते (विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद) होते. तसेच उद्‌घाटक म्हणून नायब तहसिलदार मा. प्रदिप पांडूळे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मा. दत्ता काकडे (अध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र) हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये दैनिक झुंजार नेताचे सहाय्यक संपादक मा. उत्तमराव बोडखे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मा. राजाराम नन्नवरे, सरपंच मा.डॉ. राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे, मा. बलभीम सुंबरे, मा.बबन सुंबरे पा. यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला.

दुपारच्या सत्रामध्ये गट चर्चा घेण्यात आली. रात्री ८.३० ते १०.३० वा कविसंम्मेलन पार पडले. या मध्ये कवि प्रा. नागेश शेलार, मा. हरिष हातवटे यांनी बहारदार कविता सादर करुन रसिकांची मने जिंकली. शिबीराच्या दैनंदिनी प्रमाणे दररोज पहाटे ५.३० ते ६.३० वा. पर्यंत स्वयंस्वच्छता करुन ६.३० वा. गावातून दररोज रामधुन फेरी झाल्यांनतर लगेच योगा व प्राणायम नियमितपणे घेण्यात आले. सकाळी योगा-प्राणायमानंतर ठिक ७.३० ते ८.३० वा. या वेळेत दररोज नाष्टा दिला जात असे. सकाळी ठिक ८.३० ते १२.३० या वेळेत दररोज श्रमदान करण्यात येत होते.

बुधवार दि. ०१/०१/२०२० रोजी प्रथम ग्राम सफाई, महादेव मंदिर सफाई व कब्रस्थान सफाईचे काम करुन स्वयंसेवकांनी श्रमदान केले. यानंतर १२.३० ते १.३० स्नान आणि १.३० ते ४.०० भोजन व विश्रांती, ४.०० ते ६.३० वा प्रकल्प गट चर्चा व बौध्दीक कार्यक्रम नियमित घेतले जात असत. संध्याकाळी ६.३० ते ८.०० जेवण करुन रात्री ८ ते १० या वेळेत श्री. वाघमारे यांचे ''व्यासनाधिनता व युवक'' तसेच प्रा.डॉ.सज्जन गायकवाड यांचे ''संत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेविषयीचे विचार'' या विषयावर स्वयंसेवकांना उद्‌बोधन करण्यात आले.

गुरुवार दि. ०२/०१/२०२० सकाळच्या दैनंदिनीनंतर कब्रस्थानचे उर्वरीत सफाई करण्यात आली. व रात्री ८.०० ते १०.०० वा. ''जलसंवर्धन व व्यवस्थापन (पाणी ताळेबंद)'' या विषयावर मा. राजेश बोडखे व शेख अझहर यांचे व्याख्यान झाले.

शुक्रवार दि. ०३/०१/२०२० रोजी सकाळी दैनंदिनी नंतर जानपीर माळावर ३००० वृक्ष लागवड ग्रामपंचायतच्या माध्यमातुन केलेली आहे. त्यापैकी ०३/०१/२०२० रोजी २००० वृक्षांना आळे करुन श्रमदान पूर्ण केले. तसेच रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत ''वृक्ष व पाणी संवर्धन'' या विषयावर मा. कैलास पन्हाळकर यांचे व्याख्यान झाले.

शनिवार दि. ०४/०१/२०२० रोजी सकाळी ठिक १०.०० वा आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे श्री. जयचंद शिवमूर्ती नलवाडे व श्रीमती सुजाता दहिफळे यांच्या मदतीने आरोग्य शिबीर व रक्त तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये एकूण ९६ जणांचे रक्त व एचआयव्ही तपासणी करण्यात आली. दुपारी मा.प्रा.सोपान सुरवसे (जिल्हा समन्वय एन.एस.एस.) यांनी कॅम्पला भेट देऊन अभिप्राय दिला. रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत मा. अंगत हजगुडे उस्मानाबाद यांचे ''शेंद्रीय शेती व्यवस्थापन'' या विषयावर व्याख्यान झाले.

रविवार दि. ०५/०१/२०२० रोजी सकाळच्या दैनदिनीनंतर १००० झाडांना आळे, १५० जळालेल्या ठिकाणची वृक्ष लागवड करुन संपूर्ण झाडांना पाणी देण्यासाठी केलेली १ किलोमीटर पाईपलाईन बुजवण्याचे काम पूर्ण केले. तसेच रात्री ८.०० ते १०.०० या वेळेत मा. संतोष शिनगारे (मराठवाडा विभाग प्रमुख, पाणी फौंऊडेशन) यांचे समृध्द ग्राम या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश कळसाईत हे होते.

सोमवार दि. ०६/०१/२०२० रोजी सकाळी दैनंदिनी नंतर नाष्टा करुन ग्राम सफाई करण्यात आली. ग्रामसफाई नंतर स्नान व त्यानंतर समारोप समारंभाची तयारी करण्यात आली. दुपारी १२.०० वा समारोप समारंभास सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते हे होते. तसेच प्रमुख पाहुणे मा. प्रा.डॉ.टी.आर. पाटील (संचालक एन.एस.एस.विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) व मा. राजेंद्र सुपेकर (तालुका कृषी अधिकारी, आष्टी) यांची प्रमुख उपस्थिती होती. मा.प्रा.टी.आर.पाटील यांनी प्रथम आगमनानंतर सात दिवशीय शिबीरामध्ये केलेल्या कामाची पहाणी केली. सर्व कामे केलेल्या ठिकाणी भेट दिली व स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

निरोप समारंभात बोलताना त्यांनी केलेल्या कामांचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले शिवाय अशा प्रकारे देशातील युवक कार्यरत झाला तर देश समृध्द होण्यास वेळ लागणार नाही. विद्यापीठाच्या सर्व स्वयंसेवकांनी देशाप्रती आपली निष्ठा जपण्याचे महान कार्य आपण करत आहात आणि हे कार्य समाजाचा दृष्टीकोन बदलण्यासाठी महत्वाचे आहे. तसेच प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते अध्यक्षस्थानावरुन बोलताना स्वयंसेवक हा देशाचा आधार आहे असे सांगीतले. मा.सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे, मा. संतोष शिनगारे यांनी केलेल्या कामांचे कौतुक करुन विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रामस्थ व महाविद्यालयाच्या स्टाफची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. या शिवाय मा.प्रा.टी.आर.पाटील यांनी समाधान व्यक्त करत आपला अभिप्राय नोंदवून शिबीराबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी शिबीराचे अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.जी.विधाते यांनी केले व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीमती एस.बी.कुचेकर यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# समारोप समारंभ

सोमवार दि. ६/१/२०२० रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता
खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

**अध्यक्ष**

## मा. भीमरावजी धोंडे साहेब
(मा. आमदार, आष्टी-पाटोदा-शिरूर)

**प्रमुख उपस्थिती**

मा. प्रा. डॉ. टी. आर. पाटील
(संचालक, रा.से.यो. डॉ. बा.आ.म.वि.औ.बाद)

मा. उत्तमराव बोडखे
(सहाय्यक, संपादक दै. झुंजारनेता)

मा. संतोष शिनगारे
(मराठवाडा, प्रमुख पाणी फौंडेशन)

**आपले विनित**

डॉ. एच. जी. विधाते
(प्राचार्य)

प्रा. डॉ. राम बोडखे
(सरपंच, सराटेवडगांव/आनंदवाडी)

सौ. आयोध्या महादेव शिंदे
(उपसरपंच, सराटेवडगांव/आनंदवाडी)

प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण
(कार्यक्रमाधिकारी)

प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर
(कार्यक्रमाधिकारी)

प्रा. डॉ. आर. जी. विधाते
(कार्यक्रमाधिकारी)

ग्रा. पं. सदस्य :- श्री. बाळकृष्ण तरटे, श्री. नबीबशेख, सौ. छाया गजघाट, सौ. कमलाबाई गुंड, सौ. रुपाली मिसाळ, श्री. विजय बोडखे, श्री. कृष्णा बोडखे सौ. संगिता बोडखे तसेच सर्व आजी-माजी सरपंच, उपसरपंच, से.स. सो. चेअरमन, सदस्य ग्रामपंचायत सदस्य, सर्व तरुण मंडळ व ग्रामस्थ मौजे सराटेवडगांव, ता. आष्टी, जि. बीड

---

सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, जि. बीड.

---

*समाज सेवा हीच ईश्वर सेवा !*

*खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा ।*
*झटू सर्व भावे करु स्वर्ग गावा ।।*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड-४१४ २०२
(नॅक मुल्यांकन 'अ' दर्जा प्राप्त)
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

## राष्ट्रीय सेवा योजना

### "समृध्द ग्रामसाठी युवा,"

### विशेष शिबीर २०१९-२०

**NOT ME - BUT YOU**

३१ डिसेंबर २०१९ ते ६ जानेवारी २०२०

**स्थळ**

मौजे सराटेवडगांव/आनंदवाडी, ता. आष्टी, जि. बीड

प्रति,
श्रीमान ______________________
______________________
______________________

**प्रेषक**

प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड

---

*स्वच्छता ही आरोग्याची गुरु किल्ली*




दि. ३१/१२/२०१९ विशेष शिबीर उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते व्यासपीठावर उपस्थित नायबतहसिलदार मा. प्रदिप पांडुळे, मा. दत्ता काकडे (अध्यक्ष सरपंच परिषद महाराष्ट्र), मा. उत्तमराव बोडखे चेअरमन मा. राजाराम नगवरे.



विशेष शिबीरात रात्री उद्बोधन कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करताना उपसरपंच सौ. अयोध्या शिंदे, व्याख्याते सह कार्यक्रम अधिकारी



प्रती दिन रामधुन फेरी सकाळी शिबीर काळात अशी पार पडत असे



शिबीर काळात दररोज रामधुन फेरी नंतर स्वयंसेवक योगा व प्राणायाम करताना



मौजे सराटेवडगांव येथील कब्रस्तान स्वच्छता करण्याआगोदर असलेले गवत व झुडपे.



कब्रस्तान स्वच्छता (गवत निर्मूलन) करताना रा.से.यो. चे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनी व कार्यक्रम अधिकारी डॉ. चव्हाण बी.एम. प्रा.डॉ. आर.जी. विध्याते व श्रीमती शैलजा कुचेकर



कब्रस्तान ची सफाई पूर्ण झाल्यानंतर एन.एस.एस. चे स्वयंसेवक



दिड एकर कब्रस्तान सफाई नंतर पहाणी करताना NSS चे जिल्हा समन्वयक मा. प्रा. डॉ. सोपान सुरवसे, आदर्श सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, डॉ. सोनटक्के, डॉ. जी. पी. बोडखे सह कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चवाण, प्रा. डॉ. विधाते



दिड एकर (60 गुंठे) कब्रस्तान परीसर स्वच्छते नंतर ~~[illegible]~~ उंचावरुन घेतलेला फोटो



शिबीर कालावधी मध्ये दि. 4/1/2020 रोजी ग्रामस्थांसाठी रक्त व एच. आय. व्ही. तपासणी करताना आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे मा. जैनचंद मेलवाड व श्रीमती हरिफळे मॅडम तपासणी करताना



तीन हजार वृक्षांना आळे करताना NSS चे स्वयंसेवक



165 किमी लांबीच्या पाइपलाइन बुजवण्याचे काम करताना एनएसएस
चे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थीनी



मा. टी आर. पाटील (संचालक) विशेष शिबीरात 3000 झाडे केलेले आहे व गवत निमूर्लन पाहणी करताना समवेत प्राचार्य डॉ एच जी विधाते, उपप्राचार्य डॉ वाघुळे, ता कृषी अधिकारी मा राजेंद्र कुणेकर तसेच सरपंच प्रा डॉ राम बोडखे



पाइपलाइज (दिड किमी लांब) खुजवूज पूर्ण झाल्यानंतर आनंद व्यक्त करताना एन.एस.एस.चे काही स्वयंसेवक



मौजे सरोटेवडगांव / मानंदवाडी गावचे वॉटर बजेट विद्यार्थी-विद्यार्थीनीं यांना समजावून सांगतांना गावचे सरपंच मा. प्रा. डॉ. राम बोडखे



कुजवलेल्या पाईपलाइन ची पाहणी करतांना [illegible]
संचालक मा. डॉ. टी. आर. पाटीलसर, मा. प्राचार्य विधाते, कृषी अधिकारी मा. कुपेकर साहेब व सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे




दि. ६।१।२०२० रोजी समारोप प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित मा. संचालक डॉ. टी. आर. पाटीलसर, ता. कृषी अधिकारी मा. राजेंद्र खुपेकर, मा. प्राचार्य डॉ. एच. जी. विधातेसर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले तसेच सरपंच मा. डॉ. राम बोडखे, उपसरपंच मा. महादेव शिंदे

बीड-महाराष्ट्र
# झुंजार नेता
दिनांक : १ जानेवारी २०२० • वार : बुधवार •पान ३

## धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे उदघाटन संपन्न

कडा,दि.३१(प्रतिनिंधी): कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व राष्टीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबीराचे उदघाटन दि.३१/१२/२०१९ रोजी नायब तहसिलदार प्रदिप पांडूळे यांच्या हस्ते झाले. व प्रमुख पाहुणे महाराष्ट्र सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच महादेव शिंदे, बलभीम सुबरे, राजाराम ननवरे, पत्रकार उत्तम बोडखे, बबन सुबरे, ग्रामविकास अधिकारी गोवर्धन सायंबर, तलाठी पोपटराव गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब अंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परीषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. परीसरातील सर्व ग्रामस्थ विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण यांनी. तर सुत्रसंचालन प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी व आभार प्रा.डॉ.दत्ता नरसाळे यांनी मानले.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Baboji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक १ जानेवारी २०२० बुधवार ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI


## आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे उदघाटन संपन्न

कडा (प्रतिनिधी):--येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर मौजे सराटेवडगाव/आनंदवाडी येथे आयोजित करण्यात आले आहे.या शिबीराचे दि.३१/१२/२०१९ रोजी उदघाटन संपन्न झाले असून उदघाटक म्हणून नायब तहसिलदार मा.प्रदिप पांडूळे साहेब व प्रमुख पाहुणे मा.दत्ता काकडे अध्यक्ष सरपंच परीषद मुंबई, महाराष्ट्र हे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच महादेव शिंदे, मा.बलभीम सुबरे, मा.राजाराम ननवरे, बबन सुबरे पाटील, ग्रामविकास अधिकारी गोवर्धन सायंबर, तलाठी पोपटराव गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.उदघाटन समारंभाचे अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब अंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परीषद सदस्य मा.प्राचार्य डॉ.हरिदास विधाते हे होते. परीसरातील सर्व ग्रामस्थ विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक,प्राध्यापीका, कार्यक्रमाधिकारी शैलजा कुचेकर यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी व अभार प्रा.डॉ.दत्ता नरसाळे यांनी मानले.

नितीन कांबळे यांना गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर कडा आष्टी येथील माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई, वडील यांच्या प्रित्यार्थ दरवर्षी देण्यात येणारा राज्य स्तरीय गंगाई - बाबाजी पुरस्कार नुकताच कडा येथील पत्रकार नितीन कांबळे यांना जाहीर करण्यात आला आहे.आष्टी तालुक्यात गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, यासह सांप्रादायिक लिखाण करत लेखणीच्या माध्यमातून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी लेखणी करणाऱ्या युवा पत्रकार नितीन कांबळे यांच्या कार्याची दखल घेऊन नुकताच गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार नितीन कांबळे यांना जाहीर झाला असुन मान्यवरांच्या उपस्थितीत यांचे वितरण होणार आहे. पुरस्कार जाहीर होताच अनेकांनी फोन मेसेज वरून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

झुंजार नेता

हाराष्ट्र ■ मंगळवार दि. ७ जानेवारी २०२० ■ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/

# युवक हाच खरा विकासाचा मार्ग - डॉ. पाटील

कडा दि.६ (प्रतिनिधी)- आजचा तरुण हाच खरा विकासाचा ार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण ागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब ांबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. ी. आर्. पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास राष्ट्रीय सेवा ोजना शिबीरातुन होतो. हे शिबीर म्हणजे एक संस्कारांची ज्योत आहे ासे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी आष्टी ालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर राठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे हाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक ाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब ांबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य . हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र ेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय ा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरूंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थींनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणार्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. महाविद्यालयाने शिबिराचे माध्यमातून चांगली विकास कामे केली. प्राध्यापकांनी यापुढे अध्यापनाबरोबरच गावात जाऊन सामाजिक कार्य करावे. आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे असेही डॉ. पाटील यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी सांगितले की, मी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी आहे. शिबीरातुन संभाषण कौशल्य मिळते, कार्यक्रमाचे नियोजन कसे करावे याची माहिती मिळते.



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातुन होतो. हे शिबीर म्हणजे एक संस्कारांची ज्योत आहे. एकमेकांना नावे ठेवण्यापेक्षा आपण ज्या क्षेत्रात काम करतो ते प्रामाणिकपणे करा. आपल्याला काय व्हायचे आहे ते वेळेत ठरवा तरच ते विद्यार्थी जिवनात यशस्वी होतात. बौद्धिक पातळीतुन स्वतःची ओळख निर्माण करा




महाविद्यालयाचे दत्तक गांव मौजे खरटेवडगांव/आनंदवाडी येथे आरोग्य तपासणी व एड्स जनजागृती प्रसंगी आरोग्य कर्मचारी मा. नेलावडे साहेब, सौ. सोनवणे मॅडम, मा. सरपंच डॉ. बोखरे व कार्यक्रम अधिकारी



महाविद्यालयामध्ये आरोग्य शिबीराचे आयोजन करुन विद्यार्थी-विद्यार्थीनी आरोग्य तपासणी करताना.

Scanned by CamScanner



माहाविद्यालयाच्या सभागृहात प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथक
एड्स व रक्तगट, एच.बी. तपासणी शिबीरात तपासणी करताना.
मा. डॉ. मोरे साहेब व टीम.

Scanned by CamScanner

झुंजार नेता

दिनांक : ०५ जानेवारी २०२० वार: रविवार • पान ३

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्त तपासणी

कडा दि.४ (प्रतिनिधी): राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या वतीने एड्स जनजागृती व तपासणी शिबीर सराटेवडगाव येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थांनी रक्त तपासणी करून घेतले. या उपक्रमासाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयातील जयचंद नेलवडे व श्रीमती सुजाता दहिफळे या उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजाराम ननवरे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच डॉ. राम बोडखे. डॉ. जी. पी. बोडखे, डॉ. सांगळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रसंगी मार्गदर्शन करताना जयचंद नेलावडे यांनी एड्स विषयी विद्यार्थी-व्रिद्यार्थीनी एड्स विषयी माहिती सांगून जनमानसात जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी करण्याचे आवाहन केले. एड्स हा संसर्गजन्य नाही त्यामुळे आपण एड्सग्रास्तांना माणूसकीची वागणूक दिली पाहिजे.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.श्रीमती शैलजा कुचेकर व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी मानले.

Scanned by CamScanner

# युवा (RRC) कार्यक्रम

Date 22/1/2020

सलोटेपळगांव

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा राष्ट्रीय सेवा योजना व्यव ऑक्टिव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने NSS ला कार्यक्रम घेण्यात आला. त्यात मुलांना HIV/AIDS ह्या बाबत मार्गदर्शन करण्यात आले व तसेच विद्यार्थ्यांना TB विषयी माहिती सांगण्यात आले. तसेच STI विषयी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले व त्यांना माहिती देऊन विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या वेळी 37 जणांची HIV तपासणी केली व 70 जणांना IEC वाटप केले

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | पोटे अक्षय दत्तात्रेय | वय - 20/M | 13.4 | - [signature] |
| 2) | कोळपे आकाश संजय | वय - 20/M | 14.2 | - [signature] |
| 3) | आहेर प्रवीण सुभेदार | 19/M | 13.8 | - [signature] |
| 4) | भगत विशाल नामदेव | 19/M | 14.0 | [signature] |
| 5) | ससाणे निखील शिवाजी | 19/M | 13.4 | [signature] |
| 6) | शेख सद्दाम बदरुद्दीन | 20/M | | [signature] |
| 7) | पिपळे प्रतीक आप्पासाहेब | 20/M | 14.0 | [signature] |
| 8) | सातके रवीन्द्र राजू | 21/M | 14.4 | - [signature] |
| 9) | खंडतोड संदीप बिभीषण | 21/M | 13.4 | - [signature] |
| 10) | कोळपे प्रवीण संतोष | | 13.5 | - [signature] |
| 11) | कोळपे हृषीकेश रोहिदास | | 13.9 | - [signature] |
| 12) | कापरे दिपक भागवत | 21/M | 14.0 | - [signature] |
| 13) | पवार राहुल मुरलीधर | 22/M | 13.6 | - [signature] |
| 14) | कोळपे विजय रामदास | 19/M | 14.2 | - [signature] |
| 15) | गवघाट विक्रम संभु | 18/M | 14.0 | - [signature] |
| 16) | राजु अशोक आमटे | 20/M | 13.0 | - [signature] |
| 17) | हनुमान राठेवर अमोल | 22/M | 13.0 | - [signature] |
| 18) | कोळपे मनोज सदेराव | 20/M | 13.6 | - [signature] |
| 19) | वाघमारे रोहीत रमेश | 20/M | 10.9 | - [signature] |
| 20) | मोरे प्रदिप रामदास | 19/M | 13.6 gm | - [signature] |
| 21) | पंकज आजुदास धाडगे | 19/M | 13.5 | - [signature] |
| 22) | नरवडे [illegible] | 21/M | 12.8 | - [signature] |
| 23) | शेख जमीर कौसर | 19/M | 13.6 | - [signature] |
| | [illegible] परमेश्वर गवघाट | 21/R | 9.4 | - [signature] |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26) | सीमा रावसाहेब गजघाट | २५/१२ | 9.0 | [signature] |
| 27) | अंजली शरद गायकवाड | १५-११/१२ | 10.5 | गायकवाड |
| 28) | अनुजा बाबु शिंदे | 19/12 | 8.5 | Anuja |
| 29) | अश्विनी दिलीप मोरे | 19/12 | 11.0 | Ashwini |
| 30) | अपर्णा गणेश कान्हेरकर | 19/12 | 10.2 | Kanharkar |
| 31) | रोहिणी नवनाथ [illegible] | 19/12 | 10.5 | Rohini |
| 32) | स्नेहल अशोक मोरे | 19/12 | 9.5 | Snehal |
| 33) | शिंदे अश्विनी अर्जुन | 21/12 | 9.0 | [signature] |
| 34) | माधुरी भाऊसाहेब डांगे | 21/12 | 11.0 | Madhuri |
| 35) | शिवानी अनिल धोंडे | 21/12 | 10.0 | [signature] |
| 36) | अंजली बाबु अक्केमकारे | 21/12 | | Anjali |
| 37) | स्वाती संतोष माने | | | |

Sujata

केंद्रीय अधिक्षक
ग्रामीण रुग्णालय आष्टी
ता आष्टी जि बीड

Programme Officer
N.S.S. Unit A. D. Mahavidyalaya,
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

प्रमुख शाखा संचालक
ग्रामीण रुग्णालय आष्टी
ता.आष्टी जि.बीड

Scanned by CamScanner

झुंजार नेता

दिनांक : ०५ जानेवारी २०२० वार: रविवार • पान ३

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्त तपासणी

कडा दि.४ (प्रतिनिधी): राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या वतीने एड्स जनजागृती व तपासणी शिबीर सराटेवडगाव येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थींनी, ग्रामस्थानी रक्त तपासणी करून घेतले. या उपक्रमासाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयातील जयचंद नेलवडे व श्रीमती सुजाता दहिफळे या उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजाराम ननवरे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच डॉ. राम बोडखे. डॉ. जी. पी. बोडखे, डॉ. सांगळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रसंगी मार्गदर्शन करताना जयचंद नेलावडे यांनी एड्स विषयी विद्यार्थी-विद्यार्थींनी एड्स विषयी माहिती सांगून जनमानसात जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी-विद्यार्थींनी यांनी करण्याचे आवाहन केले. एड्स हा संसर्गजन्य नाही त्यामुळे आपण एड्सग्रास्तांना माणूसकीची वागणूक दिली पाहिजे.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.श्रीमती शैलजा कुचेकर व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी मानले.

# चंपावतीपत्र

बीड | वर्ष ५४ वे । अंक ३३७

मंगळवार, दि.०७ जानेवारी २०२० । पाने ८। किंमत रु.२ | www.champavateepatra.in | champavatee@gmail.com | R.N.I. Regd No.


Dhande Alias Balaji Jr. College LIBRARY

## शेख शोहेबची निवड



टोर्नामेंट महाराष्ट्र क्रिकेट अशोसिएशन अंतर्गत घेण्यात आलेल्या निवड चाचणीत माजलगाव येथील तरुण क्रिकेट अकॅडमीचा खेळाडु शेख शोहेब हाय्युम पिंजारी याने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केल्याने याची बीड जिल्हा क्रिकेट संघात निवड

## युवक हाच खरा विकासाचा मार्ग-डॉ.टी.आर.पाटील

आष्टी । वार्ताहर

आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी



ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थींनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणाया

पान ७ वर

गटविकास अधिकारी राजेंद्र बागडे तालुकाध्यक्ष डॉ. मधुसूदन खेडकर ज्येष्ठ नेते दशरथ दादा वनवे माजी जिप उपाध्यक्ष शिवाजीराव पंडे राजाभाऊ जाधव प्राचार्य डॉ. नामदेवराव सानप सर सतीश काटे निवृत्ती बेद्रे रेखाताई जरांगे सुवर्णा चौधरी सुभाष शिरसागर उपस्थित होते. आपल्या सत्काराला उत्तर देताना सभापती सौ उषा सर्वदे व उपसभापती जालिंदर सानप यांनी पंचायत समिती द्वारे ग्रामीण विकास गतिमान करू अशी ग्वाही दिली व जनसामान्यांच्या दारापर्यंत विकास योजना पोहोचण्याची हमी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे आपल्या भाषणात म्हणाले की नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना ग्रामीण विकासाची व शिरूरकासार तालुक्याचे जे स्वप्न ज्येष्ठ नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी पाहिले ते पूर्ण करण्याची संधी प्राप्त झाली आहे त्यासाठी प्रयत्न करावेत समाजाचे उपकार फेडले तर लोकप्रतिनिधींची प्रगती होते भविष्यात सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य करण्याची गरज आहे असे मत व्यक्त करून पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. तहसीलदार श्री श्रीराम बेंडे ज्येष्ठ नेते दशरथ दादा वनवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले उपस्थित सर्व मान्यवरांचा आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार पंचायत समिती प्रशासनाद्वारे करण्यात आला नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा विविध गावच्या सरपंचांनी व ग्रामसेवकांनी वाहतूक संघटना यांनी सत्कार केला या कार्यक्रमास उपसरपंच मुराद पठाण , राजा भाऊ जाधव, निजाम ताबोळी, गणेश सानप भगवानराव सानप , रवींद्र कोकणे भागवत सानप, सुरेश जाधव चंद्रभान डोळे देवा गरकळ चंदू कुलकर्णी, सुलेमान पठाण नूर टेलर एम एन बडे प्रभाकर सानप माऊली सानप हरी मामा खेडकर विजय सरवदे प्रकाशराव इगळे आयुब शेख सह आदी गावचे पंचायत समिती सदस्य सरपंच चेअरमन नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री जायभाये यांनी केले तर शेवटी आभार सूत्रसंचालन देविदास बडे यांनी मानले.

लोकमत

# हॅलो बीड

औरंगाबाद, बुधवार, दि. ८ जानेवारी २०२०

## सराटे वडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा :डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी तालुक्यातील सराटे वडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर पार पडले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षपदावरुन बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी श्रमाची महती विद्यार्थ्यांना पटवून दिली. प्रास्ताविकातून कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी शिबीर कालावधीत सराटेवडगावात युवकांनी श्रमदानातून केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला.



कामाची पाहणी करताना कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, प्रा. डॉ पाटील, प्राचार्य डॉ हरिदास विधाते.

याप्रसंगी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, यांनी मनोगत व्यक्त केले. सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, प्रवीण आटोळे, आकाश बोडखे, रोहित वाघमारे, अश्विनी जिवे, वैष्णव नरवडे, उत्कर्षा कन्हेरकर यांची यावेळी भाषणे झाली.

यावेळी बेस्ट विद्यार्थी म्हणुन आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले.

www.epunyanagari.com
Toll Free ✆ 9773927928

पुण्य नगरी

नेवारी २०२० । वर्ष : १५ । अंक : २७८ । पाने १२+४=१६ ★ किंमत : ₹ ५.०० सोने : 37,800 ◆ चांदी : 48,770

# युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे : पाटील



**कडा / प्रतिनिधी :** आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. टी. आर. पाटील यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, नंबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापीठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापीठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापूर कालावधीत मोठे काम केले. युवकांनी शिबिरातून चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पूर्ण करावे. विद्यापीठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघा शिबिरार्थींची रायगड व वर्धा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. यावेळी इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, प्रविण आटोळे, आकाश बोडखे, रोहित वाघमारे, आश्विनी जिवे, वैष्णव नरवडे, उत्कर्षा कन्हेरकरसह आदी उपस्थित होते. यावेळी शिबिरातील बेस्ट विद्यार्थी म्हणून आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले.

Chavan. Sir

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com

अंक ३४७ ■ बुधवार, दि.८ जानेवारी २०२० ■ Reg.No.L/83/RNP / Beed/2020-2022 RNI Reg. No.MAHMAR/20

# युवक हाच खरा विकासाचा मार्ग-डॉ.पाटील

**कडा । वार्ताहर**

आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी



राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती. डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थिंनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणार्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी शिबिर कालावधीत सराटेवडगावात युवकांनी श्रमदानातून केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. याप्रसंगी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी सांगितले, गावातील चांगल्या कामामुळे सराटेवडगांव आनंदवाडी ही गावे राज्यात नावलौकिक झाले आहे. यासाठी ग्रामस्थांचा सहभाग व सहकार्य केले. कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी गावातील शेततळ्यासाठी मोलाचे सहकार्य केले. यावेळी विद्यापीठाचे रासेयोचे स्वयंसेवक सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, शिबिरार्थी प्रविणआटोळे, आकाश बोडखे,रोहित वाघमारे,आश्विनी जिवे, वैष्णव नरवडे, उत्कर्षा कन्हेरकर व इतरांची भाषणे झाली. यावेळी शिबिरातील बेस्ट विद्यार्थी म्हणुन आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सुत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले. कार्यक्रमास शिबिरार्थी युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ शनिवार दि. ४ मे २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Bee


## पाणी फाऊंडेशन शिबीरात धोंडे

## महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान

कडा, दि.३ (प्रतिनिधी):- आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून समाजासाठी काहीतरी करावे हा हेतु समोर ठेवून नेहमीच सामाजिक कार्यात आष्टी तालुक्यात अग्रेसर असणाऱ्या कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाने महाराष्ट्र दिनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक घेतलेल्या सराटेवडगाव येथे सुरू असलेल्या पानी फाऊंडेशनच्या कामाला प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी श्रमदान करून मदतीचा हात दिला आहे.



यावावत अधिक माहिती अशी की, सिनेअभिनेते अमिर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते कार्यक्रमाअंतर्गत पानी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धा २०१९ संपुर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. गावागावांत नागरिक रात्री व सकाळी श्रमदान करून कायमचा पाणी प्रश्न सुटावा यासाठी प्रयत्न करीत आहेत. या कामांकरिता ग्रामस्थांसोबत श्रमदान करण्यासाठी विविध क्षेत्रातील व प्रतिष्ठीत नागरिक सहभागी होऊन श्रमदान करीत आहेत. गतवर्षी पाणी फाऊंडेशनचे वॉटर कप स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक मिळविलेल्या आनंदवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी यावेळी सराटेवडगाव या गावाला बक्षिस मिळवुन देण्यासाठी विडा उचलला आहे. युवकांचे संघटन करीत गावातील महिला, ग्रामस्थ व युवकांना सोबत घेऊन सरपंच राम बोडखे रात्रंदिवस श्रमदान करीत आहेत. १ मे हा कामगार दिन, या दिनाच्या निमित्ताने कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलो तरी एक कामगार म्हणुन श्रमदान करणे आवश्यक आहे. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सराटेवडगांव आनंदवाडी हे गाव दत्तक घेतले आहे. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते, उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. बापु खैरे, प्रा डॉ विजय पोकळे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि एन. एन. एस.चे स्वयंसेवकांनी श्रमदान केले.

अहमदनगर केसरी १४ मे २०१९ ३



# शिक्षकांच्या हातात खडु-डस्टरऐवजी खोरे-घमेले-टिकाव; तीन तास केले श्रमदान

**कडा, (वार्ताहर) :** वर्षभर हातात खडू डस्टर घेऊन विद्यार्थ्यांसमोर फळ्यावर लिहून ज्ञानार्जन करणाऱ्या नाजूक हातात सराटेवडगाव येथे सत्यमेव जयते पाणी फाऊंडेशनच्या श्रमदानाच्या कार्यक्रमात शिक्षकांनी चक्क हातात टिकाव, खोरे, घमिले घेऊन सुमारे तीन तास श्रमदान केले.

याबाबत अधिक माहिती अशी की अभिनेते आमीर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धा सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे, प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. रात्री व सकाळी गावातील महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक, बालक, मुले श्रमदान करीत आहेत. सध्या सुट्टी असल्यामुळे शाळेतील मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी या कामात चांगलीच गुंतले आहेत. आपले गाव पाणीदार करण्यासाठी सर्व प्रकारचे मतभेद विसरून ग्रामस्थ श्रमदान करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आपल्या गावाची पाणी समस्या कायमची सोडवण्यासाठी आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणी फाऊंडेशनचे काम चालू आहे. यामध्ये विशेष करून सराटेवडगाव येथे हे काम जोरात सुरु आहे. सरपंच प्रा. राम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील युवक, महिला, युवती, शाळेतील मुले व बालक, आबालवृद्ध सध्या दररोज सकाळी व संध्याकाळी शेतात जाऊन श्रमदान करीत आहेत. बांधबंदिस्ती, चर खोदणे इत्यादी जलसंधारणाची कामे करत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आष्टी तालुक्यातील [illegible] धोंडे महाविद्यालय, धानोरा [illegible] जाऊन हातात खोरे, घमिले व टिकाव घेऊन श्रमदान केले.

काही शिक्षकांनी हातात टिकाव घेऊन जमीन खोदली तर अनेक जण माती भरून देण्याचे काम करीत होते व काही जण मातीचा भराव घालण्याचे काम करीत होते. सकाळी उन्हाचा चटका होता. डोक्याला गमजा बांधून, डोक्यात टोपी घालून शिक्षक श्रमदान करताना दिसत होते, तर गावातील ज्येष्ठ नागरिक दमलेल्या शिक्षकांना ग्लासभर पाणी पिण्यास देत होते. ढोल ताशाच्या गजरात शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. शिक्षक जरी शेतकऱ्यांची मुले असली तरी त्यांना ज्यादा कष्टाची सवय नसल्याने ते घामाघुम झाले होते.

आमदार भीमराव धोंडे यांनी शिक्षक व ग्रामस्थ सोबत श्रमदान केले. त्याच्यासोबत केंद्रप्रमुख सुरेश मिरगणे, दिव्यांग शिक्षक नेते आदर्श शिक्षक, सिद्धेश्वर शेंडगे, राजेंद्र लाड, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, पैलवान बाळासाहेब शेंदुरकर, तसेच उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, सहायक प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, धानोरा येथील प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांच्यासह जवळपास ७० ते ८० शिक्षकांनी तीन तास श्रमदान करून सराटेवडगावच्या पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभाग नोंदवला.

झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ मंगळवार दि. १४ मे २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed

# शिक्षकांच्या हातात खडु - डस्टर ऐवजी खोरे-घमिले आणि टिकाव; तीन तास केले श्रमदान

कडा, दि.१३ (प्रतिनिधी):- वर्षभर हातात खडू डस्टर घेऊन विद्यार्थ्यांसमोर फळ्यावर लिहून ज्ञानार्जन करणाऱ्या नाजूक हातात सराटेवडगाव येथे सत्यमेव जयते पाणी फाऊंडेशनच्या श्रमदानाच्या कार्यक्रमात शिक्षकांनी चक्क हातात टिकाव, खोरे, घमिले घेऊन सुमारे तीन तास श्रमदान केले.



याबाबत अधिक माहिती अशी की अभिनेते आमिर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धा सध्या संपूर्ण महाराष्टात सुरु आहे, प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. रात्री व सकाळी गावातील महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक, बालक, मुले श्रमदान करीत आहेत. सध्या सुट्टी असल्यामुळे शाळेतील मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी या कामात चांगलीच गुंतले आहेत. आपले गाव पाणीदार करण्यासाठी सर्व प्रकारचे मतभेद विसरून ग्रामस्थ श्रमदान करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आपल्या गावाची पाणी समस्या कायमची सोडवण्यासाठी आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणी फाऊंडेशनचे काम चालू आहे. यामध्ये विशेष करून सराटेवडगाव येथे हे काम जोरात सुरू आहे. सरपंच प्रा. राम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील युवक, महिला, युवती, शाळेतील मुले व बालक, आबालवृद्ध सध्या दररोज सकाळी व संध्याकाळी शेतात जाऊन श्रमदान करीत आहेत. बांधबंदिस्ती, चर खोदणे इत्यादी जलसंधारणाची कामे करत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय, धानोरा येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय तसेच महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुई नालकोल या शाळेतील शिक्षकांनी सराटेवडगाव येथे जाऊन हातात खोरे, घमिले व टिकाव घेऊन श्रमदान केले. काही शिक्षकांनी हातात टिकाव घेऊन जमीन खोदली तर अनेक जण माती भरून देण्याचे काम करीत होते व काही जण मातीचा भराव घालण्याचे काम करीत होते. सकाळी उन्हाचा चटका होता. डोक्याला गमजा बांधुन, डोक्यात टोपी घालून शिक्षक श्रमदान करताना दिसत होते, तर गावातील ज्येष्ठ नागरिक दमलेल्या शिक्षकांना ग्लासभर पाणी पिण्यास देत होते. ढोल ताशाच्या गजरात शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. शिक्षक जरी शेतकऱ्यांची मुले असली तरी त्यांना ज्यादा कष्टाची सवय नसल्याने ते घामाघुम झाले होते. यावेळी लोकप्रिय आमदार भीमराव धोंडे यांनी शिक्षक व ग्रामस्थ सोबत श्रमदान केले. त्याच्यासोबत केंद्रप्रमुख सुरेश मिरगणे, दिव्यांग शिक्षक नेते आदर्श शिक्षक, सिद्धेश्वर शेंडगे, राजेंद्र लाड, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, पैलवान बाळासाहेब शेंदुरकर, तसेच उपप्राचार्य डॉ. भगवान वाघले, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्टीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ.भास्कर चव्हाण, सहायक प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रा डॉ गोरक्ष पठारे, प्रा डॉ अशोक माळशिखरे, चेअरमन प्रा. डॉ शाम सांगळे, प्रा. संभाजी ओव्हाळ, प्रा डॉ बाळासाहेब धोंडे, प्रा किरण कटके, प्रा डॉ पंडीत औटे, प्रा डॉ नरसाळे, फिरोज शेख, प्रा सुभाष गांगर्डे, प्रा राजेंद्र डांगे, प्रा चौधरी, प्रा डॉ सुभाष नागरगोजे, प्रा भीमराज गावडे, प्रा. डॉ गोपीनाथ बोडखे, प्रा डॉ विजय पोकळे, वाघ के डी, रविंद्र माळशिखरे, धानोरा येथील प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांच्या सह जवळपास ७० ते ८० शिक्षकांनी तीन तास श्रमदान करून सराटेवडगावच्या पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभाग नोंदवला.

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) ४१४ २०२

☎ (०२४४१) २३९६२१

E-mail. : admkada@gmail.com Website : www.admkada.com

नॅक दर्जा -"A" | ISO 9001:2008 Certification | प्राचार्य : डॉ. एच्. जी. विधाते



जा.क्र. : आधोंमक / 2021-2022/568 दि. 12 / 4 /2022

प्रति,
मा.संचालक साहेब,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

विषय :— <u>विशेष शिबीर अहवाल स्विकारणे बाबत..</u>

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती करण्यात येते की, दिनांक १६ मार्च ते २२ मार्च २०२२ या सात दिवशीय विशेष शिबीराचा अहवाल या पत्रासोबत पाटवत आहोत.

तरी मे.साहेबांनी विशेष शिबीर अहवाल स्विकारुन सहकार्य करावे. ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

सोबत :

१. अहवाल
२. फोटो
३. पेपर कात्रण

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित,

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

ता. आष्टी, जि. बीड

## राष्ट्रिय सेवा योजना विभाग

### विशेष शिबीर अहवाल

### २०२१-२०२२

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६/०३/२२ ते दि. २२/०३/२२ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन महाविद्यालयाचे दत्तक गाव सराटे वडगाव येथे आयोजित करण्यात आले.

उद्‌घाटन:

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराची सराटे वडगाव येथे उत्साहात सुरुवात झाली. १६ मार्च २०२२ पासून सुरु होणाऱ्या या सात दिवसीय शिबिराचा आशय आरोग्य आणि साक्षरता असा आहे. शिबीराच्या उद्‌घघाटन समारंभाचे अध्यक्ष व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. विनोदजी गुड्डमवार (तहसिलदार, आष्टी), मा. विक्रमजी पोकळे (माजी गटशिक्षण अधिकारी) आणि मा. उत्तमरावजी बोडखे (उपसंपादक, दै. झुंजार नेता) हे उपस्थित होते. यांशिवाय व्यासपीठावर सरपंच मा. राम बोडखे, उपसरपंच मा. महादेवजी शिंदे, मा. राजारामजी नन्नवरे (चेअरमन, सेवा सोसायटी), मा. बबनजी सुंबरे (तंटामुक्ती अध्यक्ष), मा. सिद्धेश्वर शेंडगे (मुख्याध्यापक, जि. प. शाळा), मा. भाऊसाहेब तरटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गाडगे बाबा आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

मा. विनोदजी गुड्डमवार यांनी ग्रामविकासासाठी अशा शिबिरांची आवश्यकता आहे आणि विद्यार्थ्यांनी अशा शिबिरातून सर्वांगीण विकास करुन घेतला पाहिजे, असे सांगितले. मा. विक्रमजी पोकळे साहेबांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेत विविध कार्यक्रमांत सहभाग घेऊन विविध कलागुण अवगत करून घेणे खूप महत्त्वाचे आहे, असे नमुद केले. सरपंच मा. राम बोडखे यांनीही ग्रामविकासात विद्यार्थ्यांचा सहभाग खूप महत्वाचा असून या शिबिरात नक्कीच काहीतरी विशेष कार्य विद्यार्थ्यांकडून घडेल असा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षीय समारोपात व्यवस्थापन परिषद सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी राष्ट्रीय सेवा योजना हे एक प्रभावी व्यासपीठ असून त्यामुळे व्यासपीठासमोर बसलेले विद्यार्थी उद्या व्यासपीठावर मान्यवर म्हणून बसतील असे मत मांडले.

कार्यक्रम अधिकारी प्रो. बी. एम. चव्हाण यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप सविस्तर सांगितले. सूत्रसंचालन प्रा. ईश्वर नन्नवरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. शैलजा कुचेकर यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी, स्वयंसेवक, ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबीराचे उद्घाटन झाल्यानंतर दुपारच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक यांनी गटचर्चा केली. या गटचर्चेसाठी आय. सी. आय. सी. आय. फाउंडेशन तालुका प्रमुख मा. बेहराम सर उपस्थित होते. गावातील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. शिबीराच्या पुढील सहा दिवसांच्या नियोजनात इतर काही कामांसोबतच गावातील नागरिकांचे कौटुंबिक सर्वेक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले.

रात्रीच्या सत्रात ठिक ८.०० वाजता उद्बोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. डी. गायकवाड सर आणि डॉ. आर. जी. विधाते सर उपस्थित होते. डॉ. गायकवाड सरांनी ग्रामविकासात युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले तर डॉ. आर. जी. विधाते सरांनी सेंद्रिय शेती या विषयावर मार्गदर्शन केले.

गुरुवार दि.१७/०३/२२ रोजी सकाळी प्राणायाम आणि योगासने घेण्यात आली. त्यानंतर स्वयंसेवकांना नाष्टा देण्यात आला. ९.०० ते १.०० या वेळेत गावातील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात कुटुंबातील एकूण व्यक्ती, कुटुंब-प्रमुखाचा व्यवसाय, एकूण शेती, वहीत शेती, पडिक जमीन, जनावरांची एकूण संख्या, दुभत्या जनावरांची संख्या, शेतातील एकूण झाडांची संख्या, झाडाचे प्रकार, एकूण विहिरींची संख्या, एकूण बोअरची संख्या, शेतातून जाणाऱ्या नाल्यांची संख्या, मुख्य व इतर पिके, सांडपाण्याची व्यवस्था आहे कि नाही, शोषखड्डा आहे कि नाही, एकूण मासिक लाईटबील किती येते, एकूण चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या, घरगुती एल. पी. जी. गॅस, गोबर गॅस, कंपोष्ट खत इत्यादिची व्यवस्था आहे कि नाही, इ. माहिती संकलित करण्यात आली.

दुपारच्या सत्रात बोद्धिक चर्चा करण्यात आली. रात्री ८.०० च्या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आय. सी. आय. सी. आय. फाउंडेशनचे तालुका प्रमुख मा. बेहराम सर तसेच प्रा. बाबा पठाण हे उपस्थित होते. मा. बेहराम यांनी ग्रामविकासातील आय. सी. आय. सी. आय. फाउंडेशनचे योगदान या विषयावर तर प्रा. बाबा पठाण यांनी ग्रामविकासातील बचत गटाचे महत्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

दि. १८/०३/२२ रोजी सकाळच्या सत्रात जानपीर वस्ती, सुंबरे वस्ती आणि गुंड वस्तीवरील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. दुपारच्या सत्रात गटचर्चा घेण्यात आली. रात्रीच्या सत्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग हा कार्यक्रम घेण्यात आला. यात डॉ. एस. डी. ओव्हाळ आणि डॉ. बी. एन. गावडे यांनी प्रयोग सादर केले. डॉ. बी. एस. खैरे यांनी आरोग्य आणि साक्षरता या विषयावर मार्गदर्शन केले.

शनिवार दि. १९/०३/२२ रोजी सकाळी तरटे वस्ती, शेळके वस्ती आणि नन्नवरे वस्तीवरील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. दुपारच्या सत्रात राष्ट्रीय सेवा योजना शिबीरार्थींनी मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केला.

रात्रीच्या सत्रासाठी मा. कैलास पन्हाळकर आणि डॉ. दत्तात्रय नरसाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पानी फाउंडेशनचे तालुका प्रमुख मा. श्री. कैलास पन्हाळकर यांनी पानी फाउंडेशनचे ग्रामविकासातील कार्य चित्रफीत दाखवून स्पष्ट केले. यामध्ये समृद्ध किसान, आदर्श गाव हिवरेबाजार,

इ. ग्रामविकासाशी निगडित बाबींची माहिती देण्यात आली. डॉ. नरसाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे ग्रामविकासातील योगदान या विषयावर मार्गदर्शन केले.

रविवार दि. २०/०३/२२ रोजी सकाळी आनंदवाडी येथील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. गावातील एकूण २७५ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. दुपारच्या सत्रात शिबीरार्थींनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला.

रात्रीच्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून पानी फाऊंडेशनचे पाटोदा तालुका प्रमुख या. प्रविण काथवटे हे उपस्थित होते. त्यांनी आधुनिक शेती या विषयावर व्याख्यान दिले.

सोमवार दि. २१/०२/२२ रोजी सकाळी नदीकाठच्या दहाव्याचे ठिकाण येथे लावलेल्या एकूण १५० झाडांना आळे करुन पाणी देण्यात आले. एका झाडास तीन बकेट याप्रमाणे पाणी देण्यात आले. दुपारच्या सत्रात गावातील परिसर स्वच्छता करण्यात आली. रात्रीच्या सत्रात कवी प्रा. नागेश शेलार, कवी हरिश हातोटे, कवी युवराज वायभासे, कवी इंद्रकुमार झांजे यांच्या कवितांचे बहारदार कविसंमेलन संपन्न झाले.

समारोप:

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष शिबीराची सराटे वडगाव येथे नुकतीच सांगता करण्यात आली. १६ मार्च २०२२ पासून सुरु झालेल्या या सात दिवसीय शिबिराचा आशय आरोग्य आणि साक्षरता असा होता. शिबीराच्या समारोप समारंभाचे अध्यक्ष व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. चेतन पाटोळे (आय. सी. आय. सी. आय. फाऊंडेशन, जिल्हा प्रमुख), मा. गोरख तरटे (तालुका कृषी अधिकारी, आष्टी), मा. दिपक पाटील (आय. सी. आय. सी. आय. फाऊंडेशन, मराठवाडा प्रमुख) आणि मा. श्री. कैलास पन्हाळकर (पानी फाऊंडेशन, तालुका समन्वयक) हे उपस्थित होते. यांशिवाय व्यासपीठावर सरपंच मा. डॉ. राम बोडखे, मा. सिद्धेश्वर शेंडगे (मुख्याध्यापक, जि. प. शाळा, सराटे वडगाव) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गाडगे बाबा आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली.

मा. चेतन पाटोळे यांनी विषेश शिबिरातून आलेल्या अनुभवांमुळेच मुलांचे विचार समृद्ध होतात, असे मत मांडले. मा. गोरख तरटे यांनी शिबीरार्थींनी कौटुंबिक सर्वेक्षण करताना शेती आणि पूरक व्यवसायांचीही माहिती मिळवली, त्यामुळे त्यांना कृषी क्षेत्रातील अडचणींची माहिती मिळाली, असे नमूद केले. मा. श्री. कैलास पन्हाळकर यांनी सरपंचांनी गावात ग्रामस्थांच्या मदतीने जे काम पानी फाऊंडेशन अंतर्गत केले आहे ते वाखाणण्याजोगे आहे आणि अशी कामं यापुढेही अपेक्षित आहेत, असे मत व्यक्त केले. तर मा. दिपक पाटील यांनी सरपंच डॉ. राम बोडखे सरांनी ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांकडून मोठे मनुष्यबळ जमवले आहे, त्यामुळे त्यांचे गाव देशपातळीवर चमकेल असा विश्वास व्यक्त केला. सरपंच मा. राम बोडखे यांनीही ग्रामविकासात विद्यार्थ्यांचा सहभाग खूप महत्वाचा असून या शिबिरात स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग होता, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात व्यवस्थापन परिषद सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते यांनी

राष्ट्रीय सेवा योजना हे एक प्रभावी व्यासपीठ असून त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक तसेच सामाजिक प्रगल्भता येते, असे मत मांडले.

कार्यक्रम अधिकारी प्रा. ईश्वर नन्नवरे यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीराचा सात दिवसांत केलेल्या कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलजा कुचेकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रो. बी. एम. चव्हाण यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच स्वयंसेवक-स्वयंसेविका उपस्थित होते.

Programma Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा
## 'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'







Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा.
'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'







Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा.
'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'







Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा.

'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'







Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा

'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'







Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा.



राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष शिबीर 2021-22
स्थळ - सराटे वडगाव/आनंदवाडी
समारोप समारंभ'. 22 मार्च 2022




Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

ो पाण्याची....
रङ्या रंगाची....
सर्वांना
दनाच्या
भेच्छा..!
- संपादक

# झुंजार नेता

१३३ वा | बीड, महाराष्ट्र | शुक्रवार दि.१८ मार्च २०२२ | R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/117/RNP/ Beed/ 2021-23 | पाने ८

# मानसिक मनोबल वाढविण्यासाठी रा.से.यो. शिबीराची गरज- तहसिलदार गुंड्डमवार

आष्टी दि.१७ (प्रतिनिधी) - समाजात कोणताच माणुस समाधानी नाही. जीवनात किमान आपले समाधान झाल्यानंतर तरी ईतरांचा विचार करावा. अडचणींवर मात करुन मार्गक्रमण करणारा खरा योध्दा असतो. कुठल्याही कामाची सुरवात ही आपण कोणत्या भावनेतुन करतो याला फार महत्व असते. रोपट्याचा वृक्ष होतच असतो. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे व स्पर्धेचे आहे. या स्पर्धेच्या युगात गुणवत्ता हवी. त्यासाठी अभ्यास करावा. रासेयोचे शिबीर हे शिक्षणाचाच एक भाग आहे. मनसिकता व मानसिक मनोबल वाढविण्यासाठी रा.से.यो. शिबीराची गरज असते असे प्रतिपादन आष्टीचे तहसिलदार विनोद गुंड्डमवार यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय समभाव, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन आणि नेतृत्व गुण विकसीत होण्यासाठी व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी रासेयोचे शिबीराची गरज असते असे प्रतिपादन माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांनी केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आरोग्य आणि साक्षरता विशेष शिबीर उद्घाटन प्रसंगी ते उद्घाटक म्हणुन बोलत होते. हे शिबीर दि. १६ ते २२ मार्च २०२२या कालावधीत आदर्शगाव सराटेवडगांव आनंदवाडी येथे होत आहे. आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे 'आरोग्य आणि साक्षरता' विशेष शिबीर आदर्शगाव सराटेवडगांव, आनंदवाडी येथे संपन्न होत आहे. बुधवार दि.१६ मार्च २०२२ रोजी सकाळी १० वा. तहसिलदार विनोद गुंड्डमवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी अध्यक्षस्थानी औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डा.हरिदास विधाते हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, चेअरमन राजाराम नन्नवरे, पत्रकार उत्तम बोडखे, सरपंच प्रा.डा.राम बोडखे, उपसरपंच महादेव शिंदे, मुख्याध्यापक सिध्देश्वर शेंडगे, सेवानिवृत पीएसआय अन्सारभाई शेख, इंजि.पी. बी.बोडखे, भाऊसाहेब तरटे, बबनराव सुंबरे पाटील, तलाठी पांचगे, शेख नबी आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी विक्रम पोकळे बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दिवसातुन एकतरी सदकृत्य करावे. आपल्या घरच्या परिस्थितीची जाणीव ठेवुन अभ्यास करावा. स्पर्धा परीक्षेची तयारी करुन मोठ्या पदावर जावे. आईवडीलांचे स्वप्न साकार करावे. आपल्या स्काऊट गाईड चळवळीतील अनुभव सांगुन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणेबाबत मार्गदर्शन केले. प्रारंभी प्रस्ताविक प्रा.डा.भास्कर चव्हाण यांनी केले. सरपंच प्रा.डा.राम बोडखे यावेळी म्हणाले की, ग्रामस्थांनी लोकवाटा दोन लाख रुपये दिल्याने नदी खोलीकरण मोठ्या प्रमाणात केले आहे. यावेळी



तहसिलदार विनोद गुंड्डमवार, प्राचार्य डा.हरिदास विधाते, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी संचलन प्रा.ईश्वर नन्नवरे यांनी तर आभार प्रा.डा.शैलजा कुलेकर यांनी मानले. या शिबीरातशस्वयं स्वच्छता, प्रार्थना, योगासने, अल्पोपहार, श्रमदान, ग्रामस्वच्छता, हागणदारी मुक्त ग्रामजलसाक्षरता, पर्यावरण संरक्षण जागृती, एड्स जनजागृती, व्यसनमुक्ती, वृक्षारोपन अंधश्रध्दा निर्मूलन, स्वच्छता, स्नान, भोजन व विश्रांती, रात्री व्याख्यान/प्रबोधन, प्रकल्प/गटचर्चा, सक्षम युवकआदि कार्यक्रम होणार आहेत. या शिबीरात प्रा.डॉ.सज्जन गायकवाड यांचे ग्राम विकासात युवकांची भूमिका, चेतन पाटोळे क(आय.सी.आय.सी.आय. फाऊंडेशनचे ग्रामविकासातील कार्य), पठाण जैबुन उस्मान यांचे बचतगटाविषयी मार्गदर्शन, डॉ.संभाजी ओव्हाळ आणि डॉ.बी.एन.गावडे यांचे 'अंधश्रद्धा निर्मूलन प्रयोग, डा.बी.एस.खैरे यांचे आरोग्य व साक्षरता, आष्टीचे सहाय्यक गटविकास अधिकारी प्रभाकर आनंत्रे यांचे ग्रामविकासासाठी शासकीय योजना, पाणी फाऊंडेशन तालुका समन्वयक कैलास पन्हाळकर यांचे पाणी फाऊंडेशनचे ग्रामविकासातील कार्य, रविवारी कवि संमेलनहोणारा आहे. यामध्ये प्रा.नागेश शेलार, कवि हरिश हातवटे, कवि युवराज वायभासे, कवि इंद्रकुमार झांजे यांचा सहभाग राहील. कृषीभुषण बबासाहेब पिसोरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे आधुनिक शेती विषयी मार्गदर्शन होणार आहे. मंगळवार दि.२२ मार्च रोजी शिबीराचा समारोप होणार आहे. समारोप सोहाळ्याचे अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन आय.सी.आय सी.आय फाऊंडेशनचे मराठवाडा प्रमुख दिपक पाटील. आष्टीचे गटविकास अधिकारी सुधाकर मुंडे, उपअभियंता प्रकाश गोरे, जिल्हा समन्वयक, रासेयो अधिकारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे डा.पंडीत खाकरे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य डॉ.एच. जी.विधाते, सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच सौ.अयोध्या महादेव शिंदे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बी. एम. चव्हाण, प्रा.डॉ.श्रीमती शैलजा कुलेकर, कार्यक्रमाधिकारी प्रा.ईश्वर नन्नवरे बाळकृष्ण तरटे, नबीबशेख, सौ.छाया गजघाट, सौ.कमलाबाई गुंड, सौ.रूपाली भिसे, [illegible] बोडखे, कृष्णा बोडखे, सौ.संगिता बोडखे यांनी केले आहे.

Programme Officer
N.S.S. Unit A. D. Mahavidyal[illegible]
Kada Tal. Ashti. Dist. Bee[illegible]

पार्श्वभूमी

गंमत भंडारी

दिनांक २२ मार्च २०२२ मंगळवार ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/202

# राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सराटे वडगाव येथे ई-के.वाय.सी. कॅम्पचे आयोजन

कडा (प्रतिनिधी):- आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे आयोजित विशेष शिबिर २०२१-२०२२ सराटे वडगाव येथील नागरिकांचे आधार कार्ड ई-के.वाय.सी. करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली व त्यानंतर आधार कार्ड ई-के.वाय.सी. करण्यासाठी कॅम्प घेण्यात आला यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी आवश्यक आहे, ई-श्रम कार्ड, पॅन कार्ड, ड्राइंग लायसन, पासपोर्ट मिळविण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी, आपल्या आधार कार्डचा दुरुपयोग टाळण्यासाठी, भविष्य निर्वाह निधीचा लाभ मिळविण्यासाठी, शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळविण्यासाठी, वन नेशन वन रेशन कार्ड योजनेच्या लाभासाठी, तसेच इन्कम टॅक्स रिटर्न चे ई-फायलिंग करण्यासाठी ई-के.वाय.सी. अत्यंत अत्यावश्यक आहे यासंबंधीची जनजागृती गावांमध्ये एन. एस. एस. शिबिरार्थी यांनी केली. पान २ वर..

पान ६ वरून

## राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे

या शिबिरामध्ये एकूण १७९ नागरिकांचे आधार कार्ड ई-के.वाय.सी. करण्यात आले याप्रसंगी सराटे वडगाव चे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे हे उपस्थित होते त्याचबरोबर सर्व एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी व एन. एस. एस. शिबिरार्थी, ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

झुंजार नेता
महाराष्ट्र बुधवार दि.२३ मार्च २०२२ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/117/RNP/ Be

# ग. से. यो. माध्यमातून सराटेवडगांव येथे विविध कामे संपन्न

## ११ लाख रुपयांच्या आयसीआय फाऊंडेशनचे काम सुरु

कडा दि.२२ (वार्ताहर):- १६ ते २२ मार्च या कालावधीत सराटेवडगांव येथे झालेल्या राष्टीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून कुटुंब सर्वेक्षण,झाडांना आळे करुन पाणी देणे अशी विकास कामे करण्यात आली तसेच आय सी आय सी आय फाऊंडेशनचे ११ लाख रुपयांच्या नदी खोलीकरण व रुंदीकरणाचे काम जलदिनाच्या निमित्ताने सुरु झाले.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्टीय सेवा योजना शिबिराच्या समारोप मंगळवारी दिनांक २२ मार्च रोजी झाला. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर आय. सी. आय. सी. आयचे मराठवाडा विभागाचे प्रमुख दीपक पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, आय. सी. आय. सी. आयचे जिल्हा प्रमुख चेतन पाटोळे, पाणी फाऊंडेशनचे तालुका समन्मयक कैलास पन्हाळकर, सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, मुख्याध्यापक सिध्देश्वर शेंडगे, राजाराम ननवरे, कोकणे व इतर उपस्थित होते. जागतिक जलदिनाच्या निमित्ताने आय. सी. आय. सी. आय फाऊंडेशनच्या वतीने लोक सहभाग मिळून ११ लाख रुपयांच्या नदी खोलीकरण व रुंदीकरणाचा प्रारंभ विभागाचे प्रमुख दीपक पाटील, चेतन पाटोळे व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्या हस्ते झाला. भविष्यात लोकसहभागातून विकास कामे करायाची आहेत त्यामुळे लोकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे तसेच पाण्याचा योग्यरितीने वापर करण्याचे आवाहन दिपक पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, राष्टीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होण्यास चालना मिळते. सराटेवडगांव व आनंदवाडी या ठिकाणी शिबिराच्या माध्यमातून भरपुर विकास कामे केली आहेत. सराटेवडगांव आनंदवाडी हे गांव महाविद्यालयाने दत्तक घेतले आहे. जलसंधारणाचे उत्कृष्ट काम या गावात झाले आहे. यावेळी चेतन पाटोळे, कैलास पन्हाळकर व इतरांची भाषणे झाली. तसेच शिबिरार्थींनी आपले अनुभव कथन केले. प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. ईश्वर ननवरे यांनी राष्टीय सेवा योजना शिबिर कालावधीत शिबिरार्थींनी सराटे वडगांवात केलेल्या विविध कामाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शैलजा कुबेकर यांनी मानले. उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada Tal. Ashti. Dist. Beed

रिपोर्ट दिलेली तारीख
Apr 18, 2021

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

पानी फ़ाउंडेशन

सत्यमेव जयते समृद्ध गाव स्पर्धा







# तुमच्या गावाचा 'एक्स-रे' रिपोर्ट २

## विषय: विहीर व बोअरवेल गणना

**तालुका -** आष्टी **गाव -** आनंदवाडी

महत्वाची सूचना:
पानी फाउंडेशनला गावाने दिलेल्या डेटाच्या (माहितीच्या) आधारावर या रिपोर्टमध्ये विश्लेषण करण्यात आले आहे. जर आपण दिलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी किंवा अपूर्णता असतील, तर विश्लेषणातही त्रुटी दिसून येतील! याची सर्वांनी नोंद घ्यावी!

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)




सरकार दर 10 वर्षांनी जनगणना करते. पण मित्रांनो आपली शेती ज्या पाण्यावर अवलंबून आहे हे पाणी आपल्याला देणाऱ्या विहिरी, बोअरवेल गावात किती आहेत? स्वतः गावातील जलमित्रांनी त्यांची गणना केली आहे. अनेक गावांमध्ये शेकडो विहीरी व शेकडो बोअरवेल आहेत. ही माहिती गोळा करणे हे सोपे काम नाही. कदाचित असे काम पहिल्यांदाच होत आहे.

तुमचे हे काम ऐतिहासिक आहे !! तुम्हा सर्वांचे अभिनंदन !!!

या गणनेमुळे मी पहिल्यांदाच तुमच्यासोबत संवाद साधू शकत आहे.

मला खात्री आहे की मी जे सांगणार आहे ते तुम्ही काळजीपूर्वक ऐकाल, कारण तुम्हा सर्वांनाच तुमचे गाव समृद्ध बनवायचे आहे.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)




**जमिनीखाली माझ्या घरात अनेक मजले आहेत.**

**तुम्ही ज्या शेतात मेहनत करता, त्या शेताखाली सर्वात वरचा मजला आहे.**

**पावसाचे पाणी सर्वप्रथम या वरच्या मजल्यात शिरते.**
**या मजल्याला खुली भूजलटाकी असे म्हणतात. या मजल्यावर तुम्ही मला विहीरीच्या माध्यमातून नेहमी भेटताच!**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)




**वरच्या मजल्याच्या खाली अनेक मजले आहेत.**

**त्यांना बंदिस्त भूजलटाकी असे म्हणतात.**

**मी इथेदेखील राहते.**

**मात्र इथे मला भेटायचे असेल, तर तुम्हाला काळ्या पाषाणाच्या आरपार जाणारे बोअरवेल लागेल.**

Taluka: आष्टी (1)
village_id: आनंदवाडी... (1)

तुम्हाला माहित आहे का, आज तुमच्या गावात

59 विहीरी व 80 बोअरवेल आहेत?

लक्षात ठेवा, प्रत्येक विहीर आणि बोअरवेल बँकेच्या ATM सारखे आहेत. जसे ATM मधून तुम्ही पैसे काढू शकता, त्याचप्रमाणे विहीरी आणि बोअरवेलमधून तुम्ही पाणी काढू शकता.

मात्र, दोन्हीमध्ये एक मोठा फरक आहे. या पाण्याच्या ATM च्या बाबतीत आपण अंधारात आहोत. तुमच्या ATM मधले पाणी अचानक संपू शकते!




कल्पना करा, तुमच्या शेतात उभ्या पिकाला पाण्याची गरज आहे, आणि ATM मधलं पाणीच संपलं... असं होतं ना?

हा एक्सरे रिपोर्ट म्हणजे तुमच्या गावात असं कधीच होऊ नये म्हणून घ्यायची पहिली पायरी आहे.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

आपल्या गावामध्ये पहिली विहीर **1664** साली खणली गेली.

त्यानंतर गावातील विहीरींची संख्या कशी वाढत गेली ते बघा!




**1664** पासून आजपर्यंत आपल्या गावात **59** विहिरी खोदल्या गेल्या आहेत

विहीरींची संख्या जेवढी जास्त, तेवढं खरं तर जास्त शेतक-यांना माझं पाणी मिळू शकते. आणि ते गरजेचंही आहे. मलादेखील हे पाहिजे आहे.

पण यात एक अडचण आहे. त्याबद्दल मी नंतर सांगेन...

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)




- तुमच्या गावाने केलेल्या जलसंधारणाच्या कामामुळेच आता पावसाचे जास्त पाणी खुल्या भूजल टाकीत शिरते.

- पूर्वी पावसाच्या पाण्याने खुली भूजल टाकी पूर्ण भरायची नाही. आता जलसंधारणाच्या कामामुळे ती जास्त तर भरतेच, शिवाय तिचे पाणी जास्त वेळ टिकते.

## मग अडचण काय आहे ?

- खुल्या भूजल टाकीची साठवण क्षमता मर्यादित आहे ही खरी अडचण आहे. खुली भूजल टाकी किती पाणी साठवू शकते हे ठरलेले आहे. ते बदलत नाही.

- खुल्या भूजलटाकीतले पाणी मिळवण्यासाठी जास्त विहीरी खणल्या तर तिच्यातले पाणी वाढत नाही. उलट विहीरी जशा वाढत जातील, तसा प्रति शेतकरी पाण्याचा वाटा कमी होत जाईल. खुली भूजल टाकी वेगाने रिकामी होत जाईल.

- तुमचे लहानपण आठवा. तेव्हा कोणत्या महिन्यात विहीरी आटायच्या? आता कोणत्या महिन्यात आटतात? लक्षात येतंय ना?

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

## आणि विहीरी जशा आटू लागतात, तसे शेतकरी काय करतात ?
## ते विहीरींची खोली वाढवतात.

तुमच्या गावातील एकूण 59 पैकी 10 विहिरींचे खोलीकरण केलं गेलं.

म्हणजेच 16.95 %

खोलीकरण केलेल्या विहीरींची खोली सरासरी 8.2 फुटाने वाढली.

**जर सर्व जण विहीर खोलीकरण करू लागले तर प्रति शेतकरी पाण्याचा वाटा वाढणार नाही कारण खोलीकरण केल्यामुळे खुल्या भूजल टाकीची साठवण क्षमता वाढत नाही.**

टीप: जर तुमच्या गावात 10% पेक्षा कमी विहीरींचे खोलीकरण झाले असेल, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.

आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# कल्पना करा की खुली भूजलटाकी एका कोल्ड्रिंकच्या बाटलीसारखी आहे.



या बाटलीतील स्ट्रॉची संख्या वाढली तरी बाटलीतील कोल्ड्रिंक वाढत नाही.

तसेच सर्वांनी लांब स्ट्रॉ वापरल्या तरी बाटलीतील कोल्ड्रिंक वाढत नाही.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# उलट बाटलीमधले कोल्ड्रिंक लवकर संपेल. विहीरी लवकर कोरड्या पडतील.



## 2019-20 मध्ये तुमच्या विहीरी कशा कोरड्या पडत गेल्या बघा...




आपल्या गावातील **59** विहरींपैकी **35** विहीरी २०१९-२० मध्ये कोरड्या झाल्या होत्या म्हणजेच **59.32** %

**आता तुम्हीच ठरवा की तुमचे गाव निरोगी आहे की आजारी...**

**गावाची वाटचाल निरोगी बनण्याकडे चालू आहे का आजारी बनण्याकडे ?**

टीप: जर 2019-20 मध्ये तुमच्या गावातील 20% पेक्षा कमी विहीरी कोरड्या पडल्या असतील, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.

आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# आणि विहीरीतले पाणी कमी पडू लागल्यावर, आपण काय करतो ?

## विहीरींना आडवे बोअर मारतो !

आपण शेजा-याच्या विहीरीतले पाणी वरून घेऊ शकत नाही. पण आडवे बोअर मारून जमिनीखालचं पाणी घ्यायला आपल्याला कोण अडवणार !

तुमच्या गावातील एकूण विहीरी: 59

त्यापैकी आडवे बोअर मारलेल्या विहीरी: 10 म्हणजे 16.95 %

गावातील एकूण आडव्या बोअरची संख्या: 19

म्हणजेच ज्या विहिरींना आडवे बोर मारले गेले,

त्या प्रत्येक विहिरीला सरासरी 1.9 आडवे बोर आहेत

टीप: जर तुमच्या गावातील 10% पेक्षा कमी विहीरींना आडवे बोअर मारले असतील, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.

आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# अशी वेळ आली आहे की निर्जीव विहिरी आपण बोअरवेलचं पाणी साठवण्यासाठी वापरतोय !




आपल्या गावात बोअरवेल किंवा इतर बाहेरच्या पाण्याने भरल्या जाणा-या विहीरींची संख्या : 33

म्हणजेच 55.93 %

**टीप: जर तुमच्या गावातील 5% पेक्षा कमी विहीरींमध्ये बाहेरचे पाणी टाकले जात असेल, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.**

**आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# ?? आपल्या समोरची दुविधा ??

**एका बाजूला खुल्या भूजलटाकीची साठवण क्षमता मर्यादित आहे.**

**दुस-या बाजूला हे पाणी मला जास्तीत जास्त शेतक-यांना द्यायचे आहे.**

**या दुविधेतून मार्ग कसा शोधावा?**

**हिवरे बाजार ने याचे उत्तर शोधले आहे, ते म्हणजे पाणी नियोजन.**

## खरं तर पाणी नियोजन म्हणजेच गावातील माणसांचे नियोजन !



Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

## गावक-यांनी पाण्याचे नियोजन न केल्यामुळे खुल्या भूजल टाकीतले पाणी पुरे पडत नाही. मग शेतकरी बंदिस्त भूजल टाकीतले पाणी मिळवण्यासाठी बोअरवेल खणू लागतात...




| | |
|---|---|
| **1985** या साली आपल्या गावामध्ये पहिले बोरवेल खोदले गेले. | या पहिल्या बोरवेलची खोली **250** फूट होती! |

टीप : भारतात बोअरवेलचे तंत्रज्ञान 1970 साली आले. जर तुमच्या गावात त्यापूर्वी बोअरवेल असेल, तर कृपया आपला डेटा तपासून बघा.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# गेल्या काही वर्षांत गावातील बोअरवेलची संख्या वाढू लागली.




आपल्या गावामध्ये पहिले बोरवेल 1985 साली खोदले गेले.

आज गावात 80 बोरवेल आहेत.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# जेव्हा एका बंदिस्त भूजल टाकीतले पाणी संपते, बोअरवेल अधिक खोलवरच्या पुढच्या बंदिस्त भूजल टाकीत जातात

## पाण्यासाठी आपण किती खोल जायला लागलो ते बघा

आजपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, समृद्ध गाव स्पर्धेतील सहभागी गावांमधील सर्वात खोल बोरवेलची खोली **2,000** फूट आहे.

## तुमचे गाव कोणत्या दिशेने चालले आहे ते बघा :




आज आपल्या गावामध्ये सर्वात खोल बोरवेलची खोली **450** फूट आहे!

गावात जेव्हा पहिलं बोअरवेल खोदलं होतं, तेव्हा त्याची खोली **250** फूट होती.

**आता तुम्हीच ठरवा की तुमचे गाव निरोगी आहे की आजारी...**

**गावाची वाटचाल निरोगी बनण्याकडे चालू आहे का आजारी बनण्याकडे ?**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

**शोकांतिका अशी आहे की पाण्यासाठीच्या या शर्यतीत ड्रिलिंगच्या वेळीच बोअरवेल फेल जातात.**

**त्यांच्यापासून आपल्याला एक थेंबही पाणी मिळत नाही.**

**आपल्या गावात पाणी न लागल्यामुळे खणलेल्या दिवशीच फेल गेलेल्या बोअरवेलची संख्या** 3

**म्हणजेच** 3.75 %

**टीप: जर तुमच्या गावातील 5% पेक्षा कमी बोअरवेल ड्रिलिंगच्या वेळीच फेल गेल्या असतील, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.**

**आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# काही बोअरवेल थोडे वर्ष पाणी देतात आणि मग बंद पडतात.

**आपल्या गावातील एकूण 11 बोअरवेल आज बंद पडलेले आहेत, म्हणजेच 13.75 %**




**टीप : जर तुमच्या गावात 5% पेक्षाही कमी बोअरवेल आज बंद असतील, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.**

**आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# कार्यरत असणा-या सर्व बोअरवेल पुरेसे पाणी देतीलच असे नाही.

## भर हंगामात त्या अचानक आटतात आणि उभी पिके जळतात...

आपल्या गावामध्ये सध्या **69** कार्यरत बोरवेल्स आहेत,

या कार्यरत बोरवेल्स पैकी **17** बोरवेल्स २०१९-२० मध्ये पाणी आटल्यामुळे

बंद पडल्या होत्या, म्हणजेच **24.64** %




**टीप: 2019-20 मध्ये जर तुमच्या गावातील 10% पेक्षा कमी बोअरवेल्सचा पाणी आटल्यामुळे उपसा बंद झाला असेल, तर कृपया तुम्ही याविषयी संपूर्ण आणि अचूक माहिती गोळा केली आहे ना याची खात्री करून घ्या.**

**आणि तशी खात्री असेल, तर तुमचे अभिनंदन!**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)

# आपल्या गावची विहीर व बोअरवेल गणना आपल्याला काय सांगते?

## सारांश

आपल्याला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा, म्हणजेच 1947 साली गावात 2 विहीरी व 0 बोअरवेल अशा 2 ठिकाणांवरूण भूजलाचा उपसा व्हायचा.

आज आपल्या गावात 59 विहीरी व 69 बोअरवेल अशा 128 ठिकाणांवरून भूजलाचा उपसा होतो.

उपसा होणारी ठिकाणे 126 ने वाढली.

**पण भूजल टाकीची साठवण क्षमता वाढली का?**

1947 साली गावात पाणी उपसणारे एकूण 1 पंप होते. त्यांची एकूण शक्ती होती 5 HP

आज गावात पाणी उपसणारे एकूण 122 पंप असून त्यांची एकूण शक्ती आहे 521.5 HP

म्हणजेच गावातले पंप 121 ने वाढले. उपसण्याची शक्ती 516.5 HP नी वाढली.

**पण भूजल टाकीची साठवण क्षमता वाढली का?**

याच दिशेने आपण जात राहिलो, तर आणखी 10 वर्षांनी काय परिस्थिती असेल?

या गाडीत आपण बसलो, तर शेवटचे स्टेशन कोणते येईल ?

विचार करा.

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)



**माझं बोलून झालं...**

**आता चिंतन करण्याची वेळ आहे...**

**मी लहान-मोठ्या, गरीब-श्रीमंत अशा सर्व गावक-यांना लागणारे भूजल...**

**तुमच्या विहीरी व बोअरवेलना पाणी माझ्या सामाईक स्त्रोतांमधूनच येते.**

**तुमचे सातबारा उतारे तुमच्या जमिनीचे विभाजन करत असतील, पण जमिनीखाली पाण्याचे विभाजन करणारा कोणताही सातबारा नाही.**

**पण दुर्दैवाने, तुम्ही सगळेच तुमच्या शक्तीनुसार भूगर्भातून पाणी उपसता. कुणी कमी तर कुणी जास्त. प्रत्येकजण आपापल्या मर्जीनुसार पिकांची लागवड करत आहे. ATM मध्ये किती पाणी आहे याचा विचार न करता, ज्याला जेवढं शक्य तेवढं पाणी प्रत्येकजण उपसतच आहे.**

**कसलंही व्यवस्थापन नाही, कोणतंही पीक नियोजन नाही.**

**लवकरच तुम्ही खुली भूजल टाकी रिकामी करत आहात आणि त्यानंतर बंदिस्त भूजल टाकी सुद्धा. मग आपले पाणी संपून जाते, दुष्काळ येतो. आणि आपण निसर्गाला दोष देतो.**

Taluka: आष्टी (1)

village_id: आनंदवाडी... (1)



अशक्य वाटणारे चमत्कार घडवून आणायची तुमच्या गावात क्षमता आहे.

वॉटर कप दरम्यान तुम्ही एकत्र येऊन जलसंधारणाच्या कामासाठी प्रचंड मेहनत घेतलीत. त्यामुळे पावसाचे जास्त पाणी खुल्या भूजलटाकीत शिरले व तुमच्या विहीरींची पातळी वाढली.

तुम्ही जलसंधारणाचे हे काम समृद्ध गाव स्पर्धेतही सुरू ठेवाल याची मला खात्री आहे.

पण तुम्हाला जर दुष्काळाला हद्दपार करायचं असेल तर
एक गाव म्हणून तुम्ही तुमच्या पाण्याचं नियोजन करणं सुद्धा अत्यंत आवश्यक आहे.

त्यासाठी विहीरींच्या पाणी पातळ्यांचे मोजमाप सातत्याने करत रहायला हवे. विहीरींच्या पाणी पातळीच्या आधारे कोणती पिके घ्यायची आणि कोणती घ्यायची नाहीत याचा निर्णय घ्यायला हवा.

तुम्ही या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. या रस्त्यावर चालत रहा. मला माहिती आहे की तुमचे गाव समृद्ध करण्याचे तुम्हा सर्वांचेच स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करणे तुमच्या हातात आहे.

**तुम्हा सर्वांना माझे पाणीदार आशीर्वाद !**

तालुका: आष्टी (1)

गाव: आनंदवाडी (1)

# तुमच्या गावाचा 'एक्स-रे' रिपोर्ट - २०२२

## पावसापूर्वी तुमच्या विहिरी तुम्हाला काय सांगत आहेत?















**तालुका**
आष्टी

**गाव**
आनंदवाडी

**महत्वाची सूचना:**
पानी फाउंडेशनला गावाने दिलेल्या डेटाच्या (माहितीच्या) आधारावर या रिपोर्टमध्ये विश्लेषण करण्यात आले आहे. जर आपण दिलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी किंवा अपूर्णता असतील, तर विश्लेषणातही त्रुटी दिसून येतील! याची सर्वांनी नोंद घ्यावी!

# सॅटेलाईट द्वारा अवकाशातून दिसणारे आपले गाव व निवडलेल्या विहीरी !




**गटशेतीतून समृद्धीकडे जाण्यासाठी जलव्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे.**

**जलव्यवस्थापनासाठी विहिरींची पाणी पातळी मोजणे हा महत्त्वाचा भाग आहे.**

**पावसापूर्वी, पाऊस पडल्यानंतर, आणि रब्बी पिकानंतर विहिरींच्या पाण्याची पातळी मोजल्याशिवाय कोणत्याही गटशेतीची प्रगती होऊ शकत नाही.**

**या मोजमापांमुळे आपल्याला कोणती पिके घ्यावीत, कोणती पिके टाळावीत, जल बचतीच्या साधनांचा वापर का वाढवावा, हे कळू शकते.**

# मोजमापासाठी निवडलेल्या विहिरींची यादी

| विहिरीचा कोड ▲ | खातेदाराचे नाव | सर्वे नंबर | पाणलोट क्षेत्र | किती वेळा मोजमाप केले ? |
|---|---|---|---|---|
| 1 | Rajesh Vitthal Bodkhe | 93 | खालच्या | 5 |
| 2 | महादेव मारुती बोडखे | 100 | खालच्या | 5 |
| 3 | गुणानाथ केरु बोडखे | 98 | खालच्या | 5 |
| 4 | झुंबर भाऊ बोडखे | 93 | मधल्या | 5 |
| 5 | योगेश ज्ञानदेव बोडखे | 64 | मधल्या | 5 |
| 6 | रमेश बाजीराव बोडखे | 59 | वरच्या | 5 |
| 7 | सार्वजनिक पाणी पुरवठा विहिर | 69 | मधल्या | 5 |
| 8 | सतीष रंगणाथ बोडखे | 74 | वरच्या | 5 |
| 9 | जयदीप रावसाहेब बोडखे | 75 | वरच्या | 5 |
| 10 | मारुती विश्वनाथ बोडखे | 80 | वरच्या | 5 |
| 11 | गोरख आशोक बोडखे | 86 | खालच्या | 5 |
| 12 | अन्सर जाफरभाई शेख | 66 | मधल्या | 5 |

**गावातील सर्व विहिरींचे मोजमाप करणे आवश्यक नाही. आपण फक्त प्रातिनिधिक विहिरींचे मोजमाप करतो.**

**या विहिरी गावातील इतर विहिरींची स्थिती योग्यरित्या दर्शवतात का ते तपासा.**



# 2022 पावसाळ्यापूर्वी विहिरींच्या पाण्याच्या पातळीची स्थिती काय होती?




गावातील निवडलेल्या सर्व विहीरी




पिण्याच्या पाण्याच्या विहीरी

पावसापूर्वी विहिरीच्या काठापासून पाण्याची पातळी सरासरी 9.13 मीटर खोलीवर होती.

पावसापूर्वी पिण्याच्या पाण्याच्या विहिरीच्या काठापासून पाण्याची पातळी सरासरी 10.63 मीटर खोलीवर होती.

**प्रत्येक विहिरीच्या पाण्याच्या पातळीचा अभ्यास करा. या पाण्याच्या पातळ्या तुम्हाला काय सांगतात?**

**काही विहिरी कोरड्या पडल्या आहेत का? याचे कारण काय असू शकते?**

**पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची काय स्थिती आहे? त्यावर बारकाईने लक्ष ठेवा. त्या कोरड्या पडल्यास पुन्हा टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागेल...**

# पावसाळ्यापूर्वी विहीरींची पातळी किती खोल गेली होती?
# 2021 विरूद्ध 2022

| विहिरीचा कोड ▲ | 2021 पावसाळ्यापूर्वी विहिरीची पाणी पातळी किती मीटर खोल गेली | 2022 पावसाळ्यापूर्वी विहिरीची पाणी पातळी किती मीटर खोल गेली |
|---|---|---|
| 1 | 9.75 | 8.78 |
| 2 | 10.1 | 9.62 |
| 3 | 10.55 | 7.8 |
| 4 | 9.24 | 7.25 |
| 5 | 5.9 | 5.5 |
| 6 | 7 | 11.65 |
| 7 | 7.65 | 11.65 |
| 8 | 9.2 | 9.6 |
| 9 | 14.72 | 14.4 |
| 10 | 5.1 | 5.9 |
| 11 | 12.32 | 9.6 |
| 12 | 7.1 | 7.75 |

**२०२१ पावसाळ्यापूर्वी व २०२२ पावसाळ्यापूर्वी विहिरींच्या पाणी पातळीचे मोजमाप केल्याबद्दल आपल्या गावाचे अभिनंदन !**

**यामुळेच आपल्याला या दोन्ही पातळींमधीलची तुलना करणे शक्य आहे.**

**2021 च्या तुलनेत 2022 मध्ये विहिरींची पाणी पातळी जास्त खोल गेली असेल तर ते चांगले लक्षण नाही.**

**याला कारण काय? आपला पाण्याचा वापर वाढला आहे का ?**



**ही दिशा बदलण्यासाठी काय केले पाहिजे असे वाटते ?**

# 2021 च्या सर्वोच्च पाणी पातळीपासून 2022 उन्हाळ्याअखेर पाणी पातळीत किती घट झाली?

| विहिरीचा कोड ▲ | 2021 मध्ये सर्वोच्च पाणी पातळी (मी.) | 2022 उन्हाळ्याअखेर पाणी पातळी (मी.) | किती घट झाली? (मी.) |
|---|---|---|---|
| 1 | 6.1 | 8.78 | 2.68 |
| 2 | 5.6 | 9.62 | 4.02 |
| 3 | 4.82 | 7.8 | 2.98 |
| 4 | 3.55 | 7.25 | 3.7 |
| 5 | 1.35 | 5.5 | 4.15 |
| 6 | 3.25 | 11.65 | 8.4 |
| 7 | 2.65 | 11.65 | 9 |
| 8 | 2.58 | 9.6 | 7.02 |
| 9 | 3.72 | 14.4 | 10.68 |
| 10 | 1.35 | 5.9 | 4.55 |
| 11 | 4.4 | 9.6 | 5.2 |
| 12 | 1.18 | 7.75 | 6.57 |

पाण्याची पातळी मधील सरासरी घट (मी.)
5.75

पिण्याच्या पाण्याच्या विहिरीतील पातळी मधील सरासरी घट (मी.)
8.01

**पाण्याच्या पातळीतील घट ही घरगुती कारणांसाठी आणि शेतीसाठी पाण्याच्या वापरामुळे आहे.**

**प्रत्येक विहिरीत किती घट झाली याचे नीट निरीक्षण करा.**

**तुमची विहीर यापैकी कुठल्या विहिरीसारखी आहे ?**






2021 पावसाळ्यापूर्वी पाणी पातळीची सरासरी व 2022 पावसाळ्या पूर्वीच्या पाणी पातळीची सरासरी या दोन्हींमध्ये येत असलेला फरक : **-0.07**

**मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा विहिरींची पाणीपातळी कमी झाली असेल, तर ती चिंताजनक बाब आहे.**

**मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाऊस कमी झाला, तर परिस्थिती अधिक चिंताजनक होईल.**

**खात्रीशीर पाणी हा समृद्ध शेतीचा पाया आहे. आपली पाण्याची परिस्थिती काय आहे हे विहीर मोजमाप आपल्याला सांगू शकते.**

**शाश्वत समृद्धीसाठी विहिरींच्या पाण्याच्या पातळीवर सातत्याने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.**

**प्रत्येक गटामध्ये प्रशिक्षित सदस्य असावेत जे वर्षभरात किमान तीन वेळा विहिरीचे मोजमाप करतील :**

**पावसाळ्यानंतर, रब्बी पिकानंतर आणि पाऊस पडण्यापूर्वी.**

# AVHAN:2019

## CHANCELLOR'S BRIGADE : NSS WING

TRAINING CAMP ON DISASTER MANAGEMENT

आव्हान–चान्सलर्स ब्रिगेड : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर

### प्रमाणपत्र / Certificate

श्री/कु. Mr./Ms. Atole Pravin Sukhadev

of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad जिल्हा/District Beed

यास/हिस **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांच्या विद्यमाने दि. ३ जून ते १२ जून २०१९ या कालावधीत विद्यापीठ परिसरात आयोजित 'आव्हान–२०१९' – राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरात **सहभाग** घेतल्याबद्दल NDR फ्रेंड म्हणून गौरविण्यात येत असून, त्यासाठी हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

has been a **Participant** in the AVHAN-2019: Chancellor's Brigade - State Level Training Camp on Disaster Management, organized by **Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**, in the campus during 3rd June to 12th June 2019 and he/ she has been designated as NDR Friend. Hence this Certificate.

**State Liaison Officer & OSD, NSS Cell**
Dept. of Higher & Technical Education,
Government of Maharashtra

**No. AVHAN 2019-0289**

**Vice-Chancellor**
SRTM University, Nanded

Scanned by CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Reaccredited with 'A' Grade

# NATIONAL SERVICE SCHEME

**"NOT ME BUT YOU"**

## Certificate of Appreciation

***• SPECIAL STATE LEVEL FLOOD RELIEF CAMP •***

***28 August to 3 September 2019***

*Presented to NSS Volunteer*

*Mr. / Ms.* Pravin S Atole *of*

Ananrao Dhonde College kada.

***For Helping Flood Affected Families of Kolhapur And Sangli, Maharashtra***

*In recognition for your dedicated work and generosity especially for providing the essentials to the flood affected families to recover and rebuild their lives.*

*We thank you for standing with nation at this difficult time!*

Thank you

**Director** **Registrar**

55

Scanned by CamScanner

राष्ट्रीय सेवा योजना , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# प्रेरणा २०२०

राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास प्रशिक्षण शिबीर

## प्रमाणपत्र

# Atole Pravin Sukhadev

Dr.Babasahe Ambedkar Marathvada University, Aurangabad

यांनी शनिवार दि. ११ जुलै २०२० ते बुधवार दि. १५ जुलै २०२० या कालावधीत आयोजित 'प्रेरणा-२०२०' राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास प्रशिक्षण शिबीरामध्ये ऑनलाईन माध्यमातून सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती स्वाती मोहपात्रा<br>युनिसेफ, मुंबई | प्रा. अभय जायभाये<br>संचालक<br>राष्ट्रीय सेवा योजना कक्ष ,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ. अतुल साळुंखे<br>राज्य संपर्क अधिकारी,<br>रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मुंबई | डॉ. नितीन करमळकर<br>प्रभारी कुलगुरु,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

Scanned by CamScanner



दि. 4/6/2019
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या विद्यमाने दि. ३ जून ते १२ जून २०१९ या कालावधीत आयोजित 'आव्हान २०१९' शिबिर...




दि. 11/06/2019 बीड जिल्हा ग्रुप 'आव्हान २०१९'




नृसिंहवाडी ता. शिराळ येथील बाजारतळाची स्वच्छता करताना...
दि. 1/9/2019




नृसिंहवाडी येथील सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता करताना....
दि. 1/9/2019

Scanned by CamScanner




दि- 5|01|2020 आनंदराव धोंडे महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिरामध्ये स्वयंसेवकांना व ग्रामस्थांना पर्यावरण व सेंद्रिय शेती विषयक माहिती सांगताना...

Scanned by CamScanner

# COVID YODHA AWARD TO NSS VOLUNTEER PRAVIN ATOLE





दैनिक नगरी दवंडी

बल सागर भारत होवो ! विश्वात शोभुनी राहो !!

प्रतिनिधी सोपान पगारे

RNI : MAHMAR/2019/79242 | शनिवार, १४ ऑगस्ट २०२१ | पाने ६ । किंमत ₹ २ | ANR/048/2021-23

## महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने कोविड योद्धा पुरस्कार आटोळे यांना प्राप्त

**नगरी दवंडी/प्रतिनिधी**

**आष्टी :** आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रवीण आटोळे (राहणार वाहिरा) याला मिळाला कोळी योद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना यांच्या अंतर्गत दिला जाणारा जिल्ह-स्तरीय कोविड योद्धा पुरस्कार हा पुरस्कार मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मा.ना.उदयजी सांमत , जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा , रा.से. यो.महाराष्ट्र राज्य समिती सदस्य . अंकित प्रभू . या सर्वांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**Corona YODHA Award won by our NSS Volunteer PRAVIN ATOLE the Education Minister of Maharashtra, Hon. Udayji Samant feliciting**



**Government of Maharashtra | Higher and Technical Education Department**
**National Service Scheme Cell, Maharashtra**
**National Service Scheme State Level Award – 2019-20**

**Volunteer Merit List Stage - II**

| Sr.No | Application ID | Candidate Full Name | Gender | Category Name | University Name | Institute Name | District Name | Current Qualification Faculty | Qualified Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PV20500036 | Kshitij ashok sheth | M | Open | Bharati Vidyapeeth (Deemed to be University), Pune | Dental College & Hospital, Sangli | Sangli | Dental | Nomination For State Level Award & National Level Award |
| 2 | PV20500205 | Pravin sukhadev atole | M | Open | Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad | Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya, Kada. | Beed | Bachelor Science | Nomination For State Level Award & National Level Award |
| 3 | PV20500220 | Mandar Vijay Thakur | M | Open | Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli | College of Agriculture | Ratnagiri | B. Sc. (Honours) (Agriculture | Nomination For State Level Award & National Level Award |
| 4 | PV20500508 | KUNAL SUNIL WANKHADE | M | Open | Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola | College of Agriculture Engineering & Technology, Dr. PDKV Akola | Akola | B.E. / B. Tech | Nomination For State Level Award & National Level Award |
| 5 | PV20500217 | Vishal manohar shende | M | Open | Gondwana University Gadchiroli | Shree Shivaji Arts,Commerce & Science college Rajura | Chandrapur | Bachelor Arts | Nomination For State Level Award & National Level Award |
| 6 | PV20500727 | AKASH ASHOK DHANGAR | M | Open | Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon | Dept. of Social Work School of Social Scienc KBCNMU Jalgaon. | Jalgaon | M.S.W | Nomination For State Level Award & National Level Award |
| 7 | PV20501189 | Renuka sunil mirge | F | Open | Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek | Administrative service degree college,570-A, Naike road, Mahal,Nagpur -440032 | Nagpur | Arts ( Civil Services ) | Nomination For State Level Award & National Level Award |
| 8 | PV20500587 | PANDHARPURE POOJA NAGNATH | F | Open | Maharashtra University of Health Sciences, Nashik | Tilak Ayurved Mahavidyalaya | Pune | Ayurved | Nomination For State Level Award & National Level Award |
| 9 | PV20500684 | Saurabh Tulshiram Waghmare | M | Open | Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur | D. B. F. Dayanand College Of Arts and Science, | Solapur | Bachelor Arts | Nomination For State Level Award & National Level Award |
| 10 | PV20500159 | Mohan Manoj Warthi | M | ST | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | DR. Ambedkar Institute of Social Work, Nagpur | Nagpur | B.S.W | Nomination For State Level Award & National Level Award |


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
''राष्ट्रीय सेवा योजना विभाग''
कोविड योध्दा पुरस्कार वितरण


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
''राष्ट्रीय सेवा योजना विभाग''
कोविड योध्दा पुरस्कार वितरण








**Corona YODHA Award won by our NSS Volunteer PRAVIN ATOLE felicitation done by the Education Minister of Maharashtra, Hon. NSS Director Dr. Patil sir congrats our NSS team**

दिव्य लोकप्रभा
Mon 17-10-2022
Page No. 6

# सराटेवडगाव आनंदवाडी होणार महाराष्ट्रातील पहिले कार्बन नुट्रल गाव

**आष्टी (प्रतिनिधी)–ह.भ.प.श्री शिवाजी महाराज मोरे(संत तुकाराम महाराज यांचे दहावे वशंज)व वासुदेव सोळुंके साहेब(अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड) यांच्या हस्ते भुमिपुजन व जलपुजन करण्यात आले**

[illegible]







सांज दैनिक
बीड सिटीझन
सोमवार,दि. १७ ऑक्टोबर २०२२ • पान क्र.६

# आठशे मीटर नदी खोलीकरण रुंदीकरण कामाचे भुमिपुजन

कडा (प्रतिनिधी) ह.भ.प.श्री शिवाजी महाराज मोरे(संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज)व वासुदेव सोळुंके साहेब(अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड) यांच्या हस्ते भुमिपूजन व जलपूजन करण्यात आले

आष्टी तालुक्यातील सराटे वडगाव आनंदवाडी ग्रामपंचायत व आयसीआयसीआय फाउंडेशन तर्फे महाराष्ट्रातील पहिले कार्बन न्यूट्रल गाव तसेच आठशे मीटर नदी खोलीकरण रुंदीकरण कामाचे जलपूजन व ३२०० देशी वृक्ष लागवड तसेच ग्रामपंचायत भवन जिल्हा परिषद शाळा पाच व एक अंगणवाडी खोल्यांचे भुमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हरिभक्त परायण श्री शिवाजी महाराज मोरे,(संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज व वृक्षवल्ली प्रतिष्ठानचे अध्यक्ष),प्रमुख उपस्थिती म्हणून माननीय वासुदेव सोळुंके(अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड), प्राचार्य डॉक्टर हरिदास विधाते सर,



आयसीआयसीआय फाउंडेशनचे चेतन पाटोळे, संतोष शिनगारे सर, गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव, गटविकास अधिकारी सुधाकर मुंडे, माजी शिक्षण अधिकारी विक्रम पोकळे,कृषी अधिकारी जगताप साहेब ह.भ.प. निवृत्ती बोडखे महाराज, ह.भ.प.अप्पा ▸▸ पान २ वर

मुंबरे महाराज उपस्थित होते,कार्यक्रमाची प्रस्तावना राजेश बोडखे सर यांनी केली, व सरपंच प्रा.राम बोडखे सर यांनी सूत्रसंचालन केले. गावातील वृद्धांचे सत्कार

मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,चेतन पाटोळे साहेब,प्राचार्य हरिदास विधाते सर,विक्रम पोकळे साहेब व वासुदेव सोळुंके अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शन तथा भाषण केले नंतर अध्यक्षीय भाषण ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांनी केले व त्या नंतर जी.प.शाळा खोल्यांचे व ग्रामपंचायत भवन या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले नंतर आय सी आय सी आय फौंडेशन तर्फे नदी खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आलेल्या कामाचे जलपूजन करून नदी काठी वृक्षलागवड करण्यात आले,सर्वांनी आय सी आय सी आय फौंडेशन ने व ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. कार्यक्रमाला जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,अन्सार शेख साहेब,चेअमन बबन नेनवरे,उपसरपंच महादेव शिंदे,भाऊ तरटे, राजाराम नेनवरे,शिवाजी मिसाळ,बाळू तरटे,जी.प.शाळा मधील शिक्षक वृंद,सरपंच दीपक खिळे,सुनील मान्सर कासेवाडी,माजी सरपंच बाळासाहेब खिळे,प्रवीण खिळे गायकवाड,ईश्वर साके,सतीश चव्हाण,कोतकर महाराज,टीम पाणी फौंडेशन,टीम आयसीआयसीआय फौंडेशन,कोंडीभाऊ झाम्बरे,वनसिंग बोडखे,राजुभाई शेख,दादा राजपुरे,बापूराव सुम्बरे,ग्रामपंचायत सदस्य,महिला व युवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते..